

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

र्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २ — टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

मी देहरूपानें तुमच्या दृष्टिआड झालों तरी मी सांगत आहें या माझ्या शब्दांवर संपूर्ण विश्वास ठेवा. माझा देह दिसेनासा झाला तरी मी या जगांतून गेलों असें समजूं नका. तुमच्या अंतःकरणांत माझें सदैव वास्तव्य असेल. समाधिस्थानांतून माझीं हाडें तुम्हांला निर्भयतेचें आश्वासन देत राहतील. जो जो कोणी माझ्यावर संपूर्ण श्रद्धा ठेवील त्याच्यापासून मी दूर नाहीं. त्याच्याबरोबर मी बोलत राहीन व त्याची मनकामना पूर्ण करीन. मी दृष्टिआड होईन आणि मग आमचें कसें होईल याची बिलकुल चिंता करूं नका. मात्र माझी आठवण नेहमीं करीत जा. माझें मनोभावें व श्रद्धापूर्वक चिंतन करा; म्हणजे तुमचें कोटकल्याण होईल.

—श्रीसाईसच्चरित


## पुण्यतिथी ] श्रीसाईलीला [ विशेषांक

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४० वें ]    ऑक्टोबर १९६१    [ अंक ७ वा

: संपादक :

**गो. वि. क्षीरसागर**

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

**टे. नं. ६३३६१**

: कार्यालय :

**'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४**

# प्रिय वाचक—

प्रति वर्षाप्रमाणें श्रीसाईबाबांच्या पुण्यस्मरणार्थ हा पुण्यतिथि विशेषांक आमच्या वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे. बाबा समाधिस्थ होऊन सुमारें बेचाळीस वर्षांचा काळ मागें पडलेला असला तरी त्यांचें अस्तित्व आम्हांला क्षणोक्षणीं जाणवत आहे व पदोपदीं त्याची प्रचीति येत आहे. त्यांचें पुण्यस्मरण वेगळें तें कसलें करावयाचें ? आणि त्यासाठीं विशेषांकाची किंवा त्यानिमित्त शिरडीसंस्थानकडून जो उत्सवाचा भव्य कार्यक्रम आंखला जातो त्याची तरी जरूरी काय ? हें केवळ लोकोपचारासाठीं व आपल्या मनाच्या समाधानासाठीं आहे.

आपण आपल्या वाडवडिलांचें दर वर्षी ठरलेल्या तिथीला श्राद्ध घालतों, त्यांची आठवण करतों व त्यांना आवडणाऱ्या गोष्टी समर्पण करतों. त्यामुळें त्यांना सद्गति मिळते व इहलोकीं त्यामुळें आपलेंही कल्याण होतें अशी आपली समजूत असते. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कर्मानुसार वाईट वा बरी गति मिळत असते. त्या व्यक्तीकडून सत्कर्मे घडलीं असलीं तर तिला सद्गति ही मिळावयाचीच. त्यासाठीं आम्हीं खटाटोप करायला नको. आम्हीं कांहीं करायचें असेल तर त्यांच्या सद्गुणांचें स्मरण व आचरण करावयाचें व इहलोकीं आपलें जीवन शोभवून सर्वांकडून 'भला रे भला' म्हणवून घ्यावयाचें. जो आपल्या सद्गुणाचरणानें या जगांत वंदनीय झाला त्याला तो कुठेंही गेला तरी जाईल तिकडे मानाचा मुजरा मिळणारच.

श्रीसाईबाबा यांच्यासारख्या केवळ लोककल्याणासाठीं या भूतलावर अवतार घेऊन आमच्यांत वावरणाऱ्या अवतारी महाभागांची गोष्टच वेगळी असते. त्यांचें श्राद्ध आम्हीं कसलें घालणार ? त्यांनीं आमच्यांत मानवरूपानें वावरत असतां आम्हीं सन्मार्गगामी व्हावें, आम्हीं परस्परांशीं बंधुभावानें व माणुसकीनें वागावें, त्याचप्रमाणें जन्मा आलियाचें सार्थक कशांत आहे हें जाणावें, यासाठीं जे अहर्निश धडपडले, झिजले व परोपरीनें ज्यांनीं लोककल्याण साधलें त्यांचा आपण आज व सदैव जयजयकार करावयाचा आहे. आणि अशा रीतीनें बाबांच्या जयंत्युत्सवाचा हा महिना साजरा करावयाचा आहे. ज्यांचा जन्म केवळ लोकोपकारार्थच होता, ज्यांनीं आपलें सारें जीवन परोपकारार्थ वेचलें त्या अवतारी पुरुषाची थोरवी आम्हीं काय गावी ! 'केवळ जगाचिया उपकारा। चुकवाया जन्ममरणांचा फेरा। त्यागुन निर्गुण निराकारा। आले हे आकारा संत जनीं ॥' जनता अज्ञानांत व पापकर्दमांत लोळत पडलेली आहे, त्यामुळें हालअपेष्टा भोगीत आहे, कोण कोणाला विचारीत नाहीं, प्रत्येकाचें लक्ष स्वार्थांकडे, गरिबांच्या व दुःखपीडितांचा वाली कोणी नाहीं हें पाहवत नाहीं, करुणेनें अंतःकर-

णाला पीळ पडतो, म्हणून बाबांसारखे संत, महात्मे या भूतलावर अवतीर्ण होतात, जनतेच्या दुःख निवारणार्थ झटतात, ज्यांची जशी तयारी झाली असेल त्याप्रमाणें त्यांचें मार्गदर्शन करतात व अंतर्धान पावतात.

मुमुक्षुजनांनीं अशा महाभागांचा जीवन संदेश समजून घेतला पाहिजे व तो अहर्निश आचरणांत आणण्यासाठीं झटलें पाहिजे. बाबा आज देहानें आमच्यांत वावरत नसले तरी आमच्या कल्याणास शंभर टक्के कारणीभूत होणारी त्यांची शिकवण जोंपर्यंत आमच्यापुढें आहे व तिचें आचरण जोंवर आमच्याकडून होत राहील, तोंपर्यंत बाबा आमच्या सन्निध राहून आमचें मार्गदर्शन करीत आहेत अशी श्रद्धा आम्ही कां बाळगू नये?

बाबा शिकवणुकीच्या रूपानें आजही आमच्यांत वावरत आहेत. त्यांच्या शिकवणुकीची शिदोरी ज्यांनीं जवळ बाळगून ठेविली आहे, त्यांचें अकल्याण केव्हांही होणार नाहीं. आजवर त्यांचें कल्याण होत आलेलें आहे, त्यांच्या मनकामना पूर्ण झालेल्या आहेत व त्याला संकटांतून मार्ग सांपडलेला आहे.

तुमची तशी श्रद्धा असली तर ते तुमच्यापासून मुळींच दूर नाहींत. तुमच्यापुढें तुमच्या कल्याणासाठीं सदैव हजर आहेत. 'तुम्हीं कोणी कुठेंही असा। भावें मजपुढें पसरितां पसा। तुमचिया भावा सरिता। रात्रंदिसा उभाच॥' असें ज्यानीं कायमचें आश्वासन देऊन ठेविलें आहे व ज्याची प्रचीति त्यांच्या भक्तांना आजवर आली आहे व आजही येत आहे, त्या महाभागाचें महत्त्व आम्हीं काय गावयाचें!

बाबांचा जयंत्युत्सव आपण वर्षानुवर्ष समारोहानें साजरा करतों तो कशासाठीं? आमच्या भल्यासाठीं. श्रीरामकृष्ण, श्रीकृष्ण यांच्यासारखे जगाच्या कल्याणासाठीं जे अवतार होऊन गेले किंवा ज्ञानदेव, तुकारामासारखे जे संत महात्मे होऊन गेले त्यांच्या आपण जयंत्या करतों. त्यांचा हा जयजयकार त्यांच्या जीवनकार्याची पुण्यस्मृति करून देणारा असतो. त्यांचें जीवन कार्य, त्यानीं प्रगट केलेले सद्गुण व त्यांचें सारें आचरण हें प्रेरणादायी असतें. त्यापासून प्रेरणा घेऊन आम्हीं आमचें जीवन फुलवायचें असतें व सुगंधित करावयाचें असते. जें जीवन सद्गुणांनीं प्रफुल्लित झालें नाहीं व ज्या जीवनाचा सुगंध हयातींतच नव्हे तर हयाती नंतरही सतत दरवळत राहिला नाहीं, तें कसलें आलें आहे जीवन!

श्री साईबाबांचें जीवन हें अशाप्रकारचें सुगंधीत व सुसंपन्न जीवन होतें. त्या जीवनाला जन्म नाहीं तसा मृत्यूही नाहीं. तें चिरंतन जीवन होय. त्यांचें पुण्यस्मरण म्हणजे त्यांच्या सुगंधित जीवन कार्याचें व त्यांच्या सुंदर शिकवणुकीचें चिरंतन स्मरण. तें प्रेरणादायी स्मरण आमच्याकडून अहर्निश घडावें, जीवनभर आम्हांला तें प्रेरक व तारक होऊन रहावें हीच अशा प्रसंगीं भक्तिभावपूर्वक प्रार्थना करावयाची.

अशा प्रसंगीं बाबांनीं आपल्या भक्तांना देऊन ठेवलेल्या प्रेरक व कल्याणकारी आश्वासनाची आठवण पुन्हां एकवार करून देण्याचा मोह आमच्यानें आवरत नाहीं.

**झालों जरि गतप्राण । वाक्य माझें माना प्रमाण ।**
**माझीं हाडें तुर्बतीमधून । देतील आश्वासन तुम्हांस ॥**
**मी काय पण माझी तुर्बत । राहील तुम्हांसवें बोलत ।**
**जो तिस अनन्य शरणागत । राहील डोलत तयासवें ॥**
**डोळ्याआड होईन ही चिंता । करूं नका तुम्हीं मजकरितां ।**
**हाडें ऐकाल बोलतां । हितगुज करितां तुम्हांसवें ॥**
**मात्र माझें करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण ।**
**ठेवा करा निष्काम भजन । कृत कल्याण पावाल ॥** —संपादक

---

## संतांचा विचित्र मार्ग ?

पवहारी बाबा या नावाचे एक थोर संत होऊन गेले. एकदां कोणी एक चोर चोरी करण्याच्या हेतूनें त्यांच्या झोपडीत शिरला; परंतु त्याला बाबांची जाग लागल्यामुळें तो पळत सुटला. बाबांना त्यमुळें पराकष्ठाचें दुःख झालें. त्यानें घरांत जीं थोडीं भांडीं होतीं तीं एका गोणत्यांत भरलीं व तो खांद्यावर मारून तेही लगबगीनें त्या चोरामागें धांवत सुटले! मोठमोठ्याने ओरडून त्याला "अरे नारायणा! पळू नकोस थांब" असें त्याला विनवू लागले चोर आरडाओरडीमुळें थांबला. तेव्हां बाबा त्याला म्हणतात, "मोठ्या आशेनें घरांत प्रवेश केलास आणि पळत कां जातोस ? हीं घे चार भांडीं घरांत होती तीं तुझ्यासाठीं खांद्यावर मारून घेऊन आलों आहे! हा विचित्र प्रकार पाहून चोर थक्क झाला. या सज्जनपणाची त्याच्यानें कल्पनाच्च करवेना. त्याने चोरीचा व्यवसाय तत्क्षणी सोडून दिला आणि तो बाबांचा शिष्य बनून त्यांची सेवा करू लागला.

संतांचें मार्ग हे अशा प्रकारचे असतात ! ●●●

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**म हि ला व स्तु भां डा र**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें
लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमचीं कोठेंही शाखा नाहीं. ***

# श्रीसाईबाबांची मोलाची शिकवण

लेखक : पु. बा. कुळकर्णी

सुमारें त्रेचाळीस वर्षांपूर्वी ( १९१८ ) श्रीसाईबाबा देहानें आमच्या दृष्टीआड झाले. तो विजयादशमीचा संस्मरणीय दिवस होता. 'मी दृष्टिआड झालों तरी चिंता करूं नका. मी सदैव तुमच्याच बरोबर असेन. जो जो भक्तिभावानें माझें चिंतन करील त्याची इच्छा, आकांक्षा मी पूर्ण केल्याशिवाय रहाणार नाहीं. तुम्हांला सोडून मी दूर कसा जाईन. तुमच्या हृदयांत तर माझें घर आहे. जो माझी आठवण करील त्याची मलाहि आठवण झाल्याशिवाय रहाणार नाहीं. त्याच्या बऱ्यावाईटाची, सुखदुःखाची मी चिंता वाहीन.'

## बहुमोलाचें आश्वासन

बाबांनीं दिलेलें हे आश्वासन किती बहुमोलाचें आहे. आणि तें आजवर त्यांनीं पाळिलें आहे व पुढेंही पाळलें जाईल हें निश्चित होय. बाबांचे भक्त जेथें जेथें आहेत तेथें तेथें त्यांना बाबांच्या अस्तित्वाची जाणीव पदोपदीं होत असते. बाबा देहानें दृष्टीआड झालेले असले तरी गेल्या बेचाळीस वर्षांच्या दीर्घ काळांत हजारो नव्हे लक्षावधि लोकांस त्यांच्या पुण्यस्मरणानें दिलासा मिळालेला आहे व त्यांच्या मनकामना बाबांच्या कृपेनें परिपूर्ण झालेल्या आहेत. जगाच्या निरनिराळ्या भागांत बाबांचे भक्त पसरलेले आहेत. ज्या ज्या वेळीं संकट प्रसंगीं बाबाना हाक मारावी त्या त्या वेळीं त्यांनीं संकटांचा परिहार करण्यासाठीं धांवत यावें व आपल्या भक्तांची चिंता दूर करावी असे दाखले हरघडीं मिळत आहेत.

## परिस्थितीचें अज्ञान

बाबांच्याठायीं भेदभावाला स्थान नव्हतें. तेथें धर्मभेद, जातिभेद, समाजभेद, प्रांतभेद किंवा देशभेद यांचा मागमूसहीं नव्हता. हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन सारे त्यांना सारखेच होते. मानवता, अखिल मानवजातीबद्दल प्रेमभाव हें त्यांचें ब्रीद होतें. त्यानीं भेदाभेद मानले नाहींत, पाळले नाहींत. व पाळूं दिले नाहींत. 'सर्वांभूतीं सम भाव' अशीच त्यांची नेहमींची वागणूक होती. या दृष्टीनें पहातां ते किती श्रेष्ठ होते याची कल्पना कोणत्या शब्दांनीं करून द्यावी ? त्यांना कोणत्याही धर्माचें वावडें नव्हतें. अमुक अमुक एक धर्म श्रेष्ठ आणि अमुक एक धर्म कनिष्ठ ही भावना त्यांना कधींही शिवली नाहीं. आदिशक्ति, परब्रह्म परमेश्वर एक आहे. त्याच्यापर्यंत पोहोंचण्याचे मार्ग किंवा वाटा वेगवेगळ्या असल्या म्हणून काय बिघडलें ?

कोणीही आपला धर्म इतरांहून श्रेष्ठ समजण्याची जरूरी नाहीं. सर्वच धर्म आप-आपल्या परीनें श्रेष्ठ आहेस. प्रत्येकास आपल्या धर्मांत राहून बंधुभाव, माणुसकी व सर्वांभूतीं समभाव प्रगट करतां येतो; आणि तो प्रगट करणें हेंच देवत्त्व प्राप्त करून घेण्याचें प्रमुख साधन आहे. मग हीं धार्मिक भांडणें कशाला? तीं केवळ सत्य परिस्थितीच्या अज्ञानामुळें उद्भवतात.

## बाबा सर्व कांहीं होते

बाबा हिंदु होते, मुसलमान होते कीं दुसरे कोणी होते, याचा उलगडा शेवटपर्यंत कुणालाही झाला नाहीं. ते सर्व कांहीं होते. त्यानीं हिंदूवर, मुसलमानांवर किंवा इतर कोणत्याही धर्मांतील वा समाजांतील लोकांवर सारखेंच प्रेम केलें. भेद-भावाची भिंत त्यांच्या प्रेमाआड केव्हांही आली नाहीं.

'**सर्व धर्मी समानत्व**' बाबानीं गायिलें व आचरिलें. आजकाल हें थोर तत्त्व पायदळीं तुडविलें जात आहे. आणि त्यामुळें आपली केवढी बरें हानी होत आहे! बाबानीं कित्येक वर्षांपूर्वी आपणास कोणता बरें महामंत्र दिला होता? 'काय तुम्हीं लेकरें मूढ। बांधा हिंदु–अविंधाची सांगड। व्हा दृढ सुविचारारूढ। तरीच पैलथड पावाल ॥'

किती बहुमोलाचा उपदेश आहे हा! परंतु आजवर कोणी त्याच्याकडे लक्ष पुर-विलें आहे? आणि लक्ष न पुरविल्यामुळें आपली केवढ्या प्रचंड प्रमाणांत हानि झालेली आहे!

## गेल्या पांचशें वर्षांचा इतिहास

गेल्या सुमारें पांचशें वर्षांपासून आजवरचा इतिहास वर वर जरी पाहिला तरी हिंदु–मुसलमान व हिंदु–ख्रिश्चन या दोन प्रमुख धर्मीयांतील धार्मिक तंटे भांडणामुळें या देशांत जे रक्तपात, जी प्राणहानी व जे तंटेबखेडे झालें तसे इतर कोणत्याही गोष्टीमुळें झाले नाहींत, असें आढळून येईल.

कबीर सारख्या संतानें व अकबर सारख्या बादशहानें सर्व धर्मी समानत्त्व पाळलें जावें, राम व रहीम हे दोन नसून एकच आहेत, याची जनतेला शिकवण देण्याचे आटोकाट प्रयत्न केले. इतर साधूसंतांनींही हें अद्वैत जाणविण्याचा प्रयत्न व प्रचार केला परंतु हें महान् तत्त्व बहुजन समाजाच्या जसें गळीं उतरावें तसें त्याकाळीं किंवा आजच्या काळींही उतरलें गेलेलें नाहीं.

या क्षेत्रांत श्रीसाईबाबानीं जीवनभर जें कार्य केलें तें खरोखर श्रेष्ठ प्रतीचें व आजच्या निधर्मी राज्याच्या काळांत प्रत्येकानें विचार करण्यासारखें आहे. बाबांचें सारें जीवन निधर्मीपणाच्या व समानत्वाच्या निकषांवर घासलें जाऊन त्यामुळें त्या जीवनाला उज्वलता प्राप्त झालेली आहे. बाबांनीं हिंदु, मुसलमान किंवा कोणताही भेदाभेद मानिला नाहीं व मानूं दिला नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें ते हिंदु होते.

कीं मुसलमान होते याचा नक्की ठावठिकाणा लागू शकला नाहीं. याचा अर्थ हिंदु आणि मुसलमान हा भेदभावच त्यांना मान्य नव्हता. ते हिंदु होते, मुसलमान होते आणि सर्व कांहीं होते. म्हणजे भेदातीत असें जें परब्रह्म तें ते होते.

## सर्व धर्मीं समानत्व

'हिंदु म्हणतां दिसत यवन। यवन म्हणतां हिंदु सुलक्षण। ऐसा हा अवतार विलक्षण। कोण विचक्षण वर्णील।

हिंदुतील सण किंवा पवित्र दिवस असोत; अथवा मुसलमानांतील सणवार असोत, बाबांना त्यांपैकीं कोणाचेंही वावडें नव्हतें. दोघांच्याही सणवारांना सारखें महत्त्व देऊन ते आपलें समानत्व वेळोवेळीं प्रगट करीत असत.

'सण गोकुळ अष्टमी आला। करवून घेती गोपाळ काला। तैशी ईद येतां यवनांला। निमाजाला अटक ना॥'

आणखी हें पहा:—"हिंदु म्हणावें जरी तयास। मशिदींत सदा निवास। यवन तरी हुताश। अहर्निश मशिदीं॥ तरी जो सर्वदा हरीस शरण। त्या काय म्हणावें हिंदु वा यवन। असो शूद्र, अतिशूद्र याति विहीन। जाती न प्रमाण अणुमात्र॥

ज्या ज्या परीनें धर्मांचें समान श्रेष्ठत्व प्रगट करतां येईल व प्रत्येक धर्म आपआपल्या परीनें श्रेष्ठ आहे हें दाखवून देतां येईल त्या त्या परीनें ते जनतेच्या मनावर तें समानत्व अविरत बिंबवींत होते. ईश्वरप्राप्तीसाठीं कोणीही धर्मांतर करण्याची जरूरी नाहीं. जुलूम जबरदस्तीनें एखाद्याला बाटवून स्वतःच्या धर्मांत ओढणें यासारखा रानटीपणा व मूर्खपणा दुसरा कोणताही नसेल; आणि आजच्या सुधारलेल्या काळांतही बाटवाबाटवीचें प्रकार राजरोस चाललेले आहेत. धर्मांतराच्या इतिहासांत येथें शिरण्याचें कारण नाहीं; परंतु गेल्या चार पांचशें वर्षांच्या काळांत धर्मांतराच्या नावानें ज्या क्रूर व अंगावर शहारे आणणाऱ्या घटना ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं किंवा मुस्लीम धर्मांधांनीं घडवून आणल्या त्या दृष्टीसमोर आणिल्या म्हणजे देव, धर्म व माणुसकी या शब्दांचे खरे अर्थ त्यांना समजलेच नाहींत असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें.

## धर्मांतर कां घडतें?

परिस्थितीच्या अज्ञानामुळें किंवा स्वार्थामुळें वा जुलूम जबरदस्तीमुळें मनुष्याकडून धर्मांतर घडतें. ईश्वरप्राप्तीसाठीं तें घडण्याची मुळींच जरुरी नसते.

एकदां श्रीसाईबाबांकडे बडे बाबा हे इस्लाम धर्माचा नुकताच स्वीकार केलेल्या एका हिंदु गृहस्थास घेऊन आले व म्हणाले, 'बाबा! या गृहस्थानें इस्लाम धर्माचा स्वीकार केला असून ते आपला आशीर्वाद घेण्यासाठीं आपल्याकडे आले आहेत!'

हें ऐकतांच बाबांनीं काय करावें? त्या घटनेचें त्यांना समाधान वाटलें का? नाहीं! त्यांनीं बडे बाबांच्या तोंडांत रागानें एक चपराक लगावली व त्या भरांत त्यांनीं एकच वाक्य उच्चारलें व तें बहुमोलाचें आहे. बाबा म्हणाले, 'तुम्हीं जन्म देणारा स्वतःचा

बाप कधीं बदलूं शकतां कां?' बाप बदलण्याची कल्पना जशी कोणाला रुचणार नाहीं किंवा ती जशी वेडेपणाची आहे त्याचप्रमाणें धर्म बदलण्याची कल्पना आहे. 'स्वधर्मे निधनं श्रेयः' हें अगदीं चिरंतन सत्य आहे. ज्या धर्मांत तुमचा जन्म झाला तोच तुमचा देव-प्राप्तीचा किंवा मोक्ष प्राप्तीचा धर्म. तो बदलण्याची मुळींच जरुरी नाहीं. बाबानीं धर्मांतरास केव्हांही व कोणत्याही परिस्थितींत उत्तेजन दिलें नाहीं.

## धर्म कशाला, अंतःकरण बदला

धर्म बदलण्यानें का मोक्षाचा मार्ग मोकळा होत असतो? तुम्हीं आपलें अंतःकरणें बदलले पाहिजे, आपला स्वभाव बदलला पाहिजे, मनावर ताबा मिळवून बंधूभाव वाढविला पाहिजे, सेवाभावांत आनंद वाटूं लागला पाहिजे, ईश्वर भक्तीकडे लक्ष लागून राहिलें पाहिजे. आणि या साऱ्या गोष्टी तुम्हांला कोणत्याही धर्मांत राहून करतां येतात.

**'व्हा दृढ सुविचारारूढ। तरीच पैलथड पावाल ॥**

या बाबांच्या उक्तीचा आपण विचार केला पाहिजे. त्यांत किती खोल अर्थ भरलेला आहे यांचें आपण चिंतन केलें पाहिजे. सुविचारांचें गाठोडें जवळ करून साऱ्या दुष्ट व स्वार्थी विचारांचा त्याग केला पाहिजे.

पूर्वी होती आणि आज तर या बोधामृताची आम्हांला किती तरी जरूरी आहे. आम्हीं वर वर पहातों. थोडे खोलांत शिरून बाबांच्या शिकवणीचा विचार करण्याची आमची तयारी नाहीं. सर्व धर्मी समानत्व त्याचप्रमाणें सर्व धर्मांचें श्रेष्ठत्व बाबानीं गायिलें व तें आचरणांत आणून तो उच्चांतील उच्च आदर्श सर्वांपुढें ठेविला, याची त्यांचें या आठवड्यांत किंवा इतर वेळींही पुण्यस्मरण करीत असतां आपणास प्रामुख्यानें आठवण झाली पाहिजे. या निमित्तानें त्यानीं आपणास जो महान् संदेश दिला तो आचरणांत आणण्यासाठीं प्रत्येकानें झटलें पाहिजे. 'राम आणि रहीम एक। यत्किंचितही नाहीं फरक। मग भक्तेंच कां धरावी अटक। वर्तावें तुटक किमर्थ?' असा बाबांचा सरळ सवाल आहे.

## माननीय दिवाकर

हा लेख लिहीत असतां लो. टिळक यांचे परमस्नेही व श्रीसाईबाबांचे एक भक्त माननीय दादासाहेब खापर्डे यांची त्यानीं १९१०, १९११ व १९१२ या सालीं वेळोवेळी बाबांचे दर्शन घेण्याची संधी मिळाली असतां त्या त्या वेळी लिहून ठेवलेल्या आठवणींची रोजनिशी वाचण्यांत आली. त्यावरूनही निरनिराळ्या धर्मांकडे पहाण्याचा त्यांचा हाच समानतेचा दृष्टिकोन असल्याचें दिसून येतें. त्या प्रसिद्ध झालेल्या रोजनिशीला (१९५६) बिहार प्रांताचे माजी राज्यपाल व प्रसिद्ध तत्त्वज्ञ माननीय रंगराव दिवाकर यांनीं छोटीशी परंतु उद्बोधक प्रस्तावना लिहिली असून त्यांत बाबांच्या थोरपणाचें रहस्य कथन करतांना ते म्हणतात—

'It is the universality of his soul and the high child like purity of his conseiousness that made him the darling of thousands and the resting place of afflicted.'

आणि खरोखर बाबांचें वागणें बोलणें सवरणें, मार्गदर्शन करणें या सर्वांमध्यें व्यापकता, विशालता व सर्वसंग्राहकता होती. सर्व मानव जात, मग ती कोणत्याही धर्माची, जातीची वा समाजाची असो, सर्वांसाठीं, सर्वांच्या कल्याणासाठीं त्यांचें अंतःकरण तीळ तीळ तुटत असे. लहान बालक कसें निष्पाप, निर्लेप व निर्मळ मनोवृत्तीचें असतें. तशीच त्यांची सर्व प्रेमी प्रेमळ दृष्टि व वृत्ति होती. बाबा हजारो व लक्षावधि लोकांना आपलेसे वाटत व आजही वाटतात. बाबा हें आपलें विश्रांतिस्थान आहे, आशास्थान आहे व त्यांना शरण गेलें असतां आपण संकट मुक्त होऊं शकतों असें आजही त्यांच्या भक्तांना वाटतें, याचें कारण त्यांचा सर्वांभूतीं व सर्व धर्मीं समभाव होता, सर्वच आपलीं लेकरें आहेत, असें त्यांना वाटत असे हेंच होय.

---

## संतांना सोनें व माती सारखींच !

पूर्वी रायदास या नांवाचे एक संत होऊन गेले. ते निरीच्छ व निर्मम होतें. संत असेच असावयाचे. एकदां कोणी एक साधू त्यांच्या भेटीला आले. त्यांच्याजवळ परिसाचा तुकडा होता. त्याला लोखंडाला स्पर्श होतांच त्याचें सोनें बनत असे. असली वस्तु आपल्याजवळ ठेऊन काय करावयाची आहे या विचारानें तो परीस त्यानें रायदासाला अर्पण केला. देण्यापूर्वी लोखंडाचें सोनें कसें बनतें हा प्रयोगही त्यानें करून दाखविला. रायदास म्हणाले, 'काय करायची आहे असली मोलाची वस्तु जवळ बाळगून ! नको; आपणच ठेवा ती !'

साधूनें आग्रहपूर्वक तो परीस त्यांच्या स्वाधीन केला व आपण निघून गेला. रायदासानें तो परीस उचलला व आपल्या झोपडींतील एका दरवाजावरील वळचणींत कागदांत बांधून ठेऊन दिला.

फिरत फिरत सुमारें तेरा महिन्यानंतर परीस देणाऱ्या साधूची स्वारी रायदासाच्या गावीं आली. रायदासची भेट झाली तेव्हां साधूनें आमच्या परिसाचा किती वेळां उपयोग करण्याचे प्रसंग तुमच्यावर आले ? असा प्रश्न केला.

रायदासनें परीस ठेवलेल्या जागेकडे बोट दाखवून म्हटलें, 'त्या दिवशीं ज्या ठिकाणीं ठेवला त्याच ठिकाणी तो जसा ठेवला तसाच अजूनही आहे !'

संताना सोनें आणि मातीं दोन्हीं सारखींच !

# या जीवनांत मी काय शिकलों ?

—श्री. शंकराचार्य, द्वारकापीठ

**द्वारकापीठाचे श्री शंकराचार्य हे भगवत् कृपा झालेले आजच्या काळांतील सत्पुरूष असून 'भवान्स जर्नल' या पाक्षिकांत 'या जीवनांत मी काय शिकलों? या मथळ्याखालीं त्यांचा स्वानुभवपूर्ण व सर्वांना मार्गदर्शक होऊन रहाणारा एक लेख गेल्या जून महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध झालेला आहे. थोरा-मोठ्यांचे अनुभव सर्व साधारण लोकांस नेहमीं मार्गदर्शक होऊन रहाणार असतात. आमच्या वाचकांसाठीं त्या लेखाचा केवळ सारांश पुढें देण्यांत येत आहे.**

**या** जगांत जन्म घेऊन सर्वांत महत्त्वाची जर कोणती गोष्ट मी शिकलों असेन तर ती हीच कीं, आपल्या जीवनांत जें जें कांहीं घडतें तें भगवंताच्या इच्छेनुरूप घडत असतें. प्रत्येक घडामोडीमागें त्याची इच्छा असते. आपण कधीं कल्पना केली नसेल, कधीं स्वप्नांतही ज्या गोष्टी आल्या नसतील अशा घटना आपल्या आयुष्यांत केवळ त्याच्याच कृपेमुळें किंवा अवकृपेमुळें घडून येत असतात.

### जें घडतें त्याचें कारण

आपल्या जीवनांत एखादी सुखदायी व चांगली गोष्ट घडून येते याचें कारण त्याची कृपाच होय. जीवात्म्यावर त्याची कृपादृष्टि असल्याशिवाय ती घडून येणार नाहीं. कधीं कधीं दुःखदायक घटनाहि घडून येतात कारण त्याची इच्छा! त्याच्या इच्छेशिवाय गवताचें पातें किंवा झाडाचें पानहि हालत नाहीं, याबद्दल माझी पूर्ण खात्री होऊन चुकलेली आहे.

ती भगवत् इच्छा म्हणजे हम करेसो कायदा नव्हे. तिच्या मागें कांहीं तत्त्वप्रणाली असते. कारणाशिवाय कोणतेंहि कार्य घडत नाहीं. जो माणूस नीतिधर्मानें वागत असतो, भक्तिभावानें भारावलेला असतो व सच्छीलतेनें वागतो, त्याच्याकडे भगवंताची कृपादृष्टी वळल्याशिवाय रहात नाहीं. तो त्याच्या बाबतींत कृपाळूपणें वागणार, त्याच्यावर आपल्या कृपेची पाखर घालून त्याच्या सुखासाठीं झटणार हें निश्चित आहे.याच्याउलट एखादा माणूस अधर्मानें वागत असेल, अनीतीनें जीवन घालवीत असेल व ज्याच्या ठिकाणीं भक्तिभावाचा लवलेश नाहीं त्याच्यावर भगवंताची अवकृपा झाल्याशिवाय व तो नाना प्रकारच्या दुःखतापांनीं होरपळून गेल्याशिवाय रहाणार नाहीं.

### ह्या अनुभवाच्या गोष्टी

कृपेचा वर्षाव करणें किंवा अवकृपेच्या अवडंबराखालीं चेपून जाणें, या गोष्टी आपोआप घडत असतात, त्या तशा घडावयाच्या हा नेमच आहे. तो जगाचा नियमच

आहे. भगवंत दूर राहून हे सारे खेळ पहात असतो. त्याला प्रत्यक्षपणें कोणतीही ढवळाढवळ करावी लागत नाहीं. नियम घालून दिलेले आहेत. त्या नियमानुसार सारें घडत असतें. जें घडावयाचें तें घडावयाचेंच, पुण्यकर्मांचें फळ उत्तमप्रकारचें पदरांत पडावयाचें व दुष्ट कर्मांचें फळ दुःखतापाच्या रूपानें तुम्हांला भोगावें लागावयाचें.

माझ्या आयुष्यांत या गोष्टी मी प्रत्यक्षपणें अनुभविल्या आहेत.

वेद, उपनिषदें, गीता, महाभारत, रामायण यासारख्या ग्रंथांचें वाचन व मनन हें अत्यावश्यक आहे. मनुष्याला श्वासोछ्वासासाठीं स्वच्छ हवेची जशी जरुरी आहे त्याच प्रमाणें धार्मिक ग्रंथांचें वाचन, मनन व, निदिध्यास आवश्यक आहे. सर्वांना अशा ग्रंथांचें अध्ययन करण्याची संधी मिळत नाहीं. निदान त्यांपैकीं कांहीं ना कांहीं तरी अभ्यासावें अथवा विद्वान पंडितांच्या मुखांतून तें ऐकावें तरी, श्रवण झालें म्हणजे त्या बरोबर मनन होईल व मननामागून निदिध्यास हा ठरलेलाच असतो.

## माणसाचें वैशिष्ठ्य

मनुष्याला ईश्वरानें सारासार विचार शक्ति व बुद्धि दिली आहे. त्याचप्रमाणें हात, पायही दिले आहेत. आणखीही अनेक उपयोगी इंद्रियें दिलेलीं आहेत. कशासाठीं ? त्यानें त्यांचा शक्य त्या परीनें सदुपयोग करून स्वतःचा उद्धार करून घ्यावा यासाठीं. मनुष्यानें आळसांत स्वस्थ बसून रहातां कामा नये. हालचाल, घडपड व उद्योग अविरत कारावा म्हणजे त्यांचें गोड फळ त्याला चाखायला मिळेल. निरनिराळीं इंद्रियें देण्यांत ईश्वराचा हाच सद्हेत् आहे. त्या ईश्वरदत्त इंद्रियांचा तुम्हीं सदुपयोग केला तर तुम्हीं सुखी व्हाल; तसेंच दुरुपयोग केला तर त्याचे दुष्परिणाम तुम्हांलाच भोगावें लागतील.

आद्य श्री शंकराचार्यांनीं स्थापन केलेल्या द्वारका येथील शारदा पीठावर ईश्वरी कृपेनेंच माझी स्थापन झाली. माझ्या आयुष्यांत तत्पूर्वी व तदनंतर मला नाना प्रकारचे संस्मरणीय अनुभव आले. शारदा पीठावर माझी योजना झाल्यापासून माझी एक मोठी महत्वाकांक्षा होती. शारदा पीठाला आजच्या काळास अनुसरून अभिनव स्वरूप द्यावें व तें खरेंखुरें विद्यापीठ बनवावें हीच ती आकांक्षा होय. कृपाळू ईश्वरानें ती पूर्ण केली आहे. त्याच्याच कृपेमुळें मी शारदा पीठ विद्या सभा या संस्थेची स्थापना करूं शकलों व तिच्याद्वारें सध्यां एक महा विद्यालय ( Art College ) प्राच्यविद्या संशोधन मंदिर, नमुनेदार ग्रंथ संग्रहालय व वस्तुसंग्रहालय वगैरे ज्ञानसंवर्धक विविध संस्था स्थापन करतां आल्या व त्यांत आणखीही वाढ होत आहे. या कार्यासाठीं उदार जनता सढळ हातानें मदत करीत आहे ही भगवंताचीच कृपा नव्हे का !

## शिक्षणांतील वैगुण्य

या जगाचें व जगांतलि प्रत्येक वस्तुमात्राचें नियंत्रण करणारी एक आदि शक्ति आहे. तीच जगाचा आधार आहे. तुमचें, आमचें व सर्वांचें भवितव्य त्या आदि

शक्तीच्या हातीं आहे. हें निर्विवाद सत्य आहे. तें विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविणे अत्यंत जरूर आहे. आजच्या शिक्षण क्रमांत या महत्त्वाच्या विषयास मुळींच स्थान नाहीं. त्यामुळें विद्यार्थ्यांत बेशिस्त, बेदिली व बेजबाबदारपणा फार वाढलेला आहे.

इतकें हें सर्व सांगितलें. परंतु शेवटीं या आयुष्यांत मी शिकलेलें व आत्मसात् केलेलें एक महान् तत्त्व मला सांगून टाकावयाचें आहे. भगवद्गीतेंत त्या तत्त्वाचा सुंदर आविष्कार श्रीकृष्णानें केलेला आहे. कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन, याच्यावर बोलावें आणि लिहावें तेवढें थोडेंच होईल.

या महान सूत्रांत जें सांगितलें आहे त्याचें अपेक्षेप्रमाणें फळ पदरांत पडावें यासाठीं दुसऱ्या एका गोष्टीकडे लक्ष पुरविणें तितकेंच जरुरीचें आहे.

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीति मतिर्मम ॥**

## माझें स्मरण ठेव

याचें थोडक्यांत सार असें आहे :—आयुष्यांत यशस्वी होणें, मग तें धार्मिक, सामाजिक, नैतिक किंवा कोणत्याहि जागतिक क्षेत्रांत असो, हें केव्हां घडतें ? ईश्वरी सत्ता ही सर्वत्र व्यापून राहिलेली आहे, तीच जगाचा आधार आहे, जगांतील प्रत्येक गोष्टीचें नियंत्रण त्या दैवी शक्तीच्याद्वारें होत आहे, तें परब्रह्म आम्हीं सतत आमच्या दृष्टीपुढें ठेविलें पाहिजे. त्याचा कधींही विसर न पडावा. तरच त्याची कृपा आपल्या वाट्याला येईल व आम्हीं ज्या क्षेत्रांत वावरत असूं त्या क्षेत्रांत विजयी होऊं. त्याची कृपा संपादन करावयाची तर आम्हीं धर्माची कांस धरली पाहिजे. धर्म म्हणजे आमच्या कर्तव्याचें निष्ठापूर्वक परिपालन. सारा भरिभार त्याच्यावर टाकून व त्याचें स्मरण सतत करीत राहून आम्हीं मनोभावें आमचें कर्तव्य पार पाडण्यासाठीं झटावयाचें. जो त्याला शरण जाऊन, त्याच्यावर भरिभार टाकून कर्तव्यपालन करण्यासाठीं झटतो, त्याला त्याच्या कृपेचा सहकार मिळाल्याशिवाय केव्हांही राहाणार नाहीं. भगवंतानीं एका वाक्यांत याचें सारसर्वस्व सांगून टाकिलें आहे. ( मामनुस्मर युध्यच ) ईश्वर आपला पाठीराखा आहे. तो वरून सारें पहात आहे, या भावनेनें आम्हीं प्रत्येक गोष्ट केली म्हणजे आपली काळजी तो घेतल्याशिवाय रहाणार नाहीं.

—भवान्स जर्नलवरून साभार



# निष्ठा व सबूरी

लेखक : द. शं. टिपणीस

**मनुष्याला आपलें उच्च ध्येय गाठावयाचें असल्यास त्यानें निष्ठा व शिदोरी यांचें संपूर्ण सहकार्य मिळविल्याशिवाय त्याचा तरणोपाय नाहीं. श्रीसाईबाबांनीं आपल्या भक्तांना देऊन ठेवलेला हा एक महामंत्र आहे. या लेखांत त्याचें विशेष स्पष्टीकरण श्री. टिपणीस यांनीं उद्बोधक रीतीनें केलें आहे.**

श्रीबाबांनीं आपणास कानमंत्र द्यावा म्हणून अट्टाहासानें अन्नत्याग करून बसलेल्या म्हातारीची गोष्ट साईभक्तांना अवगत आहे. बाबांनीं कधीं कोणाला कानमंत्र दिला नाहीं कीं कधीं कोणाचे कान फुंकले नाहींत. त्यांचा उपदेश म्हणजे खुला बाजार होता. जें कांहीं कोणाला मार्गदर्शन करावयाचें तें चार चौघां देखत ही त्यांची रीत. त्यांचा उपदेश कोणीही ऐकावा व आपलें कल्याण करून घ्यावें. म्हातारीला निमित्त करून बाबांनीं जो उपदेश केला तो त्यांच्या नेहमींच्या रीतिप्रमाणें अगदीं मोजक्या शब्दांत असला तरी पारमार्थीक वाटचाल करणाऱ्या साधकाला मार्गदर्शन करणारा आहे. मला माझ्या गुरुनें कानमंत्र दिला नाहीं तर मी तरी तुला तो कोठून देऊं असें जरी बाबा म्हातारीस म्हणाले तरी तिला निमित्त करून आपल्या भक्तांसाठीं निष्ठा व सबूरीचा उत्कृष्ठ मंत्र त्यांनीं देऊन ठेवला आहे. त्यांत बाबांनीं फक्त दोन पैशांची मागणी केली आहे.

## हे दोन पैसे कसे मिळवायचे ?

निष्ठा व सबूरी हे ते दोन पैसे. तांब्याचें नव्हेत कीं सोन्या मोत्याचेंहि नव्हेत. बाबांचे पैसे आहेत ते. त्यांचें मूल्य करायला जगांतील सर्व संपत्ति अपुरी पडेल. पहिल्यानें असे पैसे आपल्यापाशीं आहेत कीं नाहींत याचा शोध घेतला पाहिजे. असले तर मग ते बाबांना देण्याचा विचार, कोट्याधिशाच्या खजिन्यांत असले दोन काय पण अर्धा पैसाहि मिळणार नाहीं. मग तुम्ही आम्ही तर पोटार्थी. कुठें असणार असले पैसे आपणांपाशीं ? पण आपण श्रमजीवि. श्रम करून आपण पैसा मिळवूं शकतों. म्हणून आपण ते अगोदर पैदा केले पाहिजेत. मग ते आपण बाबांना अर्पण करूं शकूं. हे कसें पैदा करावेत ? हें समजण्यासाठीं म्हातारीला उपदेश करतांना

बाबांनीं आपल्या स्वतःचा व आपल्या गुरुचा जो उल्लेख केला आहे तो लक्षांत घेतला पाहिजे. बाबा म्हणतात—आरंभीं तयानें मज मुंडिलें। पैसे मज दोनचि याचिले॥ मुंडण कशाचें केलें? वासना व वृत्ति यांचें. काम क्रोध, मद, मत्सर यांचें. हें आहेत तोंपर्यंत निष्ठा व सबुरी निर्माण होऊं शकणार नाहींत. शांतीच्या पोटीं सबूरीचा जन्म आहे. आपल्या मनाला शांत केलें पाहिजे. त्याचा चंचलपणा घालविला पाहिजे. त्याचें मुंडण केलें पाहिजे. हें मुंडण भक्तीनें वा नामस्मरणानें होत जातें. निष्ठा व सबूरी यांना भक्तीची वा नामस्मरणाची पार्श्वभूमि लागते. भक्तीचा वा नामस्मरणाचा तीव्रपणा जस जसा वाढत जाईल तस तशी निष्ठा व सबूरी वाढत जाईल. अशा प्रकारें हे पैसे प्रथम आपण कमावले पाहिजेत, व मग ते बाबांना अर्पण केले पाहिजेत. दुसरी गोष्ट अशी कीं, तांब्याच्या पैशांप्रमाणें हें कांहीं जड नाहींत कीं, उचलून ते आपण बाबांच्या चरणीं ठेवूं. हे पैसे आपण आपल्या अंतःकरणाच्या खजिन्यांत ठेवले पाहिजेत व सर्व अंतःकरणाच्या अंतःकरण बाबांना अर्पण केलें पाहिजे. म्हणजेच सर्व अंतःकरण बाबांनीं व्यापून राहिले पाहिजे. असें झालें तरच हे दोन पैसे बाबांना पावते होतील.

## माणसाचा देव कसा बनतो?

सबूरी हा पैसा कसा आहे तें पाहूं. सबूरी म्हणजे धैर्य किंवा धीर. म्हणजे नुसतें वाट पहाणें नव्हे. केवळ वाट पहात स्वस्थ बसल्यानें कांहीं एक निषपन्न होत नाहीं. सतत प्रयत्न म्हणजे धीर. नुसता प्रयत्न नव्हे तर आपल्या ध्येयासाठीं हालअपेष्ठा भोगाव्या लागल्या, नव्हे प्रत्यक्ष मृत्यू समोर आला तरीहि आपल्या ध्येयापासून च्यूत न होतां ध्येय प्राप्तिसाठीं झगडत राहणें म्हणजे धीर, गीतेंत भगवंतांनीं यालाच तितिक्षा म्हटलें आहे, संत सखू ही या तितिक्षेचे एक उत्तम उदाहरण आहे. विठोबाचें नांव घेण्यामुळें तिचा अनन्वित छळ झाला तरी तिनें नामस्मरण टाकलें नाहीं. धीर याचा दुसरा अर्थ बुद्धिमान—ज्ञानी असा आहे. सबूरी म्हणजे धीर व धीर द्वर्थी आहे. ईश्वरानें माणसाला दोन सर्वांत श्रेष्ठ अशा शक्ति दिल्या आहेत. ज्ञान व तितिक्षा म्हणजेच सबूरी. या दोन शक्तींच्या जोरावर माणसाचा देव होऊं शकतो. ज्ञानी व तितिक्षापूर्वक प्रयत्न करणारा मोक्षलाभास योग्य होतो. कारण त्याच्या-ठिकाणीं सहिष्णुता असूं शकते. तो सुखदुःख समान लेखतो. चांगले झालें तरी आनंद नाहीं कीं वाईट झालें म्हणून दुःख नाहीं. मान मिळाला म्हणून तो हुरळून जात नाहीं कीं अपमान झाला म्हणून त्याला विषाद वाटत नाहीं. ही वृत्ति इंद्रिय निग्रहास अत्यंत आवश्यक आहे. इंद्रिय निग्रह केल्या खेरीज परमार्थसाधन होणें नाहीं. इंद्रिय निग्रह न करणारा षडरिपूंच्या आधीन होतो, यामुळें स्मृतिभ्रंश होऊन बुद्धिनाश होतो व अंतीं सर्व नाश होतो. गीतेनें सांगितलेली ही अनर्थ परंपरा टाळण्यास सबूरी म्हणजे धीर ही शक्ति, माणसास उपयोगी पडते.

## सद्विचार रायाची राणी

सबूरीमुळें माणसाच्या मनांत चांगले विचार येतात. मन सत् म्हणजे सत्याचाच विचार करतें, परमेश्वराचें ब्रह्माचेंच ध्यान करतें. म्हणून हिला 'सद्विचार रायाची राणी' म्हणतात. सबूरी पौरुष आहे. वीरांचा पराक्रम आहे. अध्यात्मांतील सर्वांत उच्च पराक्रम म्हणजे जन्म मरणास जिंकणें हा होय. सबूरीच्या साह्यानें हा पराक्रम करतां येतो. ऐहिक व्यवहारांतही सबूरीचें अत्यंत महत्व आहे. श्री शिवछत्रपतीनें स्वराज्य स्थापन केलें खरें; पण त्यासाठीं त्याला नानाविध संकटांना तोंड द्यावे लागलें हें इतिहास जाणणारे समजतातच. शिवरायाची पराक्रमाची बैठक सबूरीवर होती. सबूरींत धैर्य व ज्ञान दोन्ही आहेत. सबूरी ही या दोहोंचें मिश्रण आहे. औरंगजेबाच्या कैदेंतून निसटण्यासाठीं शिवाजीला किती धीर धरावा लागला असेल, आपल्या भावना कशा ताब्यांत ठेवाव्या लागल्या असतील, संधीची कशी वाट पहात बसावे लागले असेल व कशा युक्त्याप्रयुक्त्या योजाव्या लागल्या असतील हें सर्व ध्यानांत घेतल्यास सबूरीचें मोल लक्षांत येईल. संभाजी सारखा व्यसनी राजाही सबूरीच्या तितिक्षेच्या जोरावर नांव कमावून गेला. औरंगजेबानें धर्मांतरासाठीं त्याचें हालहाल केले पण अंतीं कां होईना तो आपल्या तत्त्वापासून रेसभरही ढळला नाहीं. तो सबूरीच्या जोरावर. आणि गुरुगोविंदसिंगाची ती दोन लहान कोंवळी मुलें! त्यांनीं भिंतींत जिवंत समाधि स्विकारली! हें ध्यानीं घ्या म्हणजे सबूरीचें महत्व कळेल. जग प्रसिद्ध शास्त्रज्ञ व शोधक, राजकीय मुत्सद्दी यांचें जीवन शोधल्यास सबूरीनेंच त्यांना यश दिलें हे दृष्टोत्पत्तीस येईल. जगांतील इतिहासांत 'सबूरीवरी यशाचा वांटा' सांगणारी कितीतरी उदाहरणे मिळतील. सबूरीचा अभाव नेभळटपणा, भित्रेपणा यांना जन्म देतो, अशा प्रकारें अध्यात्म व व्यवहार दोहोंतहि सबूरीला उच्च स्थान आहे. जीवनाचा पट अध्यात्माच्या धाग्यांनी तसेंच व्यवहाराच्या धाग्यांनीं विणला पाहिजे. अशी बाबांची शिकवण असल्यामुळें बाबा म्हातारीला सांगतात—

१] धैर्य तीच गे बाई सबूरी। सांडू नको गे तिजला दूरी।
पडतां केव्हांही जड भारी। हीच परपारी नेईल॥

२] पुरुषांचे पौरुष ती ही सबूरी। पापताप दैन्यता निवारी।
युक्ति प्रयुक्ति आपत्ति वारी। बाजुस सारी भयभीती॥

३] सबूरी वरी यशाचा वाटा। विपत्ति पळवी बारा वाटा।
येथ अविचाराचा काटा। नाहीं ठावका कोणाही॥

४] सबूरी सद्गुणांची खाणी। सद्विचार रायाची हे राणी।
निष्ठा आणि या सख्या बहिणी। जीव प्राण दोघींशी॥

—श्रीसाई चरित्र, अ. १९ ओ. ५१ ते ५६

## मनोनिग्रहाची जरूरी

माणसानें आपल्या या सर्व श्रेष्ठ शक्तीचा उपयोग करून इंद्रियांवर जय मिळविला तरी मनावर जय मिळविण्यास ह्या शक्ति पुऱ्या पडत नाहींत. इंद्रिय निग्रह झाला तरी मानसिक भोग शिल्लक राहतोच. उदाहरणार्थ इंद्रिय निग्रहामुळें गोड खाण्यासाठीं इंद्रियें उत्सुक न राहिली, जिभेस पाणी न सुटले तरी मानासिकरित्या ही वासना मनकल्पनेनें पुरी करीत राहील. मनांत मांडे खाण्याची ही संवय मन जिंकल्याखेरीज जाणार नाहीं. यास्तव केवळ बाह्य इंद्रिय निग्रह करून काम पूर्ण होत नाहीं. तर मनोनिग्रही व्हावयास पाहिजे. प्रण त्यासाठीं केवळ धीर म्हणजे ज्ञान व तितिक्षा उपयोगी पडत नाहींत. मन ओढाळ, खट्याळ व संशयी आहे. त्याला संभ्रम होतो. अशा वेळीं मला शरण ये असें भगवंत सांगतात. ईश्वर भक्तीनें, ईश्वरावर अढळ निष्ठा ठेवल्यानेंच मन जिंकतां येईल. म्हणून ईश्वरभक्ति वा निष्ठेशिवाय चालणार नाहीं. आपले दैनंदीन व्यवहार विश्वासावर चालत असतात. मग अध्यात्मिक व्यवहार होण्यास विश्वास–निष्ठा नको असें कसें होईल ? केवळ सबूरीनें सर्व कार्यभाग होत नसून तिला अंतीं निष्ठेची जरूरी आहे.

निष्ठेमुळें एखादें मोठें कार्यहि कसें तडीस जाते याचें अगदीं अलीकडील आपल्या-समोर असलेले उदाहरण म्हणजे श्री गाणगापुरचे श्री गुरुनाथ महाराज यांचें होय. आपल्या गुरुरायाची सेवा म्हणून दर द्वादशीस येईल त्याला भोजन देण्याचें त्यांचें व्रत आहे. महाराज नेहमीं दंडवत घालीत धर्मकारणासाठीं प्रवास करीत असतात. एकदां एका जंगलांतून प्रवास करीत असतां रात्रींचा मुक्काम त्यांनीं एका खेड्यांत केला. ती एकादशीची रात्र होती. दुसऱ्या दिवशीं द्वादशी. उद्यां उदयिक माझ्या गुरुरायाला बासुंदीपुरीचा नैवेद्य पाहिजे असें त्यांनीं आपल्या बरोबरच्या लोकांना सांगितलें. रात्रीची वेळ, जंगलांतील ठिकाण, जवळ ना अन्नसामुग्री, ना भांडीकुंडी, नैवेद्य तर सूर्योदयापूर्वी झाला पाहिजे. हे कसें काय होणार याची चिंता मंडळींना वाटूं लागली. पण महाराज शांत. आपले बापुराय ( सद्‌गुरु ) सर्व करतील ही त्यांची निष्ठा. त्या एकादशीच्या रात्रीं असें कांहीं योगायोग जुळून आलें कीं भांड्याकुंड्यांसकट सर्व सामान त्या ठिकाणीं आलें व महाराजांनीं सूर्योदयापूर्वी आपल्या बापुरायाला, गुरुरायाला बासुंदी-पुरीचा नैवेद्य दाखविला व त्या जंगलांत ४००–५०० लोकांना द्वादशीचें भोजन दिलें. प्रत्येक द्वादशीच्या वेळीं ही त्यांची निष्ठा दृष्टोत्पत्तीस येत असते. जाज्वल्य निष्ठा बिकट परिस्थितींतही कार्य कसें यशस्वी करतें हें यावरून ध्यानीं येईल. निष्ठेशिवाय सबुरी नाहीं व सबुरी शिवाय निष्ठा फळाला येत नाहीं. दोघीही जिवलग मैत्रीणीच जणूं कांहीं, म्हणून बाबा सांगतात–निष्ठा आणि या सबुऱ्या बहिणी । जीव प्राण दोघींसी ॥

# माणसाविरुद्ध पशुपक्षांची तक्रार !

**माणसानें माणसाप्रमाणें वागण्यांत त्याचें थोरपण व माणुसकी आहे. श्रीसाईबाबांचा श्रेष्ठ धर्म म्हणजे माणुसकीनें वागण्याचा. तो जर माणसानें सोडला तर पशूंत आणि त्याच्यांत फरक तो काय राहिला? माणसांत व जनावरांत मोठा फरक आहे. माणसानें तो जाणून घेऊन त्याप्रमाणें वर्तन ठेविलें तर माणूस ! नाहीं तर?**

## कोल्ह्यानें घंटा वाजविली

कोल्हा हा खरोखर मोठा धूर्त प्राणी आहे. जनावरांत धूर्तपणामध्यें त्याची बरोबरी कोणीही करूं शकणार नाहीं. परंतु माणसाच्या शहाणपणापुढें व धूर्तपणापुढें त्याचा काय पाड लागणार? परंतु सर्वत्र माणसांची वहावा होत असलेली पाहून त्याला हेवा वाटूं लागला. सर्व प्राण्यांस ईश्वरानें निर्माण केलें आहे. त्यांत माणसाचीच एवढी मातब्बरी काय म्हणून? माणसांत दुर्गुण काय कमी आहेत! आणि असें असतां जिकडे-तिकडे माणसांचा गौरव. आम्हांला कोणी विचारीत नाहीं. तें कांहीं नाहीं. स्वस्थ बसून चालणार नाहीं. या गोष्टीचा एकदां सोक्षमोक्ष लावून घेतलाच पाहिजे. माणसापेक्षां बुद्धीनें मी काय कमी आहें! दुसऱ्याला फसविण्याच्या बाबतींत मी कोणालाहि हार जाणार नाहीं. ‘ कोल्हा आणि बुद्धीनें भला ’ असें म्हणतात ते का उगाच ! पाहिजे कशाला माणसाची एवढी मिजास ! मी ईश्वराचा एक प्राणी तसाच तोहि आहे ! माझी माणसाबरोबर तुलना केली तर काय दिसून येईल ? माणूस हा प्राणी किती अधाशी, स्वार्थी व आपमतलबी आहे बरें ! त्याला कपडेलत्ते किती लागतात, तो खाण्या-पिण्याच्या बाबतींत केवढी उधळपट्टी करतो ! मला का थंडीवारा लागत नाहीं ! परंतु मीं सारें कसें निमूटपणे सहन करतों ! मला पावसाळ्यांत छत्री लागत नाहीं. व रेनकोटही लागत नाहीं. प्रखर सूर्यकिरणांपासून संरक्षण करण्यासाठीं मला काळे निळे चष्मेहि लागत नाहींत ! एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जायचें झालें तर मला मोटार नको, आगगाडी नको व बस गाडीही नको. वाहनाशिवाय माझें चालू शकतें. अहो ! मी काय किंवा माझ्या वर्गातील इतर माझे जातभाई काय, आमच्या ठायीं थोडे थोडके का गुण आहेत ! परंतु कोण घेत आहे त्यांची दखल ! तें कांहीं नाहीं. ईश्वराच्या राज्यांत हा केवळ अन्याय आहे. तो आपण यापुढें तरी चालूं द्यावयाचा नाही. त्याचा निर्णय एकदांचा लावून घेतलाच पाहिजे. ‘ केल्यानें होत आहे रे ! ’ आपण आजवर निमूटपणें हा अन्याय सहन केला, यापुढें तो आपण सहन करावयाचा नाहीं. ’

## हत्तीकडे नेतृत्व

असा स्वतःशीं निर्णय ठरवून कोल्हा बाहेर पडला व सैरावैरा इकडे तिकडे धावूं पळूं लागला. त्याला साऱ्या जनावरांत प्रचार करून त्यांचा 'उठाव' करावयाचा होता. त्याच्या विचाराशी सहमत होणारे पुष्कळ प्राणी त्याला भेटले. पक्षीही सामील झाले. मोठेपणा कोणाला नको का असतो ? कोल्होबांच्या प्रयत्नांनीं तो मिळत असला तर तो पदरांत पाडून कां घेऊं नये ?

आपल्याशीं सहमत होणारे जितके जातभाई मिळवितां येतील तेवढे कोल्ह्यानें मिळविले. कोल्हा मोठा धोरणी. शिष्टमंडळी जमली; परंतु त्याचें पुढारीपणा त्याला स्वतःकडे ओढून घ्यायचें नव्हतें. त्यांत स्वार्थ दिसून आला असता. मग त्यानें काय केलें ? हत्तीदादा शरिरानें जाडजूड ! शांत व कोणतीही गोष्ट सबुरीनें करणारा ! त्याच्याकडे पुढारीपण सोंपविण्यांत आलें. त्यानें सर्वांचे विचार ऐकून घेतले व मोठा शहाणपणाचा सल्ला त्यानें सर्वांना दिला. हत्तीदादा म्हणाला, 'तुमच्या विचारांत तथ्य आहे असें मलाहि वाटतें. तरीही आपण शहाण्यासुरत्या व निःपक्षपाती व्यक्तींचा सल्ला घेऊन पुढें पाऊल टाकूं या. तुम्ही या सारे माझ्याबरोबर. त्या पलिकडच्या जंगलांत एका झोपडींत कोणी एक संन्यासी रहातो. तो कधी कोणाच्या वाटेला जात नाहीं. कोणाच्या आड येत नाहीं. जेव्हां पहावें तेव्हां देवाच्या भजन पूजनांत तो दंग असतो. त्याच्या ठायीं स्वार्थ बिलकुल नाहीं. माणूस असो पशु असो किंवा पक्षी असो. तो सर्वांकडे सारख्या नजरेने पहातो. तो आपणांस योग्य सल्ला देईल. आपण त्याच्यापुढें आपलें म्हणणें किंवा गाऱ्हाणें मांडूंया तो सांगेल त्याप्रमाणें वागूं या.'

## संन्याशाचें सौजन्य

हत्तीचा हा सल्ला सर्वांना पसंत पडला. सर्वांनी त्याला संमति दिली. आणि सारे जण त्या संन्याशाच्या झोंपडी सभोंवार गोळा झाले. हत्तीनें सर्वांचा परिचय करून दिला व एवढ्या जमावानें येऊन त्रास देण्याचें कारणही अत्यंत नम्रपणे निवेदन केलें.

संन्यासी शांत वृत्तीने सर्वांचें म्हणणें ऐकून घेऊं लागला. प्रथम पुढें आला तो कुत्रा ! भुंकत भुंकत मुजरा करून तो म्हणाला, स्वामीजी ! मी कृतज्ञतेचें प्रतीक आहें असें तुम्हीं कबूल कराल. एवढी कृतज्ञता तुम्हांला कोणा एखाद्या माणसांत आढळणार नाहीं. माणूस माझ्याशीं किती कृतघ्नपणे वागतो. मला झोडपतो, बांधून ठेवतो. धड मला खायलाही देत नाहीं. त्याच्या मर्जीला आलें तर शिळेपाके भाकरीचे तुकडे माझ्या अंगावर फेकतो. परंतु एकदां ज्याचें अन्न खाल्लें त्याच्याशीं इमानेंइतबारें वागावयाचें हा माझा धर्म आहे. तो धर्म मी कसोशीनें पाळीत असतों. धन्यासाठीं प्रसंगोपात प्राण देण्याचीही माझी तयारी असते. परंतु माणूस कसा आहे पहा ! त्याच्यावर तुम्हीं कितीही उपकार करा. आणि एखादा अपकार करून पहा. सारे उपकार विसरून तो तुमचा सूड घ्यायला तयार होईल. एखाद्या क्षुल्लक्ष अपराधाची

गय न करतां तो वाटेल त्या थराला जाईल. असा जो अवगुणी त्या माणसाला एवढें महत्त्व कां बरें प्राप्त व्हावें ? जनावरापेक्षां त्याला श्रेष्ठत्व कां म्हणून ?'

## गोमातेची तक्रार

गरीब गाय ! परंतु तिलाही यावेळीं चीड आलेली होती. माणूस माझी बाहेरच्या बाहेर वरात काढीत असतो. कुठें तरी व कोणाच्या तरी कुरणांत मी चरावयाचें. मालकाचा मार खावयाचा. घरीं आल्यावर घराबाहेर असलेल्या घाणेरड्या जागीं स्वतःला बांधून घ्यावयाचें. मालक लहरीप्रमाणें गवत पाणी काय देईल तें खावयाचें. पोट भरतेंच असें नाहीं. आणि मालकाला पौष्टिक असें दूध द्यावयाचें ! आमच्या लाडक्या वासरांची त्यानीं खुशाल उपासमार करावी. आम्हीं तें निमूटपणें सहन करावें. आमची बाळें भुकेनें तडफडलीं तरी त्याच्या बाळांचें आम्हीं पोषण करावयाचें ! बरें ! ओटींत दूध असेपर्यंत आम्ही देत रहातों. सगळे दिवस सारखे नसतात. असा एक काळ येतो की आमचें दूध आटतें. दूध मिळेनासें झालें म्हणजे आमची कवडीपेक्षांही कमी किंमत होते ! कोणी विचारीत नाही. आम्हांला कवडी मोलानें एखाद्या खाटकाला विकून टाकतात! आणि अशा त्या मनुष्य प्राण्याला किती चढवून ठेवण्यांत आलें आहे ! हा काय न्याय झाला ?

## कावळ्याचें काव काव

एकेक जण पुढें सरसावत होता. कावळ्याने काव काव करीत आघाडी मारली. मोठ्याने ओरडून तो म्हणाला, 'माणसाला उगाच उच्च स्थानावर बसविण्यांत आलें आहे. त्याला जेथें तेथें स्वार्थ दिसतो. दुसऱ्याची त्याला बिलकुल पर्वा नाहीं. त्याला स्वतःचा तळीराम गार करायचा असतो. आमचें पहा ! कोणी एखादा अन्नाचा घांस किंवा भाकर तुकडा बाहेर फेकला असतां आम्ही काव काव करून साऱ्या कावळे बंधूंना एकत्र जमवितों व जें कांहीं असेल तें सर्वांत वाटून बिभागून खातों. माणूस किती स्वार्थी आहे पहा ! त्याला कितीही मिळूं द्या; कधीं समाधान म्हणून नाहीं. आणखी हवें. आपलें कोणाला द्यायचें नाहीं आणि दुसऱ्याचें वाटेल त्या मार्गांनें हिसकावून घ्यायचें ! असल्या आपलपोट्या व अधाशी माणसाची एवढी मातब्बरी कां वाढवून ठेवण्यांत आली आहे, हे समजणें कठीण आहे.'

प्रसंग मोठा गंभीर होता. माशालाही चीड आली होती. परंतु त्याच्यांत बेहोषी मात्र आली नव्हती. तो म्हणाला 'स्वामी महाराज ! माणूस हा आमच्यापेक्षां योग्यतेनें कमी आहे असें मी म्हणूं शकत नाहीं; परंतु शहाणपणापेक्षां त्याच्याठायीं मूर्खपणाचा भाग अधिक आहे असें मला वाटतें. आम्हीं कोणत्याहि प्रकारें माणसाला अपाय करीत नाहीं. उपकार करतों. तलाव, सरोवरें, डबकीं, सारीं आम्हीं स्वच्छ ठेवतो त्यांतील घाण आम्हीं खातों व स्वच्छ पाणी माणसाला मिळावें म्हणून जपतों. अशा स्थितींत आमचें संरक्षण करण्याचें सोडून माणूस आमचा चट्टामट्टा करून टाकतो ! असल्या स्वार्थी व मूर्खपणाचा व्यवहार करणाऱ्या माणसाला एवढें महत्त्व कां म्हणून ?'

### उंटाचें शहाणपण

माशाची ही विचारसरणी उंटाला फार आवडली. त्याच्या अगदीं पथ्यावर पडलें तें बोलणें! मोठ्या तोऱ्यानें पुढें पाऊल टाकीत उंट म्हणालें, 'स्वामीजी माशानें अगदीं माझ्या मनांतील विचार आपल्यापुढें मांडले. मी तरी त्यापेक्षां अधिक काय सांगणार? मला माणसानें किती हीन दशेला आणून सोडलें आहे पहा ना! मी ओझें वहात रहावयाचें? आणि तें किती? त्याला ताळतंत्र कांहीं नाहीं. सबुरी हा माझा ईश्वरदत्त गुण आहे. तो पदोपदीं कसोटीला लागत असतो. अपमान, मारझोड सारें कांहीं निमूटपणें सहन करावयाचें. डोंगर माथ्यावर रहाणारें लोक आमच्या अभावीं मरून जातील. वाटेल तेवढें ओझें घेऊन आम्हीं वाटेल त्या कड्यावरून चढतों उतरतों. माणसांना अन्नपाणी वाटेल तेवढें पुरवितों; परंतु स्वतः मात्र अन्नपाण्याविणें वाटेल तेवढे दिवस ढकलीत रहातों, कुरकुर नाहीं, तक्रार नाहीं. आणि त्याचा मोबदला! मारझोड आणि उपासमार! अशा कठोर वृत्तीच्या माणसांना या जगांत एवढे मानाचें स्थान कां म्हणून दिलें जावें?"

### हरीण आणि मोर

हरीण किती गरीब व शांत! त्यालाही या प्रसंगानें बोलकें केलें. तें पुटपुटत होते. '"महाराज! आपण व आपल्या वर्गातील असंख्य लोक ज्या पवित्र व मऊ कातड्यावर सुखानें बसून देवाची प्रार्थना करतां तें कातडें आम्हीं पुरवितों. माणसाच्या कातड्याचा अशा रीतीनें कधीं कोणी सदुपयोग केल्याचें आपल्या ऐकिवांत आहे का! आमच्या डोळ्यांचें सौंदर्य सर्वत्र वाखाणलें जातें. आमच्या शिंगानीं माणूस आपलें दिवाणखाने शोभवितो आणि आम्हीं कस्पटाप्रमाणें मानले जातों! आहे कीं नाहीं खासा न्याय!'

"अगदीं माझ्या मनांतील गोष्ट सांगितलीस तूं हरीणताई!" आपला पिसारा डौलानें नाचवित मयूरपंत पुढें सरसावून म्हणाले. पहा ना माझीं पिसे किती नयनरम्य आहेत तीं! सुंदरपणांत यांची बरोबरी कोण करूं शकणार आहे? भगवान् श्रीकृष्णानें सुद्धां आपल्या शिरोभूषणांत माझ्या पिसाची अग्रभागी योजना केली आहे. केवढें माझें भाग्य! वाहन म्हणूनही देवानीं माझा उपयोग केलेला आहे. मंत्रतंत्र करणारे पिशाच्यांची हकालपट्टी करण्यासाठीं माझ्या पिसांचा उपयोग करतात. माणसाचें कातडे, केस किंवा कांहींही अशा रीतीनें उपयोगांत आणिलें जातें का! मग माणसाचा एवढा वरचढपणा कां म्हणून?"

"दिवसा त्याचप्रमाणें रात्रींही मला दिसूं शकतें! एकातरी माणसांत ही शक्ति आढळून येईल का?" मांजरानें हळूच आपली बाजू पुढें मांडली.

### गजराजांचा पोक्तपणा

गजराज बोलले, परंतु सर्वांच्या मागून त्यांनीं अत्यंत धिमेपणाने आपली बाजू मांडली. "स्वामी महाराज! आम्हीं मोठ्या आशेने व श्रद्धेनें आपल्याकडे आलों आहोंत.

आमच्या मंडळीचें गाऱ्हाणें आपण शांतपणें ऐकून घेतलें, याबद्दल आपले आभारी आहोंत. माझें अचाट सामर्थ्य आपण जाणतां, जें माणसाला शक्य नाहीं तें शक्तीच्या बळावर मी पार पाडूं शकतों. माझा देहच तसा धिप्पाड आहे. माझ्या शहाणपणासंबंधीं मी काय सांगूं? हस्तिदंत एवढेच नव्हे, तर माझ्या हाडांपासूनही सुंदर व डोळ्यांना आल्हाद देणाऱ्या नाना प्रकारच्या वस्तू बनविल्या जातात. आणखीहि पुष्कळ सांगतां येण्यासारखें आहे. माझ्याबरोबर आलेल्या माझ्या मित्र परिवारानेंही आपणास पुष्कळ सांगितलें आहे. मी त्यांच्याशीं सहमत असलों तरी एक गोष्ट मला नजरेआड करतां येण्यासारखी नाही. माणूस एवढें आधिपत्य भोगतो आहे त्याला तसेंच कांहीं तरी कारण असलें पाहिजे, असें माझ्या मनाला वाटतें. आपण समर्थ अहांत. कृपा करून आमची बरोबर समजूत घाला. शंकेचें निवारण करा. आम्हीं आपणास शरण आलों आहोंत."

## संन्याशाचा निर्णय

त्या संन्याशानें धीरगंभीरपणें सभोंवार नजर टाकिली. ती कृपादृष्टि होती. ते म्हणाले, "या जंगलांतील माझ्या भावांनो व बहिणीनों, मी काय म्हणतों तें कृपा करून लक्षपूर्वक ऐका. तुमच्यापैकीं प्रत्येकानें जें जें सांगितलें तें सर्व खरें व कोणालाही पटण्याजोगें आहे. त्यांत चुकीचे असें कांहीं नाहीं. परमेश्वरानें मनुष्यप्राण्याला एक और चीज बहाल केलेली आहे हे तुम्हीं विसरतां. ती कोणती? सारासार बुद्धी! योग्य कोणतें, अयोग्य कोणतें हे जाणण्याची शक्ति माणसांत आहे. हित कोणतें व अहितें कोणतें हे माणूस—विचारी माणूस समजूं शकतो. तुमचें तसें नाहीं. सत्य कोणतें असत्य कोणतें पथ्यकर कोणतें व अपथ्यकर कोणतें हें जाणण्यास तोच समर्थ आहे. माणूस देवाची भक्ति करूं शकतो. स्फूर्ति मिळवूं शकतो. भक्तिभावाच्या बळावर तो सोपानाच्या पायऱ्या चढूं शकतो. आपल्या बुद्धि व भावबळाच्या जोरावर तो वाटेल तेवढा उंच चढूं शकतो व निर्वाणपद मिळवू शकतो. मात्र त्यानें मनावर ताबा ठेवून आपल्या ध्येयावर सारें लक्ष लाविलें पाहिजे."

"आणि तसें त्याने नाहीं केलें तर?" हा प्रश्न लबाड व धूर्त कोल्ह्यानें केला.

"वाहवा! कोल्होबा! तुम्हीं बहार केली! योग्यवेळीं योग्य प्रश्न!" संन्याशी शेवटीं म्हणाले, "जर का माणसानें आपल्या बुद्धीचा, सारासार विचार शक्तीचा व भक्तीचा योग्य व जरूर तो उपयोग केला नाहीं तर तो पशूपेक्षांही खालच्या पायरीला त्याला बसावें लागेल. मग पशूंबरोबरही त्याची तुलना करतां येणार नाहीं. माणसाच्या जन्माला येऊन पशूपेक्षांही हीन मार्गानें जाणारे नराधम या जगांत वावरत आहेत."

सर्वांचें समाधान झालें व स्वामीमहाराजांचा जयजयकार करीत सर्वजण आपापल्या निवासस्थानीं गेले.

# नारदाचा गर्वपरिहार

**भगवान् रामकृष्ण परमहंस यांचीं बोधवचनें म्हणजे उपनिषदेंच होत. श्री. सी. राजगोपाळाचारी यांनीं त्यांस सुंदर साज चढविला असून, आमच्या वाचकांसाठीं त्याचा सुबोध अनुवाद क्रमशः देण्यांत येत आहे.**

एकदां नारदाच्या अंतःकरणांत गर्वानें घर बांधलें! माझ्यासारखा भगवद्भक्त मीच असें त्याला वाटूं लागलें. भगवंताला या गोष्टीची जाणीव झाल्याशिवाय कशी राहील? नारदासारख्याचा गर्वपरिहार हा झालाच पाहिजे. भगवंताची व त्याची भेट झाली तेव्हां भगवान् त्याला म्हणाले, 'बा नारदा! मी तुझ्यावर एक कामगिरी सोपवीत आहें. पृथ्वीतलावर जावयाचें आहे. तेथें माझा एक परमभक्त रहातो. त्याचा परिचय करून घे. त्याच्या ठायीं असलेले गुण पहा! आणि मग परत वैकुंठांत ये. त्यामुळें तुझें कल्याण होईल.'

'ठीक आहे!' भगवंताची आज्ञा मला शिरसावंद्य केलीच पाहिजे. ' नारदमुनी स्वतःशींच म्हणत होते. 'त्याप्रमाणें मी पृथ्वीतलावर जाईन व त्या भक्तामध्यें कोणते खास गुण आहेत तें तरी पाहून येईन. या जगांत माझ्यासारखा भक्त कोणी तरी सांपडणं शक्य आहे का? ठीक आहे. पाहूं तरी काय आश्चर्य आहे तें! पहायला काय जातें!'

## नारदाचें पृथ्वीवर आगमन

त्यानंतर नारदाची स्वारी पृथ्वीतलावर उतरली. त्यानें तो भक्त शोधून काढला. एका लहानशा घरांत रहाणारा तो एक कष्टाळू शेतकरी होता. नारद त्याचा नित्याचा कार्यक्रम पहाण्यासाठीं तेथें राहिले. तो शेतकरी भल्या पहांटे उठला. उठल्याबरोबर त्यानें हरिनामस्मरण केलें. आणि खांद्यावर नांगर टाकून त्यानें सरळ आपल्या शेतवाडीचा मार्ग धरला. तेथें सारा दिवसभर तो कष्टत होता. कुटुंबासाठीं दिवसभर काबाडकष्ट करून सायंकाळीं तो घरीं परतला. पुन्हां झोंपी जाण्यापूर्वी त्याला हरीची आठवण झाली.

नारदानें हें सर्व बारकाईनें पाहिलें. आणि मग स्वतःशींच म्हणाला, 'आणि हा म्हणे माझ्यापेक्षां श्रेष्ठ भगवद्भक्त आहे! काय सांगायचें आणि काय बोलायचें! दिवसांतून फक्त दोनदां त्यानें हरीची आठवण केली! बस्स! आणि तेवढ्यावर तो झाला भक्त!' नारद हंसला. दुसऱ्या दिवशीं तो शेतकरी काय करतो तें पहाण्यासाठीं नारद तेथेंच थांबला.

आणि काय आश्चर्याची गोष्ट पहा ! दुसऱ्या दिवशींहि तोच प्रकार ! त्यांत कांहीं एक फरक नव्हता. 'बस्स ! एवढ्यानें भक्ति कां होत असते !' नारद स्वतःशींच आश्चर्यानें पुटपुटत होता. नंतर तो वैकुंठांत येऊन विष्णूला भेटला.

### तो कसला भक्त

विष्णूला वंदन करून नारद म्हणाला, 'भगवंता ! तुझा तो भक्त मी पाहून आलों. मला तो तुझा मोठा भक्त आहे असें वाटलें नाहीं. सदान् कदा तो आपल्या शेतीच्या कामांत गर्क होता. माझी मस्करी करण्यासाठीं मला त्याच्याकडे पाठवलंत का ?

विष्णूनें काय केलें ? तेलानें भरलेला एक प्याला नारदाच्या हातीं देऊन त्याला सांगितलें कीं, "हें पहा ! नारदा ! हा प्याला तेलानें कांठोकाठ भरलेला आहे. काळजी घे. तो हातांत घेऊन एकदां पृथ्वी प्रदक्षिणा करून ये. तुझा प्रवास चालू असतां त्या पेल्यांतील एकही थेंब खालीं पडणार नाहीं याची दक्षता बाळग बरें !"

भगवन्तानें सांगितल्याप्रमाणें नारद वागला. तो यश घेऊन परत आला. त्या पेल्यांतलि एकही थेंब त्यानें खालीं पडूं दिला नाहीं. खरंच; केवढी ही कर्तबगारी ! नारदालाही त्यामुळें समाधान वाटत होतें.

### माझी आठवण ?

त्याला पाहून भगवंत म्हणाले, "वाहवा ! सांगितल्याप्रमाणें पृथ्वीपर्यटण करून तूं आलास. ठीक आहे. परंतु तुला एक गोष्ट मला विचारावयाची आहे. तूं हातांत तेलानें भरलेला प्याला घेऊन पृथ्वीला प्रदक्षिणा घालीत असतां, माझी आठवण तुला किती वेळां झाली ? सांग पाहूं !"

'भगवंता ! हें काय विचारणें ! पेल्यांतील तेलाचा एकही थेंब खालीं न सोडतां मला प्रवास करावयाचा होता. किती कठीण गोष्ट होती ती. सारें लक्ष मला त्या पेल्याकडे लावून प्रवास करावा लागत होता. मग तुझी आठवण मला कशी बरें व्हावी ?' नारद म्हणाला.

'नारदा ! त्या तेलानें भरलेल्या पेल्यावर सारें लक्ष लावून ठेवावें लागल्यामुळें तुला माझें स्मरण करणें शक्य झालें नाहीं. ठीक आहे. तूं ज्ञानी आहेस. तुझ्यासारख्या ज्ञानवंताची ही स्थिति, मग तुझ्या तुलनेनें त्या गरीब अशिक्षित शेतकऱ्याच्या स्थितीकडे तूं जरा पहा ! साऱ्या कुटुंबाच्या पोषणाचा भार त्याच्या शिरावर. सारें लक्ष त्या उद्योगाकडे लागून राहिलेलें; असें असतांही तो शेतकरी निदान दिवसांतून दोनदां तरी माझें स्मरण करीत होता. त्याच्या भक्तिभावाची आतां तरी तुला कल्पना आली का ? त्याची भक्ति श्रेष्ठ कोटींतील आहे असें नाहीं का वाटत तुला ?'

नारदाचा नक्षा साफ उतरला. त्याला स्वतःबद्दल अभिमान वाटण्याऐवजीं लाज वाटूं लागली.

× × ×

## स्त्रीमोह कसा टाळावा ?

स्त्रीमोहाच्या जाळ्यांत ओढाळ मन सांपडण्याचा फार संभव असतो. त्या गोत्यांत तें सांपडलें म्हणजे तें सैरावैरा बोकाळूं लागतें. फार वाईट स्थिति असते ती ! स्त्री–सुखोपभोगाला लालचावलेलें मन कोणते प्रताप गाजवील हें सांगतां येणें कठीण असतें. तीच मोठी आणीबाणीची वेळ असते. त्यावेळीं सावधानतेनें वागणें, शक्य त्या परीनें मनावर ताबा ठेवणें, त्याला रोखून धरणें ही अवघड कामगिरी आपण दक्षतेनें पार पाडिली पाहिजे. अशावेळीं जो दक्षता बाळगील तोच तरून जाईल. अशावेळीं मनाला सबुरीचा संदेश देऊन मन सद्विचारांकडे प्रयत्नें करून वळविलें पाहिजे. या प्रयत्नांत आरंभकाळांत फारसें यश येणार नाहीं; म्हणून का निराश व्हायचें ? पुन्हां पुन्हां प्रयत्न करावयाचा. आणि मग यश मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं. देव दयाळू आहे. अशावेळीं त्याला शरण जावयाचें; त्याची करुणा भाकावयाची. भगवन्ता, तूंच माझा त्राता, माझा सखा, माता आणि पिता सारें कांहीं तूंच आहेस. मी तुला शरण आलों आहे. माझें मन तुझ्या चरणीं तल्लीन होऊन राहूं दे. प्रभो ! माझ्या मनांत पापी विचारांस थारा देऊं नकोस. तुझ्या चिंतनानें माझें मन पुण्यपावन होऊं दे, अशी प्रार्थना करावयाची. देवी भगवती सदासर्वकाळ दृष्टीसमोर ठेवावयाची. साऱ्या स्त्रिया म्हणजे त्या देवतेचीं स्वरूपें आहेत असें मानावयाचें. त्या जगन्मातेचें स्मरण तुम्हांला तारक होऊन राहील. नेहमीं श्रीरामचंद्राचें, वासुदेवाचें किंवा आनंदकंद गोविंदाचें नामस्मरण करीत रहावें. अशा नामसंकीर्तनामुळें आपला फायदाच होत असतो.

## भगवन्नामाचा उपयोग

रोगपरिहार करणारीं अशीं कांहीं औषधें असतात. त्यांचा वापर केल्यानें हटकून गुण येत असतो. त्याप्रमाणें आपल्या मनांतील मळ धुवून टाकण्यासाठीं भगवन्नामाचा फार चांगला उपयोग होत असतो. भगवंताचें, तुम्हांला आवडणारें कोणतेंही नांव तुम्हीं भक्तिभावानें घ्या. त्याचें इष्ट फळ पदरांत पडल्याशिवाय रहाणार नाहीं.

श्री रामकृष्ण परमहंस यांच्याकडे एकदां एक गृहस्थ आले आणि म्हणाले, 'काय करावें ? भगवंताचें नांव घेण्यांत मला मुळींच गोडी वाटत नाहीं ! असें कां बरें व्हावें ?'

यावर परमहंस म्हणाले, 'बाबा रे असा निराश होऊं नकोस. देवाकडे लक्ष वळीव. त्याची प्रार्थना कर. त्याची करुणा भाक. 'तुझ्या नांवांत मला गोडी वाटूं दे.

तुझी आठवण उठतां बसतां होऊं दे,' अशी मनापासून प्रार्थना केली असतां ती आज नाहीं उद्यां फळास आल्याशिवाय रहाणार नाहीं.

आपण भगवंताशीं आपलें नातें जोडलें पाहिजे. तोच माझा पिता, माता, बंधु, सखा, सर्व कांहीं तोच आहे. माझी काळजी त्याला. मी मात्र त्याला सर्वभावें आठविलें पाहिजे. भगवंताची नांवें एक दोन का आहेत, किती तरी आहेत. त्यांपैकीं जें तुमच्या आवडीचें असेल तें नांव घ्या. मनापासून घ्या. तो नामोच्चार सतत करण्याचा परिपाठ ठेवा. त्यांत गोडी वाटूं द्या. मग पहा, त्याचा काय परिणाम होतो तो! जों जों दिवस लोटत जातील तों तों त्या नामस्मरणांत तुम्हांला अधिकाधिक गोडी वाटूं लागेल.

## पारडें जड झालें

तुमच्या वांट्यास कधीं तरी आजारीपण आलें असेल नाहीं कां? आजारांत पहिल्या पहिल्यानें अन्नाची गोडी वाटत नाहीं, तोंडाला रूचीच नसते मुळीं! आणि मग आस्ते आस्ते गोडी वाटूं लागते आणि गोडी वाटूं लागली म्हणजे मग आपली प्रकृति सुधारण्याच्या मार्गाला लागते.

देव आणि त्याचें नांव एकमेकांपासून भिन्न का आहे? तुम्हांला असेलच माहीत कीं, भगवान् श्रीकृष्णाची एकदां तुला करण्यांत आली होती. तराजूच्या एका पारड्यांत श्रीकृष्ण बसले व दुसऱ्या पारड्यांत रुक्मिणीनें एक तुळसीचें पान व त्यावर भगवंताचे नांव लिहिलेलें असें ठेवून दिलें. तें पारडें वजनामुळें अधिक खालीं वाकलें. असा आहे नाममहिमा!

चैतन्य म्हणत असत कीं, भगवंताचें नांव हें एखाद्या बी बियाण्यासारखें आहे. तें कुठेंहि दडलेलें असो. तें रुजल्याशिवाय, मूळ धरल्याशिवाय रहाणार नाहीं. एखाद्या राजवाड्याच्या उंच मनोऱ्यावर एखादें बीं दीर्घकाळ पडलेलें असतें. ती इमारत कालांतरानें कधीं तरी कोसळून पडते, त्यावेळीं तें बी जमिनीवर पडतें. त्यावर पाऊस पडतो. बीं रुजूं लागतें. त्याचें रोपटें बनतें व हां हां म्हणतां त्याचें रूपांतर वृक्षांत होतें. त्याला फुलें येतात आणि फळेंहि येऊं लागतात.

भगवंताच्या नांवाचें तसेंच आहे. ते घेणाऱ्यास त्याचें फळ कधीं ना कधीं मिळणारच मिळणार.



# भक्तिभावांत वेठ नको

—श्री. आप्पाराव

संत तुकोबाराय मोठे धोरणी व सभोंवारच्या वस्तुस्थितीचें बरोबर आकलन झालेले सत्पुरुष होते. आपली काय, किंवा इतरेजनांची काय भक्ति फळास कां येत नाहीं, याचें अचूक कारण त्यांनीं बरोबर ओळखलें होतें. भक्ति व्यवसायांत वेठ ही अत्यंत हानिकारक आहे असें त्यांनीं पुढील अभंगांत सांगितलें आहे.

तळमळी चित्त दर्शनाची आशा ।
बहु जगदीशा करुणा केली ॥ १ ॥
वचनींच संत पावले स्वरूप ।
माझें नेदी पाप योगा येऊं ॥ २ ॥
वेठी ऐसा करीं भक्ति वेवसाव ।
न पावेचि जीव समाधान ॥ ३ ॥
तुका म्हणे कई देसील विसांवा ।
देवराया धांव घेतें मन ॥ ४ ॥

## भेदी आड कोण बरें येतें ?

संत तुकोबानीं या अभंगांत दोन अत्यंत महत्वाच्या गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांकडे आमच्या वाचकांचें लक्ष वेधविणें जरूर वाटतें. पहिली गोष्ट म्हणजे जे जे संत पुरुष होऊन गेले त्यांनीं तुझ्या नामाचा आधार घेऊन, तुझें पवित्र व पुण्यपावन नाव जपतां जपतां आपला उद्धार करून घेतला. त्यांना स्व-स्वरूपाची ओळख पटली व तुझ्या स्वरूपांत ते विलीन होऊन गेले. तुझें स्वरूप आकलन करणें, तद्रूप होऊन जाणें हेंच तर साधावयाचें आहे. आणि तें नामसंकीर्तनाच्या सहाय्यानें शुक नारद सनकादि ऋषी मुनीनीं प्राप्त करून घेतलें. भगवंता ! मला हें समजत का नाहीं ? परंतु काय सांगूं ! माझ्याकडून तुझें नामसंकीर्तन जसें घडलें पाहिजे तसें घडत नाहीं.

तसें घडत नाहीं म्हणजे कसें ? असें कोणतें पाप तुझी व माझी भेट होण्याच्या आड येत असतें बरें ? मला समजलें आहे. भक्तीभावाचा हा व्यवसाय वरवरचा असून चालत नाहीं. त्यांत अंतःकरण ओतलें गेलें पाहिजे. येथें वेठ वापरून चालत नाहीं. आमची ही सारी वेठ चालली आहे. वेठ म्हणजे काय माहीत आहे!

समजून घेण्यासारखा शब्द आहे तो ! तुकोबारायानीं या ठिकाणीं अगदीं समर्पक शब्द वापरला आहे.

## केवळ जुलमाचा रामराम !

वेठ म्हणजे बिगार ! आणि बिगार म्हणजे काय ? हा प्रश्न आलाच. श्रीमंत लोक किंवा फिरतीवर असलेलें अधिकारी आपल्या सुखासाठीं व चैनीसाठीं गोरगरिबां-कडून सक्तीनें वाटेल तशीं शरीरकष्टाचीं कामें करून घेत असत. पोटासाठीं जगदीशा। आम्हां फिरविशी दाहीदिशा ।। अशी त्यांची स्थिति झालेली ! त्यांचा कोंडमारा झालेला ! त्यांनीं तीं कामें करावींच लागत; त्यांचा मोबदला मिळावयाचा, तो केवळ नावापुरताच ! कधीं कधीं मिळायचाहि नाहीं ! अशा स्थितींत जें कांहीं काम केलें जातें त्यांत तें करणाऱ्याचें अंतःकरण असणें शक्य आहे का ? त्यांत अंतःकरण मुळींच नसतें. तो केवळ जुलमाचा रामराम असतो ! आणि जें काम मनापासून केलें जात नाहीं तें ठीक कसें होईल ?

तेव्हां आमचा 'भक्तिवेवसाव' वेठीचा झालेला आहे ! देवाची भक्ति करावी असा आव आणावयाचा. भक्तीचें मोठें अवडंबर माजवावयाचें ! देखावा करावयाचा. सभोंवारच्या लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकावयाची ! परंतु देव आंधळा का आहे ? त्याच्या डोळ्यांत धूळ फेकून त्याला आंधळा कोण करणार ? लोकांची फसवणूक तुम्हीं करूं शकाल परंतु देवाची फसवणूक तुम्हांला करतां येईल का ?

आणि हे सारे उद्योग कशासाठीं ? देवानें तुमच्या डोक्यावर धोंड का ठेविली आहे ? हें तुम्हीं केलेंच पाहिजे अशा प्रकारची त्यानें सक्ति का केली आहे तुमच्यावर ?

जें कार्य, मग तें कोणतेंहि असो, आपण संतोषानें करतों, स्वयंस्फूर्तीनें करतों, कर्तव्य भावनेनें आनंदानें करतों, त्या कार्यांत आपणाला बहुत गोडी वाटूं लागते. तें चांगल्या रीतीनें पार पडतें व आपल्या मनाला मोठें समाधान वाटतें.

मनाचें समाधान ही कांहीं और चीज आहे. जुलूम जबरदस्तीशिवाय, स्वयंस्फूर्तीनें जी गोष्ट आपण करतों ती उत्तम प्रकारें पार पडते व तीच आपल्या मनाच्या समाधानाला कारणीभूत होत असते. वेठ वावरून चांगली कामें चांगल्या रीतीनें पार पडत नसतात. तो केवळ खेळखंडोबा होय.

## भक्तीचें ढोंग कशाला ?

देवाचें नामसंकीर्तन करण्याची प्रत्यक्ष देवानें किंवा दुसऱ्या कोणीही तुमच्यावर जुलूम, जबरदस्ती केली नसतां तुम्हीं त्या पवित्र भक्तीच्या व्यवसायाला कां बरें वेठीचें स्वरूप देतां ! कशाला भक्तीचें ढोंग करतां ? कशाला नसतें अवडंबर माजवून लोकांच्या डोळ्यांत धूळ फेकतां ?

देवाच्या भक्तिभावांत प्रेमाचा, सत्य प्रेमाचा ओलावा पाहिजे. त्यांत अंतःकरण ओतलें गेलें पाहिजे. तुमच्या मस्तकावर कोणी ओझें ठेवलेलें नाहीं. तुम्हीं केवळ भारवाहक नाहीं. तुम्हांला आपलें शाश्वत कल्याण साधावयाचें आहे ना ? मग ही वेठ वावरणें साफ सोडून द्या. स्वयंस्फूर्तीनें व आपल्या कल्याणाचा मार्ग म्हणून भगवंताचें नाव घ्या; त्या नामजपावर संपूर्ण श्रद्धा ठेवा. लोकांनीं आपणास देवभक्त म्हणावें यासाठीं देवभक्तीचा डोलारा उभा करूं नका. मग पहा तुमच्या चित्ताला केवढी शांतता व समाधान वाटतें तें !

अहो ! या का एकानें दुसऱ्याला सांगायच्या गोष्टी आहेत ? त्या ज्याच्या त्यानें समजून उमजून स्वतःच्या कल्याणासाठीं करावयाच्या आहेत. कोणतीही गोष्ट सांगून सवरून केली जात नाहीं. त्याला अंतरींचा उमाळा असावा लागतो. पहा ना ! आमच्या मनांत पापी विचारांचें थैमान सतत चालू असते. कोणाला कसा पकडींत धरावा, कोणाला कसा लुटावा, कोणाला कसा फशी पाडून स्वतःचा तळीराम गार करून घ्यावा हे विचार व त्यासंबंधीं योजना चालू असतात आणि बाहेरून केवळ जगाला दाखविण्यासाठीं आपण भक्तिभावाचा डोलारा उभा करीत असतों. त्याला महत्त्व कांहींच नसतें.

यासाठीं आपणास त्याच्या चरणीं विसावा मिळावा, त्याचे चरण दिसावे व या जीवनाचें सार्थक व्हावें असें जर मनापासून वाटत असेल तर सारीं थोतांडें सोडून देऊन मनोभावें नामसंकीर्तन करा. हा जगाचा प्रश्न नाहीं. तो तुमचा व तुमच्या कल्याणाचा आहे. तो तुमचा तुम्हीं समाधानपूर्वक सोडविण्यांतच तुमचें कल्याण आहे.

---

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

**शिसा ऑप्टिशिअन्स** (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून

उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

**छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८**

# संत समागम गोड

**सत्पुरुषांचा सहवास नेहमीं सुखकर व कल्याणप्रद होऊन रहात असतो. त्या सहवासाची गोडी आम्हीं काय बरें वर्णावी? येथें पूर्वकालीन एक संत व भगवद्भक्त बहिरंभट त्याचप्रमाणें आधुनिक काळांतील ईश्वरभक्त व स्वामी विवेकानंदाप्रमाणें अमेरिकेंत जाऊन भारतीय अध्यात्मवादाची ध्वजा फडकविणारे स्वामी योगानंद यांच्या जीवनांतील उज्ज्वल प्रसंगांचा परिचय करून देण्यांत आला आहे.**

बहिरंभट नांवाचा एक मोठा दशग्रंथी विद्वान् ब्राह्मण पैठण येथें राहत असे. आरंभीं परमार्थाची आवड त्यास बिलकूल नव्हती. एकदां सकाळच्या जेवणासाठीं केलेली आमटी फारच रुचकर झाल्यामुळें त्यांतली थोडीशी संध्याकाळसाठीं राखून ठेवण्यास त्यानें आपल्या पत्नीस सांगितलें. त्याच्या पत्नीस पतीच्या जिव्हालौल्याबद्दल हंसू आले व "या जिभेचे एवढें चोंचले माजवण्यापेक्षां हरिनाम स्मरणाकडे जर तिचा उपयोग केला तर जन्माचें सार्थक होईल," असें ती विनोदानें म्हणाली. बायकोचे शब्द बहिरंभटाच्या इतकें वर्मी लागले कीं, त्याला तत्काळ उपरति झाली व परमेश्वर प्राप्ति करून घेण्याचा त्यानें ताबडतोब निश्चय केला. त्यानें सर्व धर्मग्रंथांचें पारायण केलें; परंतु त्याला ईश्वरदर्शन तर झालें नाहींच, पण त्याच्या मनाचेंहि समाधान झालें नाहीं. त्यामुळें तो थोडासा बुद्धिभ्रष्ट झाला. पुढें त्यानें मुसलमानी धर्माची दीक्षा घेऊन कुराण मुखोद्गत केलें. इतकेंहि करून अल्ला आहे कोठें? हा प्रश्न शिल्लकच राहिला.

"व्यर्थ भाराभार केलें पाठांतर। जोंवरी अंतर शुद्ध नाहीं॥
घोडे काय थोडें वागविते ओझें। भावाविण वांझें पाठांतर॥" —तुकाराम

## बहिरंभटाचा अनुभव

अंतःशुद्धि आणि गुरुपदिष्ट मार्गाचें आक्रमण यांच्याशिवाय भगवत्प्राप्ति होणें दुर्घट आहे, आणि तोच अनुभव बहिरंभटास आला. मग मात्र तो खरोखरच वेडा झाला. बहिरंभट वेडाचे चाळे करीत गांवांत फिरूं लागला. रस्त्यांत जो मनुष्य भेटेल त्याला 'मी कोण? हिंदु कीं मुसलमान?' असा वेडगळपणाचे प्रश्न विचारीत सुटला. त्याचा मुसलमानी पेहराव पाहून, 'तूं मुसलमान आहेस' असें उत्तर लोकांनीं दिलें कीं 'आपल्या कानाच्या पाळीला भोकें कशीं?' असा प्रश्न बहिरंभट त्यांस विचारी. तेव्हां 'हा वेडा आहे' असें म्हणून लोक निघून जात.

अशा रीतीनें तो फिरत फिरत 'वडनाळ सिद्ध जगन्नाथ' नामक एक सत्पुरुष एके ठिकाणीं बसले होते तेथें गेला. त्या सत्पुरुषाच्या गुरुची समाधि बांधण्याचें काम चालू

होतें, व ते त्या कामावर देखरेख करीत बसले होते. त्यांजपाशी जाऊन बहिरंभटानें त्यांना वरील प्रश्न विचारला. त्यांनीं उत्तर दिलें कीं, 'तुझा पेहराव तूं मुसलमान आहेस. असें दर्शवितो' बहिरंभट म्हणाला, 'मग माझ्या कानाच्या पाळीस हीं भोकें कशीं?' स्वामींनीं जाणलेंच होतें कीं, हा कोणी विद्वान् ब्राह्मण 'अतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' होऊन वेडा झाला आहे. मग याचा उद्धार केला पाहिजे असें ठरवून त्यांनीं आपल्या गड्यास बोलाविलें व त्यास ते म्हणाले, 'अरे, या घाणींतला सगळा चुना साफ काढून टाका.'

गड्यांनीं त्याप्रमाणें केल्यावर स्वामी पुन्हां म्हणाले, 'आतां याला उचलून त्या घाणींत ठेवा आणि याच्या अंगावरून घाणी फिरवून याचा चांगला रांधा करा.'

गडी पहिल्यानें कांकूं करू लागले, परंतु स्वामीवर त्यांचा विश्वास असल्यामुळें त्यांच्या आग्रहावरून त्यांनीं बहिरंभटास उचलून घाणींत टाकलें, आणि त्याच्या अंगावरून घाणीचा दगड फिरवून त्याचा रांधा केला. नंतर स्वामींनीं तो सगळा रांधा आपल्या हातांनीं पुसून काढला व एका पाटावर ठेऊन त्याचा गोळा केला. नंतर समोर दुसरा एक पाट मांडून त्यावर ते बसले, व आपल्या गुरुचें स्मरण करून व कांहीं मंत्र म्हणून त्या गोळ्यावर त्यांनीं पाणी शिंपडलें, तेव्हां त्या गोळ्यांतून अत्यंत तेजस्वी असा बहिरंभट बाहेर पडला व स्वामीस त्यानें वंदन केलें.

मग स्वामींनीं त्यास विचारलें, 'तूं कोण आहेस?

बहिरंभटानें उत्तर दिलें, 'अहंब्रह्म, मी ब्रह्म आहें.

स्वामी म्हणाले, 'जा आतां, आणि काव्यरचना करून जगदुद्धार कर.

नंतर बहिरंभटानें ग्रंथ रचनेस प्रारंभ केला. श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधावर ओवीबद्ध प्राकृत टीका लिहिली. या शिवाय आणखी फुटकळ कविताही त्यानें बरीच केली. याला बहिरा पिसाही म्हणून लोक ओळखतात. कवि मोरोपंतानींही यास श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**'वंद्याा मजला तो ब्राह्मण बहिरा तथा पिसा मान्य ।**
**जरि उकिरड्यांत पडला, मळला न हिरा तथापि सामान्य ॥'**

( २ )

**'मी' 'बी. ए.' होतों'**

स्वामी योगानंद हे एक मोठे बंगाली संत होऊन गेले. ते अगदीं अलीकडचे संत होते. त्यांचा जन्म १८९३ मध्यें होऊन १९५२ सालीं त्यांनीं महासमाधी घेतली. सन १९२० पासून अखेरपर्यंतचें त्यांचें आयुष्य अमेरिकेंत गेलें. स्वामी विवेकानंदाप्रमाणेंच त्यांनीं तेथें महान् कार्य करून लॉस एंजेल्स वगैरे ठिकाणीं योगनियुक्त पारमार्थिक संस्था स्थापन केल्या. तेथें त्यांचा शिष्यपरिवारहि फार मोठा असून अनेकांना त्यांनीं मार्गदर्शन केलें आहे.

संन्यास दीक्षा मिळण्यापूर्वीचे त्यांचें नांव मुकुंद घोष होतें. मुकुंदाचे वडील भगवती यांच्यावर बंगालचे योगी सत्पुरुष श्री. लाहिरी महाशय यांचा अनुग्रह झाला होता. मुकुंदाला लहानपणापासून गुरुप्राप्तीची ओढ लागली होती. गुरुशोधनासाठीं एक दोन वेळ त्यानें घरांतून पळून जाऊन हिमालयाकडे धांव घेतली होती. अखेर कलकत्त्या-नजिकच्या सेरमपूरभागामध्यें आश्रम करून राहणारे लाहिरी महाशयांचे दुसरे शिष्य व त्यांच्या वडिलांचे गुरुबंधु श्रीमुक्तेश्वरमहाराज त्यांना गुरु लाभले. मुक्तेश्वरमहाराजांनीं त्यांना मार्गदर्शन करून 'क्रिया' योगांत प्रवीण केलें; पण शालेय व कॉलेज अभ्यासक्रम संपवून कलकत्ता विश्वविद्यालयाची बी. ए. ची पदवी संपादण्याचा त्यांच्यावर निर्बंध घालण्यांत आला.

## गुरुसेवेकडे सारे लक्ष

मुकुंदानें दररोज कलकत्त्याहून सेरमपूर येथें येऊन आपला बराचसा वेळ गुरुसेवेंत व्यतित करावा. त्यामुळें साहजिकच अभ्यासाकडे त्यांचें संपूर्ण दुर्लक्ष होत असे. तरीपण गुरुकृपेमुळें ते मॅट्रिक व इंटर या परीक्षा पासापुरते गुण मिळवून पास झाले. जाण्या-येण्याच्या प्रवासांत मुकुंदाचा निष्कारण वेळ फुकट जाऊं नये म्हणून मुक्तेश्वर महाराजांनीं त्यांना कॉलेजच्या शेवटच्या दोन वर्षांसाठीं सेरमपूरच्या कॉलेजमध्यें नांव दाखल कर-ण्यास सांगितलें. त्यांनीं त्याप्रमाणें केले व तेथील एका वस्तीगृहांत ते राहावयास आले. येथेंहि कलकत्त्यासारखीच स्थिति. दररोज सकाळीं सायकलवर बसून त्यांनीं गुरूंच्या आश्रमांत जावें व बहुत करून सबंध दिवस व अनेक वेळां रात्रहि तेथेंच घालवावी. शेवटीं बी. ए.ची परिक्षा अवघी चारपांच दिवसांवर येऊन ठेपली. अभ्यास तर कांहींच झाला नव्हता व आपण परीक्षा कसची पास होतों, असेंच मुकुंदाना राहून राहून सारखें वाटत होतें. त्याचवेळीं एक मजेदार प्रसंग घडून आला. सद्गुरूंच्या पूर्ण कृपेमुळेंच आपण ही अंतीम परीक्षा कशी उत्तीर्ण होऊं शकलों याचें बहारीचें वर्णन श्रीयोगानंदांनीं आपल्या आत्मचरित्रांत केलें आहे. तें त्यांच्याच शब्दांत दिल्यास त्यायोगें गुरु-आशीर्वादाची थोरवी सहज पटण्यासारखी आहे.

## मी परीक्षेंत कसा उत्तीर्ण झालों ?

त्या दिवशीं रात्रीं अकरा वाजतां गुरुजींचा निरोप घेऊन मठांतून वसतिगृहाकडे परतण्यासाठीं जोड्यांत पाय सरकवीत असतांना, गुरुजींनीं एकदम विचारलें, "मुकुंदा, तुझी परीक्षा केव्हां सुरू होत आहे ?" मी लगेच उत्तर दिलें, "पांच दिवसानंतर." "मला वाटतें तुझी परीक्षेसाठीं पूर्ण तयारी आहे." हें ऐकतांच माझ्या पोटांत भीतीनें गोळा उठला. मी कसाबसा म्हणालों, "गुरुदेवा, आपणांस अवगतच आहे कीं, माझा दिवसाचा बहुतेक वेळ आपल्या चरणसेवेंत जात असतो. तेव्हां ह्या शेवटच्या कठीण परीक्षेस बसण्याचें नाटक तरी मी कसें करूं ?"

श्री मुक्तेश्वर महाराज मजकडे भेदक दृष्टीनें पहात म्हणाले, “तुला परीक्षेला हें बसलेंच पाहिजे, तुझ्या ह्या मठांत येण्याच्या आवडीमुळें तूं तुझ्या वडिलांच्या आणि इतर नातेवाइकांच्या टीकेचा विषय व्हावास हें योग्य नाहीं. तूं परीक्षेला बसून जें तुला सुचेल तशी प्रश्न–पत्रिकांची उत्तरें देशील असें मला वचन दे.”

माझ्या नेत्रांतून सारखा अश्रुप्रवाह सुरू झाला. माझ्या परीक्षेच्या बाबतींत गुरु-देवांनीं जरा उशीराच लक्ष घातलें असून हा त्यांचा हुकूम अयोग्य आहे असें मला क्षणभर वाटलें. मी हुंदके देत देतच म्हणालों, ‘आपली इच्छाच आहे तेव्हां मी परीक्षेस बसेन. मात्र तयारीसाठीं वेळ अगदीं थोडा उरला आहे. ‘पुढें स्वगतच पुटपुटलों, आपण जें शिकविलें आहे त्यानेंच सर्व उत्तरपत्रिका भरून काढीन मी.’

## गुरुजींचें आश्वासन

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें मठांत आलों, गुरुजींना पुष्पगुच्छ अर्पण केला. महाराजांनीं माझ्या खिन्न चेहऱ्याकडे पाहून स्मित करीत म्हटलें,’ मुकुंदा, आजपर्यंत ईश्वर तुला परीक्षेच्या व इतर वेळीं केव्हां विसरला आहे का ? मी उत्तरलों, नाहीं ! ‘आळसटपणामुळें नव्हे, तर ईश्वरभेटीच्या ध्यासामुळें तुझ्या हातून परीक्षेचा अभ्यास होऊं शकला नाहीं.’ गुरुजी प्रेमळपणानें उद्गारले आणि लगेंच बायबलमधलें एक सूत्र त्यांनीं सांगितलें, ‘देवाला शोधून काढण्याचा प्रयत्न केल्यास कसलीच वाण पडत नाहीं.’ हें ऐकतांच परीक्षेच्या भीतीचें दडपण माझ्या छातीवरून उचलून कोणीतरी बाजूला करीत आहे असें मला वाटूं लागलें. आम्हीं लवकरच जेवण उरकलें व मी वसतीगृहांकडे परतणार तोंच श्री मुक्तेश्वरांनीं मला विचारलें, अरे, तुझा तो मित्र रमेशचंद्र दत्त अद्यापि वसतिगृहांत आहे ना ? ‘मी उत्तर केलें,’ होय, आहे. ‘जा, ताबडतोब त्याला भेट. तुला परीक्षेच्या अभ्यासांत सर्व मदत करण्याची ईश्वरच त्याला प्रेरणा करील.’ ‘गुरुजी, तो ऑनर्सची तयारी करीत असल्यामुळें नेहमींच अभ्यासात गर्क असतो. ‘रमेशला तुला मदत करण्यास वेळ मिळेल, जा. चल आता नीघ.’

मी वसतिगृहांत पाऊल टाकतों तोंच रमेश माझ्या दृष्टीस पडला. माझी अडचण त्याला कळवितांच, त्यानें मला सर्वतोपरी मदत करण्याचें ताबडतोब कबूल केलें. अनेक तास तो माझ्याबरोबर घालवूं लागला.

## रमेशकडून सहकार

उद्यां परीक्षा. पहिलाच पेपर इंग्रजीचा. रमेशनें मला पेपरांत येणारे संभवनीय प्रश्न सांगून माझ्याकडून ते सोडवून घेतले. इतर मुलांनीं ते प्रश्न पाहून नापसंती दर्शविली व माझी थट्टा केली. दुसऱ्या दिवशीं परीक्षेच्या मंडपांत गेलों. प्रश्नपत्रिका हातांत मिळतांच वाचून पाहतों तों काय आश्चर्य ! रमेशनें सांगितलेले प्रश्न आलेले.

गुरुदेवांच्या विषयीं कृतज्ञतेनें माझें हृदय भरून येऊन माझ्या डोळ्यांतून घळघळणाऱ्या अश्रूंनीं ती प्रश्नपत्रिका पार भिजून गेली. सुपरवायझरनीं सहानुभूतिपूर्वक माझी चौकशी केली. मी म्हटलें, 'पहा, माझ्या गुरुदेवांनीं रमेश मला मदत करीन असें सांगितलें आणि खरोखरच त्यानें सुचविलेले सर्व प्रश्न पडले आहेत.' पेपर संपवून वसतिगृहांत परत येऊन पाहतों तो सर्वजण आश्चर्यचकित होऊन कुतुहूल करीत होते. ते माझें अभिनंदन करूं लागले. इतर विषयांच्याबाबतहि तीच स्थिति. सर्वांना वाटूं लागलें कीं हा 'वेडा जोगी' खात्रीनें परीक्षा पास होणार. कॉलेजच्या अधिकारी वर्गांत एकच हाकाटी उठून खळबळ माजून राहिली. प्रश्नपत्रिका कलकत्ता विद्यापीठाकडून छापून येत असल्यामुळें ते कोणतीच शंका घेऊं शकले नाहींत एवढेंच.

इंग्रजीचा पेपर सोडवितांना माझ्या हातून एक चूक झाली होती. पेपर चार भागांत विभागला होता. उत्तरें लिहितांना सूचनाकडे माझ्याकडून दुर्लक्ष झालें होतें. त्यामुळें मला फक्त तेहतीस गुण मिळणार होते; परंतु पास होण्यासाठीं छत्तीस गुणांची किमान मर्यादा होती. मी ताबडतोब श्री मुक्तेश्वरांकडे धांवत गेलों. त्यांना सर्व सांगितलें. त्यांच्या पायांवर लोळण घेत म्हटलें, 'गुरुदेवा, या माझ्या अक्षम्य चुकीमुळें मी आपल्या दैवी आशीर्वादास पात्र नाहीं.'

## गुरुजींना काळजी

महाराजानीं मला उठविलें आणि ते म्हणाले, 'मुकुंदा शांत हो. धीर धर.' आकाशाकडे पाहून पुढें ते म्हणतात. 'कदाचित् चंद्र, सूर्याची स्थानें बदलतील पण तूं नापास होणें शक्य नाहीं.' मला धीर आला. मी वसति गृहाकडे परत आलों. शेजाऱ्या खोलींत विद्यापीठानें परीक्षेंत पास होण्यासाठीं लागणाऱ्या आवश्यक गुणांची मर्यादा तेहतीस केली त्यावर चर्चा चालली होती. तें संभाषण ऐकतांच धांवतच जोरानें मी त्या खोलींत घुसलों. मला पाहतांच ते माझ्यावर ओरडून म्हणतात, शेवटच्या घटकेला जाग होऊन धडपडणाऱ्या लांब केसांच्या जोगड्या, तुझें ह्या शैक्षणिक चर्चेकडे लक्ष कां वेधावें? पण खरोखर किमान मर्यादा तेहतीसांवर आणली आहे बरें.'

मी आनंदानें माझ्या खोलींत परतलों. मी गुढगे टेकले आणि गुरुदेवांनीं माझ्यासाठीं दाखविलेल्या दैवी चमत्काराबद्दल त्यांचें आभार मानले. परीक्षेच्या प्रत्येक दिवशीं श्रीमुक्तेश्वर महाराजांच्या दैवी सान्निध्याची मला वारंवार जाणीव होत होती.

शेवटचा पेपर बंगाली भाषेचा होता. ह्या विषयांत विद्यार्थि नेहमींच उत्तम रीतीनें पास होत असत. आम्ही परीक्षेसाठीं वसतिगृहांतून बाहेर पडतों इतक्यांत रमेशनें मला हांक मारली. इतर माझे सहकारी ओरडत होते कीं, वेळ झाली आहे आणि ते निघून गेले. मी धांवतच रमेशकडे गेलों. तो म्हणाला, "मुकुंदा, मला अशी प्रेरणा होत

आहे कीं, यंदा बंगालीच्या प्रश्नांची दिशा बदललेली असेल." असें सांगून त्यानें मला त्या विषयासाठीं नेमलेल्या क्रमिक पुस्तकांतील कांहीं गोष्टी आणि त्यांतल्या त्यांत बंगालमधील प्रसिद्ध दानशूर गृहस्थ विद्यासागर महाशय यांनीं केलेल्या परोपकाराविषयीं दोन हकिगती घाईनेंच वाचून दाखविल्या. मी सायकलवर टांग मारली आणि ती जोरानें मंडपाकडे हाणली. पेपरमध्यें रमेशच्या सूचनेवर हुकमी प्रश्न आले होते हें सांगावयास नकोच. तुमच्या आयुष्यांत क्रांति घडवून आणून तुम्हांला प्रेरणा देणाऱ्या व्यक्तिविषयीं एक निबंध आला होता. झालें. माझ्या गुरुभक्तीला आणि गुरुप्रेमाला भरती आली. माझ्या थोर मुक्तेश्वराविषयीं माझ्या पूज्य गुरुदेवतेविषयीं मला जितकें लिहितां येईल तितकें लिहून काढलें.

## हा गुरुकृपेचा चमत्कार !

परीक्षा संपली. निकाल लागला. मी उत्तीर्ण झालों. कांहींच तयारी नसतांना मी परीक्षा पास व्हावें हा सर्व माझ्या गुरूंचा चमत्कार! हा त्यांच्या लीलेचा खेळ! हा त्यांचा दैवी आशीर्वाद! रमेशला प्रेरणा देऊन नाममात्र पुढें केलें. ही सर्व त्यांचीच करणी. रमेश फक्त निमित्त. कर्ते करविते तेच!

स. १९१४ सालीं मला बी. ए. ची पदवी कलकत्ता विश्वविद्यालयाकडून मिळाली. मी साश्रूपूर्ण नयनानें गुरुदेवतेच्या पायांवर लोळण घेतली. कृतज्ञता व्यक्त करून त्याचें आभार मानले. श्री मुक्तेश्वर महाराजांनीं मला उठवून म्हटलें, 'मुकुंदा, आकाशांतील ग्रहांचीं स्थानें बदलण्यापेक्षां तुला बी. ए. करणें त्या ईश्वराला योग्य वाटलें.! माझ्या वडिलांना मी पास झाल्याचें कळतांच त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनीं म्हटलेंच, 'मुकुंदा; तुझ्या गुरूंच्या सानिध्यांत इतका वेळ घालवित होतास तेव्हां ही बी. ए. ची परीक्षा पास होशील असें मला केव्हांही वाटलें नव्हतें.'

सांगवयास नकोच. माझ्या गुरूंनीं रमेशला त्यांच्या परीक्षेंत उत्तम गुण प्राप्त करवून देऊन वरच्या श्रेणींत पास करून दिलें.

ही सर्व गुरुकृपा! गुरुंचा प्रसाद, गुरुंचा दैवी आशीर्वाद आणि गुरुकृपा असल्या-वर कोणती गोष्ट ह्या जगांत अशक्य आहे!

पुढें सद्गुरूंनीं मला सन्यास दीक्षा दिली. मी योगानंद असें नांव धारण केलें व ह्याच नांवानें जग मला ओळखूं लागलें.



# जीवनसाफल्याची गुरुकिल्ली

लेखक : महात्मा गांधी

**महात्मा गांधींचें जीवन ईश्वरावरील श्रद्धेनें संपूर्णपणें व्यापलेलें होतें. प्रार्थनेवर त्यांची निस्सीम श्रद्धा होती. तिच्यापासुन प्रेरणा मिळवून त्यांनीं आपल्या जीवनाला शोभा आणिली होती. या लहानशा लेखांत त्यांनीं आपलें जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगितलें आहे. तें तुम्हांआम्हांला प्रेरक होऊन राहो.**

शिक्षणानें किंवा विद्वत्तेमुळें माणसांत मनुष्यपण किंवा माणुसकी येतेच असें नाहीं. जीवनविषयक शिक्षण हे वेगळेच असते. आम्हांला साऱ्या जगाचा इतिहास–भूगोल माहीत आहे, आम्हांला अनेक भाषा येतात, पांडित्य आमच्यापाशीं भरपूर आहे परंतु आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं प्रेमानें कसें वागावें व तसें वागण्याची जरुरी किती आहे, हें जर आम्हीं समजूं शकलों नाहीं तर तें पांडित्य, बहुभाषिकत्व किंवा गाढ विद्वत्ता काय बरें कामाची ?

आमच्या शेजाऱ्याशीं किंवा ज्यांच्या ज्यांच्याशीं संबंध येईल त्यांच्याशीं आम्हांला बंधुभावानें वागतां आलें पाहिजे.

आपल्या शेजाऱ्या पाजाऱ्यांशीं वागत असतां आमच्या हातून जर कांहीं गंभीर स्वरूपाच्या चुका झाल्या असतील तर त्याबद्दल आमच्या मनाला दुःख झालें पाहिजे, पश्चात्ताप झाला पाहिजे. घडलेल्या चुकाबद्दल शेजाऱ्यांची क्षमा मागून आपण मोकळें झालें पाहिजे. एवढी आपल्या मनाची तयारी झालेली असली पाहिजे. कोणाहिबद्दल बेपर्वाईची प्रवृत्ति आपल्यांत बळावतां कामा नये. त्यामुळें ईश्वराघरीं आपण अन्याय केला असें होईल. आपल्याकडून कोणाचेंहि मन दुखविलें जाऊं नये. त्यामुळें आपण भगवंताचा भयंकर गुन्हा करीत असतों. प्रत्येक गोष्ट आपण देवाला दृष्टीपुढें ठेऊन करावयाची, देव क्षमाशील आहे. माणसानें नाहीं क्षमा केली तरी देवाच्या क्षमेचा आसरा आपण घेतला पाहिजे. चूक कोणाच्या हातून घडत नाहीं ? रागाच्या आवेशांत चुका घडतात. परंतु त्या दुरुस्त करण्याची आपली तयारी असली पाहिजे. हा दैवी गुण आहे. त्यामुळें आपण उच्च पातळीवर येतों. नेहमीं वरची पायरी गांठण्याकडे आपलें लक्ष असावें.

× × ×

आम्हीं लिहायला व वाचायला शिकलों म्हणजे संपलें आपलें कर्तव्य, असें समजू नका. शेजाऱ्या पाजाऱ्याशीं व ज्यांच्याशीं आपला संबंध येईल त्यांच्याशीं मित्रत्वाच्या

नात्यानें आपणास रहातां आलें पाहिजे. सर्वांशीं प्रेमभावानें वागतां येणें ही एक महान जीवन कला आहे.

आपल्यापुढें केवढें तरी प्रचंड कार्य पडलेलें आहे. त्यांतील जो भाग उचलतां येईल तो आपण उचलला पाहिजे. सभोंवार जरा पहा ना! स्त्री समाज हा आपला अर्धा भाग आहे. किती गाढ अज्ञानांत तो समाज वावरत आहे! त्यांची अज्ञानांतून सुटका नको का करायला? ती कोणी करायची? अंधश्रद्धा, अज्ञान वगैरे दुर्गुणांपासून त्यांची सुटका करावयाची आहे. आम्हीं एकलकोंडेपणा सोडून एकमेकांशीं सहकारानें वागलें पाहिजे. संघबळ जितकें वाढवितां येईल तेवढें वाढविलें पाहिजे. त्याच्या बळावर सर्वांच्या कल्याणासाठीं व सुखासाठीं आपण झटावयाचें आहे. देवाची भक्ति, देवाची आराधना ती हीच होय. त्यासाठीं कोणत्याहि पक्षांत प्रवेश करायला नको किंवा कोणत्याहि पक्षाचे मार्गदर्शन स्वीकारायला नको. ईशप्राप्तीचा हा सरळ व सोपा मार्ग आहे.

× × × ×

मनुष्य मात्रांत त्यागवृत्ति बळावत गेली पाहिजे. कुटुंबासाठीं किंवा समाजासाठीं त्याग हा खराखुरा त्याग नव्हे. आपली दृष्टि त्या पलिकडे गेली पाहिजे, त्या पलिकडचें जग आपणास दिसूं लागलें पाहिजे. तें जवळचे झालें पाहिजे. आपल्या त्यागाची कक्षा आस्ते आस्ते वाढत गेली पाहिजे, आपला समाज, आपला जिल्हा, प्रांत व देश येथपर्यंतच नव्हे तर अखिल जगापर्यंत त्याची मजल पोहोंचली पाहिजे. महासागरांतील पाण्याचा एखादा थेंब बाहेर काढला तर त्याचा कांहीं उपयोग आहे का? तो क्षणार्धांत नाहींसा होतो. आणि तोच महासागरांत राहिला तर जगांतील अचाट कृत्यें पार पाडण्याचें श्रेय त्याला मिळूं शकतें.

आपलें स्वतःसंबंधीं कर्तव्य, कुटुंबासंबंधीं कर्तव्य, देशासंबंधीं किंवा जगासंबंधीं कर्तव्य ही एकमेकांपासून स्वतंत्र मुळींच नाहींत, स्वतःला किंवा आपल्या कुटुंबाला अपकार करून देशाचें हीत आपण करूं शकणार नाहीं; त्याचप्रमाणें जगाला हानीकारक होणारी गोष्ट करून कोणीही स्वदेशाचें कल्याण करूं शकणार नाहीं. आणि शेवटीं काय? कुटुंब जिवंत रहावें म्हणून आपण मरायला तयार असलें पाहिजे. देश जिवंत रहावा म्हणून कुटुंबानें मरायला तयार राहिले पाहिजे. आणि जग जगावें म्हणून देशानें मरणाला सिद्ध होऊन राहिलें पाहिजे. त्यागाचा आणि पावित्र्याचा अत्यंत निकट संबंध आहे. जें जें पवित्र असेल त्याचाच त्यागांत समावेश होऊं शकतो. यासाठीं आपण अंतर्बाह्य पवित्र बनवण्यासाठीं झालें पाहिजे. ती पहिली

पायरी आहे. अंतःकरण पवित्र झालें म्हणजे प्रत्येक घटकेला आपलें कर्तव्य कोणतें याची आपणास आपोआप जाणीव होऊं लागतें.

× × ×

ईश्वरी तेजोराशीचा एक दिव्य किरण म्हणजेच आपलें हे जीवन. आणि तें तसें आहे यावर माझी पूर्ण श्रद्धा असल्यामुळें जीवन हे स्वप्न किंवा कांहींतरी अपघात आहे असें मी समजत नाहीं. व्यापक अर्थानें धर्म या शब्दांचा मी जो अर्थ समजतों त्या जाणीवेमुळें जीवनांतील दिव्यत्वाची प्रचीति मला येत असते. आपला नैतिक दृष्टिकोन पूर्णत्वाप्रत पोहोंचल्याशिवाय दिव्यत्वाची जाणीव होणें कठीण आहे. आणि म्हणूनच माझ्या मतें धर्म आणि नीतिमत्ता परस्परावलंबी आहेत.

आपण पूर्णत्वाप्रत जावें यासाठीं माझी सतत धडपड चाललेली असते. त्यामुळें माझा उत्साह टिकूं शकतो, वाढूं शकतो.

हा जो झगडा चालू असतो तीच माझी स्फूर्ति व तीच माझी प्रेरणा.

**जीवनाचें सारसर्वस्व जर कांहीं असेल तर तें म्हणजे ईश्वर सर्वव्यापी आहे; तें एकच दैवी तेज प्रत्येकांत वास करीत आहे तेव्हां जेथें जेथें जीवन आहे, जिवंतपणा आहे तेथें तेथें त्याची सेवा करणें, तें जीवन अधिकाधिक सुखी व समृद्ध व्हावें यासाठीं झटणें यांतच मला सुख, समाधान व आनंद वाटतो.**

जेथें जेथें काळोख असेल, अज्ञान पसरलेलें असेल व दुष्टांकडून छळ चाललेला असेल तेथें तेथें सर्वस्व पणाला लावून लढा देणें हीच माझ्या आनंदाची व समाधानाची गोष्ट होऊन राहिली आहे.

× × ×

माणसाचें अंतिम ध्येय कोणतें ? देवत्वाप्रत जाऊन पोहोंचणें. ब्रह्माची जाणीव करून घेणें, तें ब्रह्मपद मिळविणें. यासाठीं ज्या ज्या सामाजिक, राजकीय, धार्मिक वा दुसऱ्या कोणत्याहि चळवळी आपण करूं, त्या करीत असतां मला देवत्व, दिव्यत्व प्राप्त करून घ्यावयाचें आहे, तद्रुप व्हावयाचें आहे याचें सतत स्मरण आपणास राहिलें पाहिजे ! तेव्हां सर्व मानवजातीची सेवा करण्याचा, सेवाभावानें बद्ध होण्याचा प्रश्न पुढें कां येतो ? तें जें ध्येय आपणास साध्य करावयाचें आहे त्यासाठीं करावयाच्या प्रयत्नांचा ही सेवा हा एक भाग आहे. आम्हांला भगवंताची प्राप्ति करून घ्यावयाची आहे ती कशी करून घेणार ? त्याची जी ही निर्मिती आहे जेथे त्याचा वास आहे, त्याच्याशीं सेवाभावानें संलग्न होणें ! आणि अशा रीतीनें त्याला पहाण्याचा प्रयत्न करणें हाच आपल्यापुढें एक महत्तम मार्ग आहे. तोच मार्ग आपण चोखाळावयाचा आहे.

स्वतःला ओळखणें हा जीवनाचा एक हेतू आहे ही गोष्ट निःसंशय आहे. आणि तो हेतू आपण कसा साध्य करून घेणार ? जें जें जीवन सभोंवार वावरत असलेलें दिसत आहे त्याच्याशीं एकरूप झाल्याशिवाय स्वत्वाची ओळख पटणार नाहीं. आणि ईश्वर आपण कोणाला समजावयाचें ? हें पसरलेलें जीवन म्हणजेच ईश्वर; तेंच ब्रम्ह व तेंच सर्वस्व. आपण सर्वांशीं एकरूप होऊन त्याच्यासाठीं झटावयाचें; त्याच्या सेवेंत आनंद मानावयाचा. कशाचीहि अपेक्षा न करतां निःस्वार्थ सेवा करीत रहाणें हाच त्याच्यापर्यंत पोहोंचण्याचा मार्ग आहे.

भगवंतानें केवढी तरी प्राणीसृष्टि निर्माण केली आहे. परंतु त्या सर्वांत महत्त्वाचा प्राणी जर कोणता असेल तर तो म्हणजे मानव हाच होय. त्यानें प्रयत्न केला तर त्याला आपला निर्माता कोण हे समजूं शकतें. तेव्हां अशा या मानवाचें जीवनांतील मुख्य ध्येय कोणतें ? अधिकाधिक सुख संपत्ति, धनदौलत मिळविणें, वाढत्या प्रमाणांत सुखोपभोगाची साधनें निर्माण करणें हेंच कांहीं मानवाचें मुख्य ध्येय नाहीं; परंतु जेणें करून आपण अधिकाधिक त्या निर्मात्या सन्निध जाऊं, त्याची ओळख पटवून घेऊं हाच तर आपला जीवनोद्देश आहे.

हा मानवजन्म वारंवार वाट्यास येत नाहीं. त्याचप्रमाणें सुखोपभोगाची नाना साधनें धुंडाळणें व खूप संपत्ति मिळवून धनसंपन्न होणें, यासाठींच का हा मानवजन्म आहे ? नाहीं. तसें मुळींच नाहीं. उलटपक्षीं आपल्या शरिरांतील शक्तीचा प्रत्येक कण तो जो आपला निर्माता त्याची ओळख पटवून घेण्यासाठीं, त्याला सामोरा जाण्यासाठीं आपण खर्च करावयाचा आहे !

ती जी चिरशक्ति सर्वत्र पसरलेली आहे, ज्या महान् शक्तीनें आम्हांला निर्माण केलें व हें जग दाखविलें, तिची आम्हीं अनन्यभावें सेवा करावयाची आहे. त्या शक्तीमुळेंच या जगांत आम्हीं श्वास घेऊं शकतो, वावरूं शकतों व हालचाल करूं शकतों. तिची कृपा आहे म्हणूनच तिच्या छत्राखालीं आपण वावरत आहोंत. मग त्या शक्तीची सेवा आपण अनन्यभावें नको का करायला ? यासाठींच आपण सर्वांवर प्रेम करावयाचें, प्रेमरज्जूनें सर्वांना जखडून टाकावयाचें. येथें द्वेषाला स्थानच रहात नाहीं.



ज्ञानेश्वरी अनुवाद—

# गीतेची सर्वश्रेष्ठता

लेखक : वि. पां. सातपुते, मुंबई

**गीता ही अखिल मानवजातीस उपासनीय आहे ती सर्वांच्या कल्याणासाठीं आहे. स्त्रिया, वैश्य व शूद्रादिकांनाही ( वेदानें वाळींत टाकलेल्या ) तिचें पठण करून जन्माचें सार्थक करून घेतां येतें. ज्ञानेश्वर महाराजांनीं यासंबंधीं अधिकारवाणीनें सुंदर स्पष्टीकरण केलें असून त्याचा परिचय या लेखांत श्री. वि. पां. सातपुते यानीं करून दिला आहे.**

**—संपादक**

चातुर्वर्ण्यापैकीं वेदाधिकार फक्त त्रैवर्णिकांसच आहे. त्यांतही ब्राह्मणांस अध्ययन व अध्यापन ( शिकणे व शिकविणे ) या दोन्हींचाही, व क्षत्रिय व वैश्य यांस फक्त अध्ययनाचाच अधिकार आहे.

स्त्रिया, वैश्य व शूद्र यांस वेदाधिकार नाहीं. प्राचीन काळांत विद्वान् स्त्रियांचे ( इ. गार्गी, सरस्वती इ. ) अपवाद दिसून येतात. तसेंच येथें उल्लेखिलेल्या वैश्यापेक्षां वेदाधिकार नसलेले वैश्य हीन जातीचे असावेत. अर्थात् गीतांतर्गत चातुर्वर्ण्य-व्यवस्था प्राचीन आहे. सध्यांच्या समाजरचनेंत फारच उलथापालथ झाली आहे हे लक्षांत ठेविलें पाहिजे.

गीता यच्चयावत् मानवजातीस, इतकेंच नव्हे, तर देवादिकांसही उपासनीय आहे. आजच्या सुधारलेल्या भौतिक जगांतही गीतेचें संशोधन व अभ्यास मोठमोठ्या विद्वानांकडून चालू आहे हें आपण जाणतों. ज्ञानेश्वरीच्या उपोद्‌घाताच्या भागांत ज्ञानेश्वरमहाराजांनीं एक प्रसंग वर्णिला आहे. श्री महादेव गीतातत्त्वचिंतनांत अहर्निश गढून गेले आहेत, इतके कीं, त्यांना भवानीशीं शब्दही बोलण्यास फुरसत मिळत नाहीं. याचा चमत्कार वाटून अखेर भवानीनें महादेवांस प्रश्न केला कीं, इतकें गढून जाण्या-इतकें गीतेंत काय आहे ? त्यावर त्यांनीं उत्तर दिलें कीं, हे पार्वती, तुला माहीत नाहीं काय ! तूं प्रकृति जशी जगाच्या कार्यांच्या रूपानें प्रत्येक क्षणाला तुझें रूप पालटतेस त्याचप्रमाणें जों जों चिंतन करावें तों तों गीतेंतून नवनव्या तत्त्वांचें दर्शन होतें. ( तया गीतार्थाची थोरी । स्वयें शंभु विवरी । तेथ भवानी प्रश्नु करी । चमत्कारौनि ॥ तेथ हरु म्हणे नेणिजे । देवी जैसें का स्वरूप तुझें । तैसें हें नित्य नूतन देखिजे । गीतातत्त्व ॥ ( ज्ञा. १–७०–७१ )

वेदानें 'वाळींत टाकलेल्या' स्त्री–वैश्य शूद्रादिकांनाही गीता सेव्य आहे अशा अर्थाचा स्पष्ट निर्देश गीतेंत फक्त एकाच ठिकाणीं, नवव्या अध्यायाच्या ३२ व्या श्लोकांत आहे. गीताकारांच्या दृष्टीनें, त्याच्याच पुढील ३३ व्या श्लोकांत 'किं पुनर्ब्राह्मणा नित्या;' या प्रमुख सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ मागील श्लोक तसा गौण असावा, परंतु अज्ञ जड जीवाच्या उद्धाराची तळमळ असलेल्या अन्वर्थकतेनें 'माउली' असलेल्या ज्ञानेश्वरांस या श्लोकाच्या चतुर्थांशाच्या 'सुताचा' आधार मिळाला व त्यांनीं नऊ हजार ओंव्यांची टीका गीतेवर लिहिली. नव्हे, या नऊ हजार पायऱ्यांचा सोपान करून बाळयाभोळ्यांस 'स्वर्गा'ची वाट उपलब्ध करून दिली.

ज्याप्रमाणें गीता, उपनिषदें व ब्रह्मसूत्रें ही वेदांत मार्गांतील प्रस्थानत्रयी मानण्यांत येते त्याचप्रमाणें भक्तिमार्गांत ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व चांगदेव पासष्टी ही प्राकृत प्रस्थानत्रयी म्हणून आदरिली जाते.

ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरींत उपोद्घात व उपसंहार या दोन्ही भागांत गीतामाहात्म्य प्रसंगोपात वर्णिलें आहे, वेद, शास्त्रें व अध्यात्मशास्त्र या सर्वांपेक्षां गीताशास्त्रच श्रेष्ठ आहे असें प्रतिपादन केलें आहे. उपक्रमांत, हा वेदांतसागर ज्याच्या निद्रेंतील घोरणें आहे त्या सर्वेश्वरानें गीता प्रत्यक्ष सांगितली ( हा वेदार्थ सागरु। जया निद्रिताचा घोरु। तो स्वयें सर्वेश्वरु। प्रत्यक्ष अनुवादला॥ ज्ञा. १–७२ ) अशा शब्दांत गीतेची थोरवी वर्णिली आहे. अशाच प्रकारचा उल्लेख १८ व्या अध्यायांत 'गीता वेदांस मूळ आहे' या सिद्धांताचें प्रस्थापन करण्याच्या ओघानें आहे. गीता वेदांस मूळ कशी आहे असें कोणी विचारील तर त्याची प्रसिद्ध उपपत्ति सांगतों असें म्हणून ज्ञानेश्वर पुढें म्हणतात, ज्याच्या निःश्वासांपासून वेदराशींचा जन्म झाला तो सत्यप्रतिज्ञ भगवान् श्रीकृष्ण स्वमुखानें पैजेवर ( अर्जुनास ) गीता सांगता झाला. ( येथ गीता मूळ वेदां। ऐसें केवीं आलें पां बोधा। हें म्हणाल तर प्रसिद्ध। उपपत्ति सांगों॥ तरी जयाच्या निःश्वासीं। जन्म झाले वेदराशी। तो सत्यप्रतिज्ञ पैजेसीं। बोलिला स्वमुखें॥ ज्ञा- १८–१४२६–२८ ) 'यस्य निःश्वसिता वेदाः' अशी श्रुतिही आहे.

वेदांपेक्षां गीता श्रेष्ठ आहे हें प्रतिपादन करणारें आणखीही एक वर्णन ज्ञानेश्वरी अठराव्या अध्यायांत आहे, त्याचा अनुवाद असा वेद आपल्या घरचा जरी संपन्न असला तरी त्याच्यासारखा कृपणही दुसरा नाहीं. कारण तो ( वेद ) फक्त तीनच वर्णांच्या कानास लागला ( ऐकण्याचा अधिकार ) बाकीचे स्त्रीशूद्रादिक यांना मात्र वेदानें तसेंच भवव्यथेंत ठेविलें; कारण वेद त्यांस आपणा जवळ फिरकण्यास तर राहोच पण आपल्या वाऱ्यासही उभें राहूं देत नव्हता, त्यांस असा 'अनवसर' मांडून राहिला होता. ही उणीव वेदास यथाकाल समजून आली, पण त्यास त्याच्या मूळस्वरूपांत स्थानवैशिष्ट्यामुळें उघडपणें खालच्या वर्णांपर्यंत जातां येईना. हें उद्दिष्ट साध्य करून

घेण्यासाठीं व वेद फक्त तीन वर्णांच्याच कानीं लागला हें दूषण (कुटी) दूर करण्यासाठीं वेद योग्य अशा माध्यमाच्या शोधांत होता, त्यास गीतामाध्यम सांपडलें व बीजरूपानें वेदानें गीतेंत प्रवेश करून आपला लाभ सर्वांस करून दिला व मागील दूषणांतून वेद मुक्त होऊन आतां वेदाची कीर्ति निष्कलंक (गोमटी) झाली. (वेदु संपन्नु होय ठायीं। परि कृपणु ऐसा आनु नाहीं। जे कानीं लागला तिहीं। वर्णांच्याचि ॥ येरा भवव्यथा ठेलिया। स्त्रीशूद्रादिका प्राणियां। अनवसरु मांडूनिया। राहिला आहे ॥ मज पाहतां तें मागील उणें। फेडावया गीतापणें। वेदु वेठला भलतेणें। सेव्य होआवया ॥ ज्ञा. १८–१४५७/६० यालागीं मागिली कुटी। भ्याला वेदु गीतेच्या पोटीं। रिगाला आतां गोमटी। कीर्ति पावला ॥ ज्ञा. १८–१४६५ ).

वेदांपेक्षा गीता श्रेष्ठ आहे हें विवेचन वर झालें, आतां शास्त्रें, अध्यात्मशास्त्र व गीता यांबद्दल तुलनेनें ज्ञानेश्वरांनीं काय म्हटलें आहे व यांतहि गीताच श्रेष्ठ आहे हें सिद्ध केलें आहे त्याचा अनुवाद पाहूं. हाहि भाग ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायांतच आहे. ज्ञानेश्वर म्हणतात, आमूलाग्र गीताशास्त्र मोक्षोपायपर आहे, स्वतःसिद्ध आहे. तें इतर शास्त्रांप्रमाणें प्रमाणसिद्ध नव्हे. एकदोन दृष्टांत ज्ञानेश्वर देतात. वारा फक्त सूर्याच्या आड आलेले ढग दूर करतो, सूर्यास प्रगट करीत नाहीं. सूर्य स्वतः सिद्ध आहे. त्याचप्रमाणें पाण्यावरील शेवाळ हात बाजूला सारून स्वतः सिद्ध असलेलें पाणी उघड करतात. पाणी आधींच असतें, त्याप्रमाणें इतर शास्त्रें व अध्यात्मशास्त्र यांत असा भेद आहे कीं, इतर शास्त्रें फक्त आत्मज्ञानाच्या प्राप्तीच्या मार्गांत अविद्येचा किंवा अज्ञानाचा जो अडथळा (मळु) असतो तो फक्त दूर करतात. म्हणजे तीं अंतःकरणशुद्धि करण्यास साहाय्यभूत होतात. प्रत्यक्ष आत्मज्ञान करून देत नाहींत. दुसऱ्या पक्षीं निर्मळ अध्यात्मशास्त्र (येरु) माझें स्वतःचें (भगवान श्रीकृष्णांचें) प्रकाशन करतात म्हणजे ज्ञान (आत्मज्ञान) करून देतें. अशा अध्यात्मशास्त्राविषयीं जेव्हां कांहीं शंका निर्माण होते तेव्हां त्या समाधानासाठीं ज्या ठिकाणीं धांव घ्यावी लागते तें हें गीताशास्त्र आहे. दुसऱ्या शब्दांत, इतर शास्त्रें व अध्यात्मशास्त्र यांच्यांतील मतभेदांचा न्यायनिवाडा करण्याचें गीता हें सर्वोच्च न्यायपीठ आहे. (जे गीतार्थाचें चांगावे। मोक्षोपायपर आघवें। आन शास्त्रोपाय कीं नव्हे। प्रमाणसिद्ध ॥ वारा आभाळचि फेडी। वांचूनि सूर्यातें न घडी। कां हात बाबुळी धाडी। तोय न करी ॥ तैसा आत्मदर्शनीं आडळु। असे अविद्येचा जो मळु। तो शास्त्र नाशी येरु निर्मळु। मी प्रकाशें स्वयें। वांचोनि आघवींचि शास्त्रें। अविद्या नाशाचीं पात्रें। वांचोनि न होतीं स्वतंत्रें। आत्मबोधीं ॥ तया अध्यात्मशास्त्रासी। जैं साचपणाची ये पुसी। तैं येइजे जया ठायासी। ते हे गीता ॥ ज्ञा. १८–१२३०।२४ ) आणि म्हणूनच ज्ञानेश्वरांनीं पुढें ज्याला ज्ञान प्राप्तीची इच्छा आहे त्याला एक गीताच सेव्य

# महाकवि तुलसीदास

## आणि

# भारतीय संस्कृति

*******************

[ लेखक : **भालचंद्र दा. मडकईकर** साहित्य रत्न ]

**भक्तशिरोमणी तुलसीदासांचें नांव सर्वांच्याच परिचयाचें आहे. उत्तर भारतांत तर असें एकहि हिंदु कुटुंब मिळणार नाहीं कीं ज्याच्याकडे ' रामचरित मानस ' ह्या तुलसीदासांनीं लिहिलेल्या महान ग्रंथाची प्रत नसेल ! आज सुमारें चार साडे चारशें वर्षे झालीं, तरी जनतेच्या हृत्पटवरील त्यांचें अधिष्ठान अद्याप कायम आहे व ह्यापुढेंहि तसेंच राहील.**

तुलसीदास भक्त तर होतेच पण ते सर्वश्रेष्ठ महाकवीसुद्धां होऊन गेले. हिंदीच्या ' अवधि ' नामक एका पोट भाषेंत लिहिलेल्या रामचरित मानस ह्या महाकाव्याला जगांतील साहित्यांत एक मानाचं स्थान आहे. भाव, भाषा, सिद्धांत, प्रबंधचातुर्य, चरित्र-चित्रण, अलंकार विधान व रसनिर्मिति या सर्व गुणांनीं हा ग्रंथ मंडित झालेला आहे.

**त्यानीं घडवून आणलेला समन्वय**

तुलसीदासांनीं विविध पंथांच्या परस्पर विभिन्न तत्वांत समतोल व उदार बुद्धीनें कसा समन्वय घडवून आणला हेंच आपणांस पहावयाचें आहे; म्हणून तुलसीदासांच्या वेळच्या राजकीय, धार्मिक व सामाजिक परिस्थितीचें व कवींच्या जीवनासंबंधीं ज्ञान असणें अत्यावश्यक आहे.

सर्वसाधारणपणें गोस्वामी तुलसीदासांचा जन्म सन १५३२ मानला जातो. सन १५२६ च्या पानिपतच्या लढाईंत बाबरानें विजय प्राप्त केल्यावर उत्तर भारतावर मुसलमानांचा अंमल सुरू झाला. तद्नंतर हुमायूननें व नंतर सन १६०५ पर्यंत अकबरानें

---

आहे. इतर भाराभर शास्त्रें वाचून काय करावयाचें आहे असें ठामपणें म्हटलें आहे. ( म्हणोनि जाण तयासवा । गीताचि येकी सेवा । काय कराल आघवां । शास्त्रीं येरीं ॥ ज्ञा. १८–१६९५ )

या प्रमाणें गीतेची सर्वश्रेष्ठता सयुक्तिकपणें मांडून, व नवव्या अध्यायांतील लेखविषय श्लोकाचा आधार घेऊन ज्ञानेश्वरांनीं वेदांत सर्वांस समान उपलब्ध करून दिला.

राज्य केलें, हा सर्व काळ लढाईंचा व धकाधकीचा होता. रजपूत राजे आपापसांत लढत. तलवारीच्या जोरावर हिंदूंना मुसलमान बनविण्याचे प्रयत्न राजरोस होत. जुलूम जबरदस्ती व अत्याचारांना भयंकर ऊत आला होता. स्त्रियांचें शील लुटलें जात होतें. देवतांच्या मूर्ति व देवळें जमीनदोस्त होऊन मशिदी मोठ्या दिमाखानें उभ्या होत्या. जनता निराश, निर्जीव व लाचार बनली होती.

मुसलमान राज्याधिकारी विलासी व विलासलोलुप होते. हिंदु जनता देखील नीतिभ्रष्ट होऊन विषयविलासांकडे आकृष्ट झाली. सरदार, उमराव, मान, सत्ता व अधिकाराकरितां हापापले होते. विलासाचे चोंचले पुरवायचें तें प्रधानसाधन होते. मुसलमान व त्याच-प्रमाणें उरल्यासुरल्या रजपूत राजांत भावाभावांत, पितापुत्रांत राज्यप्राप्तीसाठीं इतकीं कारस्थानें, खून व अत्याचार होत होते तेंच राज्य रामानें केवळ कर्तव्यपालनाकरितां व बंधुद्रोह टाळण्याकरितां किती सहजपणें लाथाडलें. राज्यप्राप्ति हें मनुष्याच्या जीवनाचें ध्येय नाहीं. हें रामानें आपल्या अलौकिक त्यागानें दाखवून दिलें. तेव्हां तुलसीदासांनीं ह्या परिस्थितींत रामचरित लोकांसमोर ठेवलं त्यांत खरोखरच औचित्य होतं.

## अनाचाराची परमावधि

अशा ह्या चमत्कारिक परिस्थितींत नाना पंथांच्या परस्परविरोधी प्रचारामुळें हिंदूच्या धार्मिक भावनांची अधिकच गळेचेपी झाली. दहाव्या शतकापासून बौद्धधर्म विकृत होऊन भिन्नभिन्न संप्रदायांत विभागला गेला होता. त्यांत पूर्वेकडील प्रबल अशा वज्रयानी संप्रदायांत अनाचार परमावधीला पोंचला होता. ह्या सिद्धांनीं अंतरसाधनेवर जोर दिला. मूर्तिपूजा, स्नानसंध्या, पूजाअर्चा, तीर्थाटन आदींची हेटाळणी केली व पंडितांची आणि ब्राह्मणांची नालस्ती केली. या संप्रदायांत ईश्वरप्राप्तीकरितां मद्य व स्त्रीसंग अत्यावश्यक मानला जाई. ब्रह्मानंदाचा आनंद म्हणजे स्त्री सहवासाच्या शतपट सुख असें ते उघडपणें प्रतिपादित. नग्नमूर्तींची प्रथा ह्याचवेळीं सुरूं झाली. त्यांच्या प्रचारानें विलासलोलुपता इतकी वाढली कीं, ह्या सिद्धांपासून दूर रहा असा उपदेश करण्याची पाळी घरांतील जाणत्या स्त्रियांवर आली.

पश्चिमेकडे नागपंथी निर्गुणमतवादी कानफाटे लोक होते. त्यांनीं लोकधर्माची उपेक्षा केली. प्रत्येकानें आपापलीं सांसारिक कर्तव्यें केलींच पाहिजेत, ह्या गोष्टीला ह्या दोन्हीं सांप्रदायांनीं महत्त्व दिलें नाहीं. त्यांतल्या-त्यांत नागपंथीयांनीं स्त्री व मद्याबद्दल विवेक दाखविला.

प्रेममार्गी मुसलमान सूफी पंथाच्या प्रचारकांनीं निर्गुण, निराकार ब्रह्म प्रेमानें जिंकतां येतें म्हणून अखिल चराचरावर प्रेम करा असा दिव्य आदेश दिला. त्यांच्या उदार दृष्टिकोणामुळें पुष्कळ हिंदु ह्या पंथाकडे आकृष्ट झाले.

### संत कबिरांचें कार्य

हिंदु मुसलमानांतील वाढती तेढ व वैर लक्षांत घेऊन कबीरदासांनीं ह्या दोन्ही जातींत एकीच्या उद्देशानें कबीरपंथ स्थापन केला. दोन्ही धर्मांतील चांगलीं तत्वें स्वीकारून रूढींची कडक शब्दांत टीका केली. निर्गुण निराकार ब्रह्म योगसाधनेनें प्राप्त होतो, धर्मभेद, जातीभेद झूट आहे, असें त्यांनीं तीक्ष्ण शब्दांत प्रतिपादिलें. दोन्हीं जमातींतील हलक्या जातीचे लोक फक्त ह्या पंथाकडे आकृष्ट झाले.

संस्कृत शिक्षणाचा ऱ्हास झाला होता. वर्णाश्रमाचा नाश झाला होता. वैश्य, शूद्रांनी वाटेल तो व्यवसाय उचलला होता. देवाधर्मावरचा विश्वास उडाला होता. ब्राह्मणांची निंदा व छळ सुरू झाला होता. विषयलोलुपता वाढून भाऊ–भावास, पुत्र–पित्यास, पति–पत्नीस जुमानीसा होऊन कुटुंबाचा पायाच निखळत चालला होता. ह्या परिस्थितींत भारतीय संस्कृतीचें रक्षण व वृद्धि करण्याचें महान् कार्य तुलसीदासांनीं केलें.

तुलसीदासांना बाळपणापासून रामाचें वेड होतें. वाईट नक्षत्रावर जन्मल्यामुळें जन्मतःच त्यांचा आई–वडिलांनीं त्याग केला होता म्हणून भिक्षा मागून त्यांनीं चारितार्थ केल्याचा उल्लेख आढळतो. मोठे झाल्यावर पंधरा वर्षेंपर्यंत त्यांनीं संस्कृत भाषा, वेदवेदांग, शास्त्रइतिहास, पुराण, काव्यकला आदि विषयांचें अध्ययन केलें.

### पत्नीमुळें रामभक्तीचा लाभ

विवाहानंतर कांहीं काळ ते ईश्वराला विसरून पूर्णपणें विषयसुखांत बुडून गेले होते. कांहीं असो. आपणाला पत्नीमुळेंच परत रामभक्ति लाभली असें तुलसीदासांनीं म्हटलें आहे.

‘ हौं तो चालयो, प्रेमरस, पत्नीके उपदेस ’ ॥

नंतर बैरागी होऊन त्यांनीं दोनदां जगन्नाथपुरी, रामेश्वर, द्वारका, बदरिकाश्रम व मानससरोवरपर्यंत भ्रमण केलें. भारताच्या दीन हीन स्थितीचें त्यांनीं निरीक्षण केलें. राजनीतीचें भय, पारतंत्र्यांतली निराशा, धार्मिक भावनांचा ऱ्हास, मतामतांचा गलबला, आर्थिक चिंता सारें त्यांनीं आपल्या चित्तांत सांठवून ठेविलें. मग चित्रकुटांत स्थायिक होऊन रामचरितमानस, कवितावली, विनयपत्रिका आदि अनेक उत्तमोत्तम ग्रंथ तुलसीदासांनीं लिहिलें व रामनामाचें गुणगान करून भक्तीचा फार झपाट्यानें प्रसार केला.

### एकेश्वरवाद

वैष्णव, शैव, शाक्त आदि अनेक पंथ आपलाच इष्टदेव श्रेष्ठ असें मानून इतरांच्या इष्टदेवांना कमी लेखीत असत. त्यामुळें परस्परांत वैरभाव बळावत होता. ही समाज-विघातक प्रवृत्ती दूर करण्याचा स्तुत्य प्रयत्न तुलसीदासांनीं केला. सर्व देव म्हणजे एकाच

ईश्वराचीं रूपें होत. जरी त्यांनीं रामाचे स्तुतीपाठ गाईले तरी कोणाहि इष्टदेवाला कमी लेखिलें नाहीं.

‘ संभुप्रसाद सुमति हिय तुलसी ’

शंकराच्याच कृपेनें मला बुद्धि प्राप्त होऊन रामचरितमानस ह्या ग्रंथाची रचना करण्यास मी सिद्ध झालों; असें प्रारंभींच त्यांनीं नमूद केलें आहे. ही रामकथा शंकरच पार्वतीला वर्णित आहेत. तसेंच लंकेला सेतु बांधण्यापूर्वी ‘ आपण शंकराची पूजा करूं या.’ असें राम लक्ष्मणाला सांगतो. कारण,

‘ शिवद्रोही मम भगत कहावा । सोनर सपनेहुँ मोही न भावा ॥ ’

शंकराच्या भक्तिविना रामभक्ति लाभूंच शकत नाहीं असें स्पष्टपणें तुलसीदासांनी प्रतिपादिलें आहे. कृष्णावर त्यानीं कृष्णगीतावली हा ग्रंथच लिहिला आहे. ‘ रामचरित्र मानस ’ ह्या ग्रंथांत प्रारंभीं गणपति, पार्वती, शंकर, कवीश्वर, हनुमान, विष्णु आदि देवांचीं मुक्तकंठानें स्तुति केली आहे. ‘ विनयपत्रिकेंत ’ सुद्धां असेंच सर्व देवांचे गुणगानें

गाइए गनपति जगवंदन ।

मोदकप्रिय मुद मंगलदाता । गुणविद्या वारिधि बुद्धि विधाता ॥

असें म्हटलें आहे.

## निर्गुण सगुणांत अभेद

उपनिषदांत सगुण व निर्गुण हीं ब्रह्माचीं दोन्हीं रूपें मान्य केलीं आहेत, परंतु नागपंथी योगी तसेंच कबीरपंथी ज्ञानमार्गी योग्यांनी फक्त निर्गुणमताचा पुरस्कार करून मूर्तिपूजेची, अवतारवादाची हेटाळणी केली. त्यांत समन्वय करण्याकारितां निर्गुण व सगुण हीं एकाच ब्रह्माचीं दोन रूपें आहेत व जेव्हां भक्तांवर संकटें येतात व धर्माचा नाश होतो तेव्हां निर्गुण, निराकार ब्रह्म सगुण रूप धारण करून नाना लीला करतो.

‘ यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । ’

ह्या गीतेंतील वचनाचेंच रूपांतर तुलसीदासांनीं केलें आहे.

‘ जब जब होई धरमकी हानी । बाढहिं असुर अधम अभिमानी ’

व शेवटीं

‘ तब तब प्रभुधरि विविध सरीरा । हरहिं कृपानिधि सज्जन पीरा ’

पार्वतीला महादेव रामकथा वर्णन करीत असतानां तिच्या मनांत संशय उत्पन्न होऊन ती विचारते, ‘ राम कोण आहे ? निर्गुण ब्रह्म कीं दशरथपुत्र ? ’ महादेव उत्तर देतात, ‘ हीं दोन्ही रूपें एकच आहेत, ’ अगुनहिं सगुनहिं नहीं कछु भेदा ‘ ज्याप्रमाणें पाणी व बर्फ एकच, तशींच हीं रूपेंहि एकच होत. ’

‘ जो गुनरहित सोई सगुन कैसे । जलु हिम उपल बिलग नहीं जैसे ॥

निर्गुण ब्रह्माचें तुलसीदासांनीं मनसोक्त वर्णन केलें आहे.

सारद सेस महेस विधि । आगम निगम पुरान ॥
नेति नेति कहि जासु गुन । करहिं निरंतर ध्यान ॥

त्याच प्रमाणें

बिनुपद चलई सुनई बिनुकाना । करबिनु करहिं करम विधि नाना ॥

सगुण ब्रह्म तुलसीदासांना फारच प्रिय होता, रामाचें सौंदर्यवर्णन त्यांनीं अनेक ठिकाणीं उत्कृष्टपणें केलें आहे.

कामकोटि सत शामसरीरा । नीलकंज बारिद गंभीरा ॥
अरुणचरन पंकज नखजोति । कमलदलन्हि बैठे जनु मोति ॥

त्यांतल्या त्यांत धनुर्धारी रामाची सांवळी तेजःपुंज मूर्ति त्यांना फारच प्रिय होती.

## अद्वैत विशिष्टाद्वैत वाद

अद्वैतवाद भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. जीव हा ब्रह्माचा अंश आहे व त्यांच्यांत ईश्वराचे गुण वास करितात, ह्या भावनेमुळें चराचराविषयीं आपुलकी व सहानुभुति उत्पन्न होते. जग हें मिथ्या असून मायेमुळें तें सत्य भासतें. अद्वैत वादाचें "ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या" पुरस्कार करणारे शंकराचार्य हे होऊन गेले. लक्ष्मणाच्या प्रश्नाला उत्तर देतांना रामानें त्याला मायेचा भेद समजावून दिला.

मैं और मोर, तोर तैं माया । जेहि बस कीन्हे जीव निकाया ॥

'मी व माझें, तूं व तुझें' ही भावना मायेमुळें उत्पन्न होते. या मायेनें अखिल विश्वाला अधिन केलें आहे. शिंपलीमध्यें चांदीचा अथवा सूर्यकिरणांत मृगजळाचा आभास व्हावा तसा मायेमुळें होतो व आपण ईश्वराहून वेगळे आहोंत असें वाटतें.

विशिष्टाद्वैतवादाचे पुरस्कर्ते रामानुजाचार्य हे बाराव्या शतकांत होऊन गेले. भक्तिकरितां त्यांना सगुण ब्रह्म अधिक उपयुक्त वाटला. त्यांनीं जीव, जगत् व परमेश्वर असे तीन निरनिराळे पदार्थ मानले. जीव व जगत् हे ईश्वराच्या आधीन आहेत. जीवात्मे अनंत असून त्यांना स्वतंत्र अस्तित्व आहे व ब्रह्मांत लीन होईपर्यंत त्यांना अनेक योनींतून फिरावें लागतें. अद्वैतवादांत सगुण ईश्वराला स्थान नाहीं, म्हणून अवतारवाद विशिष्टाद्वैत वादांतच येऊं शकतो. तुलसीदासांनीं ह्या दोन्हीं तत्वांचा समन्वय केला आहे. ईश्वर निर्गुण असून तो भक्तांकरितां सगुण रूप धारण करितो.

'अगुन, अरूप, अलख, अज जोई । भगत प्रेमबस सगुन सोई होई ॥'

अद्वैतवादांत ज्ञानाचें प्राधान्य आहे. तर विशिष्टाद्वैत वादांत भक्तीचें महत्त्व आहे.

## ज्ञान व भक्तीचा समन्वय

ज्ञानमार्गाचा मोठेपणा तुलसीदासांनीं मान्य केला आहे. कारण तोहि ईश्वराचें सान्निध्य प्राप्त करून देतो.

" भगतिहिं ज्ञानहिं नहिं कछु भेदा । उभय हरहिं भवसंभव खेदा ॥ "

प्रथम भगवत्कृपेमुळें मनांत सात्त्विक भाव उत्पन्न होतो. मग जप, तप नियमांच्या पालनानें मनांत सद्भाव निर्माण होतो व विषयापासून अलिप्त झाल्यावर मनांत धर्माचा उदय होतो. पुढें क्रमशः वैराग्य, ज्ञान, विज्ञानाचा बोध होऊन योगद्वारें मनुष्य मुक्त होतो.

ज्यांना हा मार्ग शक्य असेल त्यांनीं तो अवश्य आचरावा, परंतु सामान्य माणसाला सोपा म्हणजे भक्ति-मार्ग होय, रामानें शबरीला नवविधा भक्ति समजावून दिली.

‘ श्रवणं कीर्तनं विष्णोःस्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।। ’

हेंच थोड्याफार फरकानें तुलसीदासांनीं सांगितलें आहे. ह्यांत क्रमाक्रमानें उन्नति करून मनुष्य मोक्षाप्रद जातो. पण नवविधा भक्तीहूनहि साधारण लोकांकरितां सुगम व सरळमार्ग म्हणजे रामनाम होय. रामनाम हें राम ह्या व्यक्तीपेक्षां श्रेष्ठ आहे—

रामनाम मणिदीप धरूँ जीह देहरी द्वार ।
तुलसी भीतर बाहिर हुँ, जौ चाहसी उजियारा ॥

तुलसीदास म्हणतात, ‘ अंतर्बाह्य जर तुला ज्ञानाचा प्रकाश पाहिजे असेल तर हे नरा ! जीभेच्या उंबरठ्यावर रामनामाचा दिवा धरं ’ शंकर पार्वतीला सांगतात; ‘ माझ्या-मतें रामापेक्षां रामनामच श्रेष्ठ आहे. ’

गीतेंत यज्ञ, तप, व दानाचें श्रेष्ठत्व मान्य करून सुद्धां कलियुगांत रामनामच योग्य व उत्तम असें ते म्हणतात.

‘ कृतयुग त्रेता द्वापर पूजा मख अरू जोग ।
जो गति होई सोकलि हरि नाम ते पावहिं लोग ॥ ’

**कर्म** .

मनुष्याच्या जीवनांत कर्म, भक्ति व ज्ञान ह्यांचा सुंदर सामंजस्य पाहिजे. प्रत्येक माणसानें आपलें पारिवारिक कर्तव्य पार पाडलेंच पाहिजे. राम, लक्ष्मण, भरत, वशिष्ठ, सुग्रीव, हनुमान, सीता, मंदोदरी हीं सर्वंच चरित्रें कर्तव्याची महति गाणारीं आदर्श चरित्रें होत. आपलें कर्म सोडून रानांत जाऊन ईश्वरभक्ति करा असा आदेश तुलसी-दासांनीं दिला नाहीं. रामदासांनींहि ‘आधीं प्रपंच करावा । मागुनी परमार्थ साधावा ॥’ असें म्हटलें आहे. भक्तींत जर लोककल्याणाची भावना नसेल तर ती भक्ति लंगडी आहे, निरुपयोगी आहे असें तुलसीदासांनीं स्पष्ट म्हटलें आहे. आत्मकल्याण व लोककल्याण वेगळें असूंच शकत नाहीं. रामाचें लोकरक्षक रूप हेंच शिकवतें. राम आदर्श पुत्र, आदर्श भक्त, आदर्श पति, आदर्श मित्र व आदर्श राजा होता.

**नारी**

तुलसीदासांनीं जीव तीन प्रकारचे मानले. विषयीं, साधक व सिद्ध. कलियुगांत जे अनर्थ चाललेत ते दाखवून त्यांना अनुलक्षून त्यांनीं ‘ विषयी ’ लोकांबद्दल अधिक लिहिलें आहे.

'नारिविबस नर सकल गोसाई । नाचहिं नर मर्कट की नाई ॥

गुनमंदिर सुंदर पति त्यागी । भजहिं नर परपुरुष अभागी ॥'

स्त्रीच्या पंजात सांपडलेला पुरुष माकडचेष्टा करीत होता, तर सुंदर सद्‌गुणी पतीला सोडून स्त्री परपुरुषावर अनुरक्त झाली होती. स्त्री ही विषयवासनेची, मोहाची प्रतीक मानून तुलसीदासानीं अशा प्रमदांविषयीं फार कठोर शब्द काढले आहेत.

'अधम ते अधम अति नारी ॥' अथवा

विधिहु न नारी हृदय गति जानी । सकल कपट अघ अवगुन खानी ॥

अशा ह्या विषयापासून दूर राहिल्यावरच मनुष्य उन्नति करून घेऊं शकतो. परंतु सीता, कौसल्या, सुमित्रा, सुनयना, तारा, मंदोदरी आदी साध्वी स्त्रियांची उज्वल; चरित्रें त्यांनीं मुक्तकंठानें गाईलीं. केवळ पातिव्रत्याचें पालन करून स्त्री मुक्त होऊं शकते.

'बिनुसम नारि परम गति लहई । पातिव्रतधर्म छाडि छळ गहई ॥'

कालीदासाप्रमाणें तुलसीदासांनी स्त्रीचे सर्व अधिकार मान्य केले आहेत.

'गृहिणी सचिवः सखी मित्रः प्रियशिष्या ललिते कलाविधौ ॥'

तारानें आपल्या पतीला रामाला विरोध न करण्याचा उत्तम सल्ला दिला होता. पण वालीनें तो पायांखाली तुडविला. वालीला उद्देशून राम म्हणतो, 'तूं अतिशय गर्विष्ठ व मूर्ख आहेस, स्त्रीच्या सांगण्याकडे तूं दुर्लक्ष केलेस.

तुलसीदासांना स्त्रीविषयीं सहानुभूति होती, तिच्या पारतंत्र्याची पूर्ण कल्पना होती. हिमालयाची पत्नी आपली मुलगी पार्वती पतिगृहीं जाण्यास निघाली असतांना म्हणते,

'कतविध सृजी नारि जगमाहीं । पराधीन सपनेहु सुख नाहीं ॥'

परतंत्र माणसाला स्वप्नांतहि सुख मिळत नाहीं, मग अशी ही स्त्री परमेश्वरानें निर्माण तरी कां केली !'

तुलसीदास उदार मतवादी असले तरी पतीविरुद्ध विद्रोह करण्याचा उपदेश त्यांनीं स्त्रीला केला नाहीं. पति कसाहि असो त्याच्या सेवेंत व त्याला सुधारण्यांतच स्त्रीचें कल्याण आहे. रावणाची स्त्री मंदोदरी ही अशीच स्त्री होती. समाजाची विस्कळीत घडी बसविण्याकरितां कौटुंबिक शांतीचें आत्यंतिक महत्त्व तुलसीदासांनीं ओळखलें होतें. कांहीं ठिकाणीं तर त्यांनीं मुद्दामच स्त्री स्वातंत्र्य विरोधी वाक्यें घातलीं आहेत.

महावृष्टिचले फूटी कियारी । जिमि स्वतंत्र भये बिगरी नारी ॥

स्त्रीच्या एकपतिव्रताचा आदर्श त्यांनीं पुरुषालाहि लागू केला. स्वैराचाराला आळा घालण्यासाठीं एकपत्नीव्रताची त्यांना आवश्यकता भासली.

एक नारिव्रतरत सब झारी । ते मनक्रमवच पतिहितकारी ॥

कुमार्गगामी स्त्री शूर्पणखेप्रमाणें विद्रूप केली तरी क्षम्य आहे. स्त्रीकडे तिरक्या नजरेनें पहाणाऱ्याला कडक शासन झालेंच पाहिजे. परंतु धाकटी भावजय बहीण, सून अथवा कन्या ह्यांच्याकडे जो पुरुष पापी दृष्टीनें पहातो, त्याला ठार मारला तरी पाप नाहीं.

" अनुजवधु, भगिनी सुतनारी । सुनुसठ कन्या सम ये चारी ॥
इनहिं कुदिष्टि बिलोकइ जोई । ताहीं वधे कछु पाप न होई ॥ "

अनार्यांत वडिल भावाच्या पत्नीशीं विवाह करण्याची चाल होती. पण वालीनें सुग्रीवाच्या—धाकट्या भावाच्या बायकोला बळजबरीनें आपल्या महालांत नेऊन ठेविली होती. रामावरील वालीवधाचा कलंक अशाप्रकारें दूर करण्याचा प्रयत्न तुलसीदासांनीं केला.

### कर्मफल

भारतीय संस्कृतींत कर्मफलाचें फार महत्त्व आहे. आपला पुनर्जन्मावर विश्वास आहे. मनुष्य जें कर्म करतो त्याला अनुसरूनच पुढील जन्मीं त्याला परिणाम भोगावा लागतो. राम लक्ष्मणाला म्हणतो, " मनुष्य मोहानें नाना पापें करून, मोक्षपद गमावून बसतो. मी काळरूप बनून त्यांना चांगलीं अथवा वाईट फळें भोगावयास लावतों. "

" करहिं मोहबस नर अघ नाना । स्वारथरत परलोक नसानौ ॥
कालरूप तिन्ह कहँ मैं भ्राता । सुभ अरु असुभ कर्म फलदाता ॥

काळ फार कठोर आहे, त्याला डावलतां येत नाहीं.

" काल सदा दुरतिक्रम भारी ॥ "

तुलसीदास बुद्धि श्रेष्ठ मानतात. मनुष्याच्या पूर्वकर्मानुसार त्याचा स्वभाव बनतो व स्वभावानुसार तो कार्य करण्यास उद्युक्त होतो. पूर्वकर्मानुसार त्याच्यावर परिस्थिति गुजरते. परंतु बुद्धिचा उपयोग करून आध्यात्मिक उत्कर्ष साधणें प्रत्येकाच्या हातीं असतें. जे लोक हें जाणतात, ते विषम परिस्थितींत ' इश्वरेच्छा बलीयसी ' म्हणून धैर्य धारण करून कार्य प्रवृत्त होतात; पण जे मूर्ख आहेत, ते विनाकारण दैवाला व देवाला दोष देतात.

' कालहिं कर्महिं ईश्वरहिं, मिथ्या दोष लगाय ॥ '

विपरीत प्रसंगांना तोंड देऊन स्वतःचा विकास करून घेतला पाहिजे. जे भित्रे व अकर्मण्य आहेत, ते दैव दैव म्हणून ओरडतात.

कादर मन कहुँ एक आधारा । दैव देव आलसी पुकारा ॥

### वर्णाश्रमधर्म

समाजाला वर्णांची फार गरज आहे असें तुलसीदासांचें मत होतें. वाटेल त्यानें

वाटेल तो व्यवसाय उचललेला त्यांना पसंत नव्हता. खालील एका दोह्यांत तेव्हांच्या स्थितीचें यथार्थ ज्ञान होतें.

वादहिं सूद्र द्विजन्हसन, हम तुम तें कछु घारी ।
जानहिं वेद सो विप्रवर, आँख दिखावत डाँटी ॥

ज्याला वेद कळतो तोच ब्राम्हण असें शूद्र म्हणूं लागले होते.

तुलसीदासांनीं निर्गुण उपासक जे संत म्हणून ओळखले जात होते, त्यांची व ब्राह्मणांची सेवा करा असा आदेश दिला. ब्राह्मणांकडे वैदिक ज्ञान असे, ते संस्कृतीचे रक्षक होते. परंपरागत कांहीं ना कांहीं संस्कार त्यांच्यामध्यें वास करीत होते. राम लक्ष्मणाला म्हणतो,

मोहि न सोहाई ब्रम्हकुल द्रोही ॥

ब्राम्हणांचा द्वेष करणारा मला मुळींच आवडत नाहीं. परंतु जे ब्राम्हण खरोखरीच दुराचारी होते त्यांच्यावर त्यांनीं 'विप्र निरच्छर लोलुप कामीं ॥' म्हणून कडक शब्दांत टीका केली.

शूद्रांनीं ब्राम्हणाची गादी चालवावी, हें जरी त्यांना आवडत नव्हतें; तरी त्यांना नीच लेखावें हें तर त्यांना मुळींच रुचत नव्हतें. तुलसीदास राम, वशिष्ठ, निषाद, भिल्ल आदि रानटी लोकांना छातीशीं धरतात. रामानें शबरीलाच नवविधा भक्ति शिकविली. उपासनेच्या क्षेत्रांत तर सर्वांचा अधिकार सारखाच. नीच जातीचे काक भुशुंडी सरळ देवळांत जाऊन पूजा करीत होते, असा तुलसीदासांनीं उल्लेख केला आहे.

इ. सनाच्या दहाव्या शतकापर्यंत वर्णाश्रमधर्म पाळला जात होता. पित्याचा व्यवसाय पुत्र करीत असे. परंतु उच्चनीचतेचा भाव समाजांत घुसला नव्हता. दहाव्या शतकानंतर त्यांना फारच तीव्र स्वरूप प्राप्त झालें. हे भेदभाव दूर करण्याचा तुलसीदासांनीं आटोकाट प्रयत्न केला.

कौटुंबिक शांततेप्रमाणेंच सामाजिक शांततेची देशाच्या उत्कर्षाकरितां अत्यंत गरज होती. म्हणून वर्णाश्रमधर्मांच्या मर्यादा सर्वांनीं पाळाव्या असा त्यांचा कटाक्ष होता.

अशाप्रकारें स्वतः मठ स्थापन न करितां अगर शिष्यपरंपरा निर्माण न करतां तुलसीदासांनीं समाजांतील नैराश्य व दुरावस्था दूर करून संस्कृतीच्या दिव्य प्रकाशानें हिंदु जनतेचें हृदय आलोकित करण्याचा प्रयत्न केला. ह्यांतच त्यांच्या मोठेपणाचें रहस्य आहे.



# श्रीगुरु ग्रंथांतील नामदेवांची वाणी

अनुवादक : **गणेश विष्णु कविटकर**, एम्. ए.

: ३४ :

भगवान् श्रीकृष्ण जी वेणू वाजवीत असत ती वेणू अथवा मुरली धन्य होय. त्या वेणूंतून निघणारा गोड गोड व हृदयाचा ठाव घेणारा ध्वनि सर्वत्र दुमदुमून राहिला होता. सुंदर केशपंक्तीप्रमाणें श्रीकृष्णावर पडणारा पाऊसहि भाग्यवान् होय ! श्रीकृष्ण जी कांबळ घांघरींत होते तीसुद्धां भाग्यवान् होय ! देवकी माते ! ! तूंहि धन्य आहेस ! ! ! तुझ्या घरांतच कमलापति रमून गेले. तेथें राहूनच त्यांनीं अनेक बाललीला केल्या. नानदेव म्हणतात, तो वृंदावनाचा वनप्रदेशहि धन्य धन्य होय ! त्याठिकाणींच प्रभु श्रीनारायणानीं अनेक क्रीडा केल्या, वेणू वाजवीत गाई चारल्या आणि आनंदी आनंद केला.

: ३५ :

हे माझ्या बापा माधवा । सांवळ्या वर्णाच्या विठुराया ।। तूं धन्य आहेस. हातीं चक्र घेऊन गजेंद्राचा उद्धार करण्यासाठीं तूं वैकुंठाहून आलास. दुःशासनाच्या सभेंत द्रौपदीचें वस्त्रहरण केलें असतां कपडे पुरवून तूं तिचें रक्षण केलेंस, आणि अशा कित्येक जीवांचा तूं उद्धार केलास. याकरितां कनिष्ठ व हीनजाति असा मी नामदेव तुला शरण आलों आहें.

: ३६ :

प्रत्येक शरीरांत बोलण्याची क्रिया ईश्वर करीत असतो. ईश्वराशिवाय स्वतंत्रपणें कोण बोलूं शकणार ? हत्ती व मुंगी हीं एकाच मातीचीं—नानाप्रकारचे घट—शरीरें—ही त्याच मातीचीं कीटक, फुलपांखरें आणि सृष्टींतील चराचर वस्तु या सर्वांच्या ठिकाणीं ईश्वर भरून राहिला आहे. तो अनंत आहे. त्याचा विचार करा आणि सर्व वासनांचा त्याग करा. नामदेव म्हणतात, मी तर निष्काम झालों आहे. ईश्वर कोण ? आणि भक्त कोण ? आतां येथें स्वामीसेवकपणा किंवा ईश्वर आणि त्याचा भक्त असा वेगळा भाव राहिला नाहीं.

: ३७ :

प्रभूला शरण जातांच चार मुक्ति व चार सिद्धी लोटांगण घालीत आल्या. मी मात्र मुक्तावस्थ आहें. चारहि युगांत माझी कीर्ति झाली. यश आणि कीर्ति यांचें

छत्रच जणूं काय माझ्या मस्तकावर धारण करण्यांत आले. प्रभु रामरायाच्या नामाचा जप करून कोण तरला नाहीं? श्रीगुरुदेवाचा उपदेश आणि संत सहवास यांच्यामुळें ज्याला आत्मज्ञान होतें त्यासच भक्त म्हणावें. ज्यांच्या हातांत शंखचक्र आहेत, ज्याच्या गळ्यांत माला आणि मस्तकीं ज्यानें तिलक धारण केला आहे, अशा प्रभुरायाचें दर्शन ज्यास झालें त्या भक्ताच्या सामर्थ्यास पाहून प्रत्यक्ष काळहि भयभीत होतो. असा भक्त निर्भय असतो. रामनामाच्या योगानें त्याला प्राप्त झालेल्या सामर्थ्याची कीर्ति चोहोंकडे पसरते, त्यानें कामक्रोधादि विकार जिंकलेले असतात. त्याला जन्ममरणाचें दुःख नसतें, तो मुक्त झालेला असतो. प्रभूनें अंबरीष राजाला अभयपद दिलें, बिभीषणाला लंकेचें राज्य अर्पण केलें, सुदाम्याला द्रव्याची नऊ भांडारें दिलीं आणि ध्रुवाला अढळपद दिलें. देवानें भक्त प्रल्हादाच्या रक्षणाकरितां नृसिंहाचा देह धारण करून हिरण्यकश्यपूस ठार केलें. नामदेव म्हणतात, तो माझा केशव भक्तांच्या ठिकाणीं वास करीत असतो आणि आजहि तो बळीचे दारांत उभा आहे.

: ३८ :

हे जिव्हे! तूं ईश्वराचें नामस्मरण करणार नाहींस तर तुझे शतशः तुकडे करीन. तूं हरिनामानें रंगून जा. इतर कर्में मिथ्या आहेत. एका हरिनामानेंच निर्वाणपद प्राप्त होईल. इतर असंख्य कोटि देवतांची पूजा एका हरिनामाची बरोबरी करू शकत नाहीं. नामदेव म्हणतात, तूं एवढेंच कर! देवा! तुझीं रूपें अनंत आहेत.

: ३९ :

परधन आणि परदारा यांचा जो अपहार करीत नाहीं त्याचे ठिकाणीं परमेश्वराचें वास्तव्य असतें. जो हरिभक्ति करीत नाहीं त्याचें मी दर्शनहि घेत नाहीं. ज्यांच्या मनांत परमेश्वरासंबंधीं शंका आहे ते नर पशुप्रमाणें होत. नामदेव म्हणतात, सौंदर्याची बत्तीस लक्षणें असूनहि जर नाक नसेल तर त्याला शोभा नाहीं. (तसेंच मानवी जीवनांत हरिभक्तिशिवाय सौंदर्य नाहीं.)

: ४० :

कपिला गाईची (एके दिवशीं नामदेवांनीं) धार काढली. एका कटोऱ्यांत दूध व एका गडव्यांत पाणी घेऊन नामदेव देवळांत गेले. देवाची त्यांनीं प्रार्थना केली, "हे गोविंदराया! हें दूध तुम्ही प्या, म्हणजे माझ्या मनाला आनंद होईल नाहींतर माझ्यावर वडिल रागावतील. माझ्या अंतःकरणांत फक्त तुमचीच भक्ति आहे." असें म्हणून त्यांनीं रिकामी वाटी दुधानें भरून देवापुढें धरली. नामदेवाकडे पाहून देवाला हंसे

आलें व त्यांनीं दूध पिऊन टाकलें. भक्त ( नामदेव ) मग घरीं गेले. याप्रमाणें नामदेवांना श्रीहरीचें दर्शन झालें.

: ४१ :

मी एक बावरी स्त्री आहे. प्रभुरामराय हा माझा पति आहे. रामरायासाठीं मी पुनः पुनः नीटनेटका शृंगार करीत असतों, लोकहो ! तुम्ही माझी खुशाल निंदा करा. मी माझें शरीर व मन प्रभुरामरायास अर्पण केलें आहे, मी कोणाशींहि वादविवाद करणार नाहीं. रसनेनें रामनामामृताचें प्राशन करीन, आतां मी मनांत समजून चुकलों आहे कीं, नामसंकीर्तनाच्या जयघोषांत, निशाणें, वाद्यें यांच्या निनादांत प्रभु गोपालाशीं मी मिळून जाईन. अशी घटना आतां घडवून आणली जात आहे. नामदेव म्हणतात, जनहो ! तुम्ही माझी स्तुति करा अगर निंदा करा. मला श्रीरंग प्रभूचें दर्शन झालें आहे.

: ४२ :

दूध, साखर, आणि तूप यांनीं युक्त असें गोड जेवण कधीं कधीं आवडेनासें होतें. केव्हां तुकड्यासाठीं घरोघर भीक मागावी लागते तर केव्हां शेतांतील दाणे वेंचून राहावें लागते. हे बंधो ! प्रभुरामराय जसें ठेवील तसें राहावें. ईश्वराचा माहिमा कुणासहि सांगतां येणार नाहीं कधीं उत्तम शृंगारलेले घोडे बसावयास मिळतात तर कधीं पायांत घालण्यास जोडाहि मिळत नाहीं. कधीं शुभ्र वस्त्रें अंथरलेला पलंग झोंपण्यास मिळतो तर कधीं जमिनीवर पसरण्यास गवतहि मिळत नाहीं. नामदेव म्हणतात. श्रीगुरुदेवाच्या कृपेनें आणि एका ईश्वराच्या नामस्मरणानेंच पार पडाल. श्रीगुरुकृपा ज्यावर झाली तो ऐहिक संसार सहज तरून जातो.

———


# ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण होलसेल व रिटेलर्स**

# अर्वाचीन संत चरित्र कथन

श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईनाथांचा दरबार द्वारकामाईंत भरला होता. अनेक मंडळी सदरेला होती. बाबांचे परमभक्त त्यांच्या दुतर्फा बसले होते. ह. भ. प. दासगणूही हजर होते. पारमार्थिक चर्चा ऐन रंगांत आली होती. मध्येंच बाबा दासगणूस म्हणतात, "अरे, सर्व संतांस मेजवानीचें आमंत्रण करून त्यांना पंचपक्वान्नांचें भोजन घाल." बाबांच्या बोलण्याचें सर्वांस आश्चर्य वाटलें. दासगणूसही प्रथम कांहीं बोध होईना. उत्तर न देतां ते उगी बसले. संतांचें बोलणें नेहमींच सांकेतिक असतें. तें पटकन् उमगत नाहीं. आणि तें कळण्यास तेवढी पात्रता असणें आवश्यक असतें. विचारांअंतीं दासगणूंस उमगलें कीं, आपण संतचरित्रें लिहावीं असा बाबांच्या म्हणण्याचा हेतू असावा. कारणः—

संत हेच भूमीवर । चालते बोलते परमेश्वर ।
वैराग्याचे सागर । दाते मोक्षपदाचे ॥ १ ॥
संत सन्नीतीची । मूर्ति होय प्रत्यक्ष साची ।
संत कल्याणाची । पेठ आहे विबुध हो ॥ २ ॥
ईश्वरी तत्त्वांचें वाटाडे । संत हेची रोकडे ।
हे अमोघ ज्ञानाचे ते गाडे । भरले असती प्रत्यक्ष ॥ ३॥

म्हणून श्रीदासगणूंनीं गांवोगांवी हिंडून अति परिश्रमानें आधुनिक संतांविषयीं माहिती मिळविली आणि आपल्या प्रेमळ, रसाळ व प्रासादिक वाणीच्या द्वारें त्यांनीं तीन भागांतून तीं संतांची चरित्रें ओवीबद्ध गाईलीं आहेत.

## संतांचा सुखकर सहवास

श्रीसाईलीलेच्या या अंकापासून हीं चरित्रें संक्षिप्तपणें क्रमशः गद्यांत देण्याचा आमचा मानस आहे. यापैकीं कांहीं चरित्रें साईलीलेच्या अंकांतून यापूर्वी प्रसिद्ध झालीं आहेत. हा आमचा उपक्रम वाचकांस आवडेल अशी आशा आहे. प्रेरणा करणारे बाबा आणि हें कार्य सिद्धीस नेणारे पण बाबाच. कर्ते करविते तेच. संतसहवास घडणें हा मोठा लाभ ! प्रत्यक्षांत संत सहवास होत नसला तरी संतचरित्र गायनानें आणि श्रवणानें ही संधी मिळणार आहे. करितां ह्या सत्संगतीचा लाभ करून घेऊन आपण आपलें कल्याण साधूं या.

## संत गोपाळनाथ

कोंकणांतील मालवण नजीकच्या परुळें गांवांत विठ्ठलपंत नांवाचे कुडाळदेशकर अश्वलायन ऋग्वेदी शाखेचे ब्राह्मण सद्गृहस्थ राहत असत. त्यांच्या पत्नीचें नांव होतें अन्नपूर्णा. त्यांना गोपाळ नांवाचा लहान मुलगा होता. घरची अतिशय गरिबी. गांवांत एकाएकीं दुष्काळ पडला आणि विठ्ठलपंत अकस्मात मृत्यू पावले. बिचारी अन्नपूर्णा धाय मोकलून रडूं लागली. चार दिवस झाले. घरांत अन्नाचा कणही नव्हता. लहानगा गोपाळ आईचें सांत्वन करीत म्हणतो, " आई, चल, आपण भालगवास भेटूं आणि त्याच्याजवळ खायला मागूं. रडूं नको. " मुलाचे हे बोबडे बोल ऐकून त्या माऊलीचा ऊर भरून आला. तिनें आपलें मन आवरलें आणि पाणी पिऊन तीं दोघं तशीच झोपीं गेलीं. पहांटेच्या सुमारांस अन्नपूर्णेस प्रत्यक्ष परशुरामानें स्वप्नांत दर्शन दिलें आणि म्हटलें, " तूं मुलास घेऊन यात्रेकरूंच्याबरोबर पंढरपुरास जा. तेथें तुझी व्यवस्था होईल आणि कल्याणही होईल. "

देवांच्या आदेशाप्रमाणें अन्नपूर्णा गोपाळासह यात्रेकरूंबरोबर मजल, दर मजल कूच करीत पंढरीस आली. पांडुरंगाचें दर्शन घेऊन आपलें व गोपाळाचें रक्षण करण्यास त्यांस भक्तिपूर्वक विनविलें. गेले पंधरा दिवस अन्न नाहीं. चोखोबांचे समोर देवास आळवावयास बसली. इतक्यांत देवांचे लाडके परम भक्त माणकोजी बोधले पाटील यांनीं तिला पाहिलें. त्यांनीं तिची चौकशी केली. तिची करूणास्पद हकिगत ऐकून त्यांचें मन द्रवलें. त्या विठ्ठलभक्तानें तिला आपली धर्मकन्या मानून घरी नेलें. पाटलांनीं ब्राह्मणाकरवी गोपाळाची मुंज करविली. पाटलाच्या संगतीमुळें गोपाळरावास पंढरीची वारी घडूं लागली. गोपाळही माणकोजीची सर्व तऱ्हेने सेवा करीत असे व त्यांच्या आज्ञेंत वागे. त्याची भक्ति पाहून त्यांनीं त्यास " माळ " दिली आणि उपदेश करून मंत्र दिला. गुरुकृपा होतांच गोपाळास सर्वत्र श्रीहरी दिसूं लागला.

## गोपाळाची कसोटी

एकदां पांडुरंगानें गोपाळाची परिक्षा घेण्याचें ठरविलें. पाटील खळ्यावर होते. गोपाळ त्यांच्यासाठीं भाकरी आणि भजनाचे टाळ घेऊन घरातून निघाला. शेताकडची वाट घनदाट झाडींतून जात होती. चालतां चालतां रात्र झाली. अंधार पडला. गोपाळ झरझर पावलें टाकीत होता. इतक्यांत विठ्ठलानें वाघाचें रूप घेऊन डरकाळ्या फोडीत तो गोपाळासमोर ऊभा राहिला. त्याला पाहतांच गोपाळ घाबरला. पण गुरुस्मरण करून धीटाईनें म्हणाला 'अरे वाघा! थोडा थांब, शेतावर माझे गुरु बोधले पाटील उपाशीं आहेत. त्यांना ह्या भाकऱ्या नेऊन देतों आणि परत येतों. मग मला खा. ' वाघाला काय वाटलें कोणास ठाऊक तो बाजूला झाला. गोपाळ धांवतच शेतावर गेला. पाटलांना भाकरी देत तो म्हणाला. गुरुजी, लवकर जेवा, वाघ माझी वाट पाहत आहे. मी त्याला परत येण्याचें वचन दिलें आहे.' माणकोजींनीं अंतर्ज्ञानानें ओळखलें कीं, हा वाघ नसून प्रत्यक्ष पंढरीचा राणा आहे. त्यांच्या कृपेनें गोपाळास पांडुरंगाचें दर्शन झालें.

## भगवंताला काळजी

पुढें गुर्वाज्ञेनें गोपाळनाथ (आतां लोक त्यांना ह्याच नांवानें संबोधूं लागले) आईसह आपल्या मायदेशीं कोंकणांत परतले. ते सावंतवाडीस एका तळ्याकाठीं उतरले. तेथें शंकराच्या मंदिरांत राजाज्ञेनें पावसासाठीं अनुष्ठान चाललें होतें. गोपाळनाथानीं हें पाहून लोकांस सांगितलें कीं, अनुष्ठान करण्यापेक्षां हरिनामाचा गजर केल्यास पाऊस पडेल. लोकांनीं तसें करतांच पर्जन्यवृष्टी झाली. वाडीच्या खेमराजाला हें कळतांच तो महाराजांच्या पदीं लीन झाला. त्यानें त्यांच्यासाठीं मळगांवांत मठ बांधला. पुढें तेथें एक विठ्ठलमंदिर उभारलें गेलें. एकदां एकादशीचे दिवशीं रात्रीं खेमराजाच्या विनंतीवरून राजवाड्यांत हरिकीर्तन करण्यास ते मळगांवाहून निघाले. बरीच भक्त मंडळी बरोबर होती. अर्ध्या वाटेंतच गोपाळनाथांना एका लिंबाच्या झाडाखालीं समाधी लागली. ते तेथेंच बसून राहिले. बरोबरचे लोक ह्यांना सोडून राजास कळविण्याकरितां पुढें निघाले. इकडे पांडुरंगाला काळजी पडली. आपला भक्त तर आत्म समाधींत. कीर्तनास सुरुवात तर झाली पाहिजे; नाहींतर राजाचा रोष होईल. म्हणून देवानेंच गोपाळनाथांचें रूप घेऊन ते राजवाड्यांत प्रगट झाले आणि त्यांनीं कीर्तनास सुरुवात केली. बुवाना सोडून निघालेल्या लोकांनीं राजमंदिरांत येऊन कीर्तन चालू असलेलें पाहतांच त्यांना आश्चर्य वाटलें. ज्याचें कीर्तन करावयाचें तोच देव, कीर्तनास उभा राहिलेला. मग काय? कीर्तन उत्तम रंगलें, हें सांगावयास नको. कीर्तन संपलें. आरती झाली आणि खिरापत वाटण्यांत आली. मळगांवचें लोक परत निघाले. वाटेंत त्या लिंबाच्या झाडाखालीं गोपाळनाथांना पाहून हे आपल्या अगोदर येथें कसें आले याबद्दल त्यांना पुन्हा आश्चर्याचा धक्का बसला. त्यांनी बुवांना समाधींतून जागें केलें. ते लोकांना म्हणाले, 'अरे चला, राजवाड्यांत कीर्तनाला जायचें आहे ना?' लोकांनीं सांगितलें, 'बुवा, कीर्तन तर केव्हांच होऊन गेलें. तुम्हीच तर तें केलें.' बुवांनीं अंतर्ज्ञानानें ओळखलें कीं आपल्या समाधीच्या वेळेंत विठ्ठलानेंच कीर्तन केलें. त्यांच्या डोळयांतून अश्रु वाहूं लागले. ते त्या मंडळीस म्हणतात; 'अरे! माझ्या पांडुरंगानें कीर्तन केलें. किती भाग्यवान तुम्ही. तुम्हास प्रत्यक्ष देवाचें दर्शन झालें.'

गोपाळनाथांनीं असे अनेक चमत्कार केले. लोकांच्या व्याधी हरण केल्या आणि अनेकांना त्यांनीं भक्तिमार्गास लाविलें.

गोपाळनाथ आषाढी कार्तिकीची वारी नित्य करीत असत. त्यांनीं महाराष्ट्र भाषेंत अगणित कविता केली आहे व स्कंदपुराणांतर्गत पांडुरंग महात्म्यहि रचिलें.

अशा या थोर सत्पुरुषानें शके सोळाशें बासष्टांत अश्विन वद्य षष्ठीला मळगांवीं आपला देह ठेविला.

# गुणत्रयी मीमांसा

**या जगांत पहावें तिकडे सत्व, रज व तम या गुणांनीं मंडीत अशीं माणसें आपल्या पहाण्यांत येतात. भगवान रामकृष्ण परमहंसानीं या गुणत्रयांचें स्पष्टीकरण अनेक दाखले देऊन केलें आहे.**

संसारी लोकांत जसे सत्व, रज, तम हे तीन गुण असतात, तसेंच भक्तींतही सत्व, रज, तम हे तीन गुण आहेत. संसारी लोकांचा सत्वगुण कसा असतो आहे ठाऊक? घर इथें थोडें खचलेलें, तिथें थोडें खचलेलें, दुरुस्तीचें नांव नाहीं, तिकडे लक्षच नाहीं, देवघरांत कबुतरांनीं घाण करून ठेवलेली, अंगणांत सेवाळ उगवले तरी त्याचा पत्ता नाहीं, घरांतलें लांकडी सामान कसें जुनें जुनें होऊन पडलेलें, ठीक ठीक करण्याची पंचाईतच नाहीं. कपडे असतील तसे तेही जेमतेम, एखाद दुसरा असला कीं झालें. स्वतः स्वारी मात्र खूप शांत, शालीन, दयाळू, आंत बाहेर एक. कधीं कुणाचें वाईट करणार नाहीं.

संसाऱ्यांच्या रजोगुणाची देखील कांहीं लक्षणें आहेत. खिश्यांत घड्याळ, त्याची साखळी मारेबाहेर लोंबते आहे. हातांत दोन तीन अंगठ्या, घरांतील सामानसुमान खूप साफसूफ—झकपक. भिंतीवर फोटो लटकलेलें. घराला सफेती मारलेली. कुठें लहानसा डाग देखील दिसायचा नाहीं. तऱ्हतऱ्हेचे नामी पोषाख. नोकरांचा देखील ठराविक जामानिमा. असला सारा थाटमाट.

संसाऱ्यांच्या तमोगुणांची चिन्हें म्हटलीं म्हणजे—कुंभकर्णासारखी झोंप, काम क्रोध, अहंकार, इत्यादि, इत्यादि. तशीच भक्तींत देखील सात्त्विक भक्ति असते. ज्या भक्तामध्यें सत्वगुण वसत असतो, तो ध्यान करतो अति एकांतांत; कदाचित् मच्छरदाणीच्या आंतच बसेल ध्यानाला. सारे समजतात कीं अजून निजूनच आहे हा. काल रात्रीं झोंप बहुदा चांगली झाली नसावी. म्हणून उशीर होत असावा उठायला. इकडे शरीरावर ममता बघावी तर दोन्ही वेळ पोटाला दोन गोळे देण्यापुरतीच आणि तें देखील मिळेल तें. पालेभाजीवर सुद्धां काम भागतें. जिभेचे चोचले नाहींत, कीं डामडौल नाहीं, कीं घरांत सामान-सुमानाचें प्रदर्शन नाहीं. आणि शिवाय सत्त्वगुणी भक्त कुणापुढें शेंपटी हालवून धनहीं नाहीं कमावत कधीं.

भक्तींत रजोगुण असल्यास कपाळावर टिळा, गळ्यांत रुद्राक्षांच्या माळा, माळेंत माळा, माळेंत मधून मधून सोन्याचे मणि! स्वारी पूजेला बसेल ती झगझगीत पितांबर नेसूनच.

अन् ज्याची भक्ति तमोगुणी, त्याचा विश्वास जळजळीत. असला भक्त ईश्वरावर जोर जबरदस्ती करतो, जणूं डाका घालून पैसे लुटून राहीला आहे. ' मारा झोडा, बांधा, असला डाकेखोरी भाव !

मोड फिरवून दिल्यास तमोगुणाच्या साहाय्यानें ईश्वरलाभ होतो त्याच्यापाशीं जिद्द धरून बसलें पाहिजे; परमेश्वर तर कुणी परका नव्हे आपलाच.

## तीन प्रकारचे वैद्य व आचार्य

अन् हें बघा. याच तमोगुणाचा उपयोग दुसऱ्यांच्या कल्याणासाठींहीं करण्यांत येतो. वैद्य तीन प्रकारचे असतात. —उत्तम, मध्यम आणि अधम. जो वैद्य येऊन नाडी पाहून 'औषध घ्या हं' म्हणून निघून जातो, तो उत्तम वैद्य. तें रोग्यानें घेतलें कीं नाहीं याची तो खबर ठेवीत नाहीं. जो वैद्य रोग्याला औषध देण्यासाठीं नानाप्रकारांनीं सांगतो; गोड गोड बोलून समजावतो 'बघा बरें, औषध नाहीं घेतलें, तर बरे बरे होणार? हें घ्या. मी आपल्या हातानें औषध खलून देतो. घ्या—आटपा चटकन्.'—तो मध्यम वैद्य. अन् जो वैद्य, रोगी कांहीं केल्या घेतच नाहीं असें पाहून त्याच्या छातीवर बसून गुडगा रोवून जबरदस्ती करून औषध रोग्याच्या घशांत ओततो, तो उत्तम वैद्य. हाच त्या वैद्यांतला तमो गुण, त्याच्यामुळें झालें तर रोग्याचें बरेंच होईल, कधीं वाईट नाहीं व्हायचें.

वैद्यांसारखे आचार्यहि तीन प्रकारचे. धर्माचा आदेश एकदां देऊन टाकला कीं मग शिष्यांची कांहीं वास्तपूस करीत नाहीं तो कनिष्ट आचार्य. जो शिष्यांच्या कल्याणासाठीं त्यांना वारंवार समजावून सांगतो, जेणें करून ते दिलेल्या उपदेशाची धारणा करूं शकतील अशासाठीं त्यांना दादा—बाबा करून आंजारतो गोंजारतो, नाना तऱ्हांनीं त्यांच्यावर प्रेम करतो—तो मध्यम कोटींतला आचार्य आणि शिष्य कांहीं केल्या ऐकत म्हणुन नाहींत असें पाहून आचार्य जोर जबरदस्तीनें करून त्यांना ताळ्यावर आणतात, त्यांना म्हणावें उत्तम आचार्य.

## त्रिगुणातीत ब्रह्म

एक माणूस एका जंगलांतून मार्ग काढीत चालला होता. अशा वेळीं तिथे डाकेखोर त्याला आडवे आले. त्यांनीं त्याच्याजवळचें सर्व कांहीं लुबाडलें. नंतर त्या चोरांपैकीं एक म्हणाला, "आतां या लेकाला ठेवून तरी काय लाभ?" असें म्हणूनच स्वारी थांबली नाहीं, तर तलवार काढून त्याला लंबे करायच्या मार्गाला देखील लागली. तेव्हां दुसरा मध्यें पडून त्याला म्हणतो, 'नको हो, याला छाटून टाकून आपल्या तरी काय पदरीं पडणार आहे? फार तर याची गठडी वळून येथेंच टाकून आपण रस्ता धरूं म्हणजे झालें." तें सर्वांना पसंत पडलें. त्यांनीं त्याचे हातपाय करकचून आवळून त्याला तेथेंच सोडून पळ काढला. कांहीं वेळानें त्यांच्यापैकीं तिसरा परत फिरून त्याच्याजवळ येऊन म्हणाला, "अहा! तुम्हाला लागलें नव्हे? या, मी तुमचे दोर सोडून टाकतो. नंतर त्याचें बंधन सोडून देऊन तो चोर त्यांस म्हणतो, "माझ्याबरोबर चला, मी तुम्हाला हम रस्त्यापर्यंत घेऊन जातो. बराच वेळ चालतां चालतां मोठा रस्ता आला तेव्हां तो चोर त्यांस म्हणतो, ह्याच रस्त्यानें चालूं लागा. तें बघा तुमचें घर देखील दिसतंय. त्यावर तो माणूस म्हणाला, 'महाराज, तुम्ही माझ्यावर केवढेतरी उपकार केलेत, तेव्हां

तुम्हीही चला कीं आमच्या घरापर्यंत.' चोरानें जबाब दिला, 'अहं, तें मात्र होणार नाहीं, शिपायांना पत्ता लागेल.'

हा संसार म्हणजेच अरण्य. सत्त्व, रज, तम, हे तीन गुण त्यांत दबा धरून बसणारे तीन डाकू. हे जीवाचें तत्त्वज्ञान लुबाडून घेतात. पैकीं तमोगुण तर जीवाचा सत्यानाशच करायला टपलेला असतो. रजोगुण जीवाला संसाराच्या खोड्यांत जखडून टाकतो. पण सत्त्वगुण त्याला रजतमाच्या कचाट्यांतून सोडवितो. सत्त्वगुणाचा आसरा घेतल्यानें माणूस काम, क्रोध वगैरे तमो गुणांच्या दुष्परिणामांतून वांचतो. शिवाय सत्वगुण जीवाचें संसारबंधन ढिलें करतो. पण सत्वगुण झाला तरी चोरच. परम तत्वज्ञान कांहीं देऊं शकत नाहीं तो. त्या परमधामाच्या रस्त्याला मात्र तो लावून देतो. एकदां रस्त्यावर आणून मग तो म्हणतो, 'तें बघा. तें तुमचें घर दिसतयं!' ब्रह्मज्ञानापासून सत्त्वगुणही खूप दूर.

## ब्रह्म सांगतां येत नाहीं

ब्रह्म काय चीज आहे तें तोंडानें सांगतां यायचें नाहीं! ज्याला लाभतें तोसुद्धां बातमी देऊं शकत नाहीं. काय म्हणतात ना कीं काळया पाण्यांत शिरलेलें जहाज पुन्हां फिरत नसतें.

एकदां चौघे मित्र फिरतां फिरतां भिंतीनें वेढलेल्या एका जागेपाशी येऊन ठेपले. भिंत खूप उंच होती. आंत काय आहे तें बघण्याची सान्यांनाच उत्कंठा लागून राहिली. सरतेशेवटीं एकजण कसातरी भिंतीवर चढला. आंत चढून काय पाहिले त्यालाच ठाऊक. एकदम विस्मित होऊन "अहा! अहा! करीत त्यानें आंत उडी मारली. मग खबर कसली देणार? बाकींच्यापैकीं, जो उठे तो अहा; अहा," करीत आंत पडून जाई! आतां सांगा, आंत काय आहे नाहीं याची बातमी द्यायची तरी कोणी.

कांहीं महात्मे ब्रह्मदर्शन झाल्यावर मग त्याची कांहीं खबर देऊं शकले नाहींत. ब्रह्मज्ञान लाभुन समाधि लागल्यावर मग 'मी' राहत नाहीं. म्हणून तर रामप्रसाद म्हणतो, 'मना, तुला एकट्याला जमत नसेल तर रामप्रसादाला मदतीस घेना.' ज्ञानानें मनाचा पूर्ण लय व्हायला हवा. इतकेंच नाहींतर परत 'रामप्रसादाचा' म्हणजे अहं तत्त्वाचा देखील विलय झाला पाहिजे. तेव्हांच कुठें खरें ब्रह्मज्ञान झालें असें म्हणता येईल.

कुणी कुणी म्हणतात कीं, शुकदेवांना ब्रह्म समुद्राचें दर्शनस्पर्शनच घडलें होतें. आंत उतरून त्यांनीं बुडी दिली नव्हती. म्हणूनच परत येऊन इतका उपदेश दिला. कुणी म्हणतात कीं ब्रह्मज्ञान–लाभानंतर ते या नामरूपात्मक दुनियेंत माघारीं फिरून लोक–शिक्षेस्तव राहिले. राजा परीक्षिताला भागवत् त्यांच्या मुखांतून ऐकविलें जाणार होतें, त्याचप्रमाणें इतरही कित्येक लोकांना त्यांच्याकरवीं उपदेश मिळणार होता म्हणूनच परमेश्वरानें त्यांच्या 'मी' चा सर्वस्वी लोप केला नाहीं, विद्येचा 'अहं' राखून ठेवला होता.

———

# शास्त्रें उपकारक का अपकारक ?

## सप्तगाथांच्या रूपानें शंकानिरसन

आज आपण अणुयुगांत वावरत आहोंत. शास्त्र आणि विज्ञान यांनीं प्रगतीचा उच्चांक गांठला असून त्यायोगें मानव अंतराळांत संचार करूं लागला आहे व लवकरच तो मंगळावर अथवा चंद्रलोकावर पदार्पण करील असे अंदाज बांधण्यांत येत आहेत. ही सर्वांगीण प्रगति मनुष्यास आधिभौतिक सुखाचा पुरेपूर लाभ करून देत आहे; परंतु पूर्वपुण्यबलानें ज्यासाठीं आपणांस हा नरदेह प्राप्त झाला आहे त्याच्या उद्धारासाठीं हा गाढाशास्त्राभ्यास उपयुक्त ठरणार आहे कां ? अशी शंका अध्यात्ममार्गी प्रवृत्तीच्या लोकांच्या मनांत आल्यावांचून रहात नाहीं. ही शंका आजचीच नाहीं तर यापूर्वींही देवादिकांनीं अनेक वेळ प्रदर्शित केली होती. प्रत्यक्ष देवांचा राजा इंद्र यानें आपले गुरु बृहस्पति यांच्या आश्रमांत विद्यार्थि अनेक शास्त्रें पढत असतांना पाहून हीच शंका प्रगट केली होती. देवगुरूंनीं त्याला सात गाथा सांगून त्याच्या शंकेचें निरसन केलें. या गाथा मनोरंजक तर आहेतच, परंतु त्यांचें तात्पर्य लक्षांत घेतां शास्त्रें बंधनकारक नसून आपला उद्धार करून घेण्यासाठीं आपण तीं कशीं राबविलीं पाहिजेत हें आपल्या लक्षांत येईल.

**गाथा पहिली :**—फार प्राचीन काळीं कांपिल्य नगरांमध्यें विधिज्ञ नामें एक शिल्पज्ञ राहत असे. तो शास्त्रशुद्ध घरें बांधण्यांत कुशल होता. त्यानें बांधलेलीं घरें सुखालयें असत. त्याच्या घरांत नेहमीं धर्मोत्सव व मंगल कार्यें होत. कोणाला कसली व्याधी होत नसे आणि अपमृत्यूही कधीं येत नसे. तो मरोनीं स्वर्गी गेला आणि तेथील सर्व सुखें भोगून या भूमीवर राजा होऊन आला. त्यानें अनेक प्रासाद, देवालयें, वावी, कूप, तडाग, बगीचे आणि धर्मशाळा बांधल्या. अनेक यज्ञ याग केले. अशा रीतीनें पुण्यसंचय करून मृत्यूनंतर तो स्वर्गास गेला. दिव्य भोग भोगून पुनःश्च तो एक सुमुहूर्तावर विप्रकुळीं जन्मास आला. त्यानें वेदाध्ययन करून सर्व विद्याभ्यास केला. गुरु प्राप्ति करून घेऊन तो आपला बहुतेक काल ईशचिंतनांत व्यतित करीत असे. चतुर्थाश्रमांचे यथायोग्य पालन करून तो ईशभक्त विप्र जीवन मुक्त झाला. अशा रितीनें त्यानें मुक्ति प्राप्त करून घेतली.

शिल्पशास्त्रविधीनें । वागतां किंविधिज्ञानें ।
गति अनुक्रमानें । घेतली योगानें दुर्लभ जी ॥

**गाथा दुसरी :**—नर्मदेच्या तीरावर वसलेल्या महिष्मती नगरीत गायन आणि वादन कलेंत निपूण असलेला एक ब्राह्मण राहण असे. तो रुपाने अतिशय सुंदर असून

उत्तम कवीही होता. त्याला संपूर्ण कामशास्त्र अवगत होतें. सुलक्षणी पद्मिणी स्त्री आपणांस प्राप्त व्हावी ही त्याची इच्छा. अशा नारीच्या शोधांत तो नेहमी फिरे. एके दिवशी तो राजवाड्यांत आला. राजानें त्याचा आदरसत्कार करून त्याची काय इच्छा आहे असें विचारलें. द्विज म्हणाला, "मी कामशास्त्रांत प्रवीण असून सामुद्रिकही जाणतों. शास्त्रयुक्त लक्षणांची पवित्र स्त्री मला मिळावी हींच माझी इच्छा." राजानें आपल्या कन्येस त्यास दाखविलें. राजकन्या सुलक्षणी आहे, हें पाहतांच तो मोहित होऊन गेला. विप्रास पाहून त्या कन्येचेंही मन विचलीत झालें. तीं दोघें एकमेकांकडे आकर्षित झालेली पाहून राजास अतिशय आनंद झाला व त्यांस मुलगा नसल्यामुळें त्यानें त्या ब्राह्मणास घरजावई करून घेतलें. ती राजकन्या पतिव्रता होती. तो विप्रही तिच्यावर प्रेम करीत असे. दोघांनीं कधी पातक केलें नाहीं आणि स्वप्नांतही दुःख पाहिलें नाहीं. अशा तऱ्हेनें परस्पर सुख भोगून तीं एकमनानें राहत असत. अंतीं त्यांना सुखाने मरण आलें. आणि तीं दोघेंही गंधर्वलोकीं गेलीं.

तेथें त्यांच्या गीत–वाद्य–तान–निपुणेतवर सर्व गंधर्व खूष होते. एके दिवशीं तीं मंजुळस्वरें गात असतां श्रीशंकरांनीं त्यांचें गाणें ऐकलें. ते त्यांच्या गाण्यावर मोहीत होऊन गेले आणि त्यांनीं त्या दांपत्याला स्वर्गी नेऊन ठेवलें. स्वर्गांत एक गायनोत्सव झाला. ब्रह्मदेवादि सर्व सुरवर हजर होते. सर्व गंधर्वांमध्यें ह्या ब्राह्मण गंधर्वांचा गोड आणि उत्कृष्ट स्वर ऐकून ब्रह्मदेव संतुष्ट झाले. त्या दोघांना पुढें बसवून त्यांनीं त्यांचें गाणें मनमुराद ऐकलें. पुढें त्यांनीं त्या दोघांना ब्रह्मलोकीं नेलें. अशा रीतीनें कृतोपासकांना जी गति असते ती त्यांना आली. आणि ज्या ठिकाणांहून पुनरावृत्ति नाहीं अशी उत्तम मुक्ति त्यांना प्राप्त झाली.

गुरु म्हणे इंद्रा ऐक । कामशास्त्र निश्चायक ।
तो ब्राह्मण सस्त्रीक । ब्रह्मलोकवासी झाला ॥
तो क्रम–मुक्तीचा अधिकारी । जाहला असे जो यापरी ।
शास्त्रतत्त्व निर्धारीं । क्रमें चारी मुक्ति घेतो ॥

**गाथा तिसरी :** वेदशर्मा नांवाचा एक सुविवेकी विप्र गोदातीरीं राहत असे. त्याच्या सुशील पुत्राचें नांव अन्वर्थक होतें. हा आचार संपन्न असून तो नित्य गायत्रीचें श्रवण मनन करी. दैव योगें करून त्याला सात भुतांनीं पछाडलें. हे सातही ब्रह्मराक्षस त्याला एकाच वेळीं गांठत आणि त्यांच्या चेष्टाही निरनिराळ्या असत. वेदशर्मा श्रीदत्तांचा उपासक होता. असें असतां असें दुःख कां व्हावें याचा तो विचार करी. एके दिवशीं मलीन आणि अंगाला दुर्गंधि येत असलेला असा एक भिक्षुक त्याच्या दारीं आला. त्याला भिक्षा वाढतांना त्या भिक्षुकाची कांती पाहून वेदशर्माच्या मनांत एकदम विचार आला कीं, हे माझे दत्तगुरू असावेत. तो भिक्षुक म्हणजे

खरोखरीच दत्त होते. वेदशर्मांचे विचार जाणून तो भिक्षुक पळूं लागला. वेदशर्मांही त्याच्या मागें धांवत सुटला. तो जंगलांत पळत सुटला. वेदशर्माला दगड मारूं लागला. तरी पण वेदशर्म्यांनें धांवत जाऊन निष्ठेनें त्याचे पाय धरले. श्री दत्तांनीं कृपाळू होऊन त्यास त्रिमूर्तिस्वरूप दर्शन दिलें. व त्यास आशीर्वाद दिला. वेदशर्म्यांनें दत्तांना आपल्या मुलाची व्याधी सांगितली. त्यांनीं त्यास सविधान सात मंत्र सांगितलें. तो वेदशर्मा विप्र घरी आला. सुस्नात होऊन न्यास, ध्यान करून त्यानें त्या मंत्रांचा प्रयोग आपल्या मुलावर केला आणि त्या सातही भूतांस बांधून टाकिलें. याप्रमाणे तो मुलगा भूतबाधेपासून मुक्त झाला.

मग तो अभ्यास करून । मुक्त झाला द्विजनंदन ।
असा क्षुद्र शास्त्रापासून । उपयोग जन करितात ॥
मंत्रशास्त्रही उपकारक । ही तिसरी गाथा सुरेख ॥

**गाथा चवथी :** सह्याद्रि पर्वताच्या रांगेंत वसलेल्या मातापूर क्षेत्रीं विष्णुदत्त शर्मा नांवाचा कर्मठ, मीमांसक, कर्मशूर आणि पवित्र असा द्विजवर रहात असे. त्याची पत्नी सुशील असून पतिपरायण होती. हा ब्राह्मण श्रीदत्तोपासक असून तो यथाकालीं विवेकपूर्वक आन्हिक कर्में करी. त्याच्या दारांत अश्वत्थ वृक्ष असून त्यावर एक ब्रह्मराक्षस वसति करून होता. तो ब्राह्मण वैश्वदेव करून बली त्या वृक्षाच्या पारावर ठेवीत असे. राक्षस तो भूतबळी भक्षण करी. नित्य सेवन करून तो राक्षस तुष्ट झाला. एके दिवशीं तो खालीं उतरून विप्रासमोर उभा राहिला आणि म्हणाला, ‘ मी तुझ्यावर प्रसन्न आहे. कांहीं वरदान माग.’ ब्राह्मण त्यांस पाहून घाबरूनच गेला. राक्षसानें त्यास अभय देतांच विष्णुदत्तशर्मानें आपल्या स्त्रीच्या सल्ल्यानें दत्तदर्शनाचें वरदान मागितलें. तें भूत म्हणालें कीं दत्तांचें नांव ऐकतांच माझें मन भितें, तरी पण यत्नें करून तुला दत्तदर्शन करवीन.’

एकदां त्या ब्रह्मराक्षसानें ब्राह्मणास सांगितलें कीं, कलालाचे दुकानांत श्रीदत्त उन्मत्तपणीं मद्यपान करीत आहेत. विप्र धांवत तेथें गेला तें उन्मत्त दुर्गंधांग मक्षिकावत स्वरुप पाहून त्यांच्या मनांत विकल्प आला. असा विकल्प आल्याबरोबर दत्त महाराज गुप्त झाले. पुन्हा एकदां सकाळीं त्या भूतानें त्यांस सांगितलें कीं श्रीदत्त अंगाला धूळ फासून स्मशानांत बसले आहेत आणि बरोबर कुत्र्यांना घेऊन क्रीडन करीत आहेत. विष्णु दत्त शर्मा धांवत गेला आणि त्यानें दत्तांचे चरण धरले. दत्तांनीं त्यास अस्थींनीं ताडन केलें तरी त्यानें त्यांचें पाय सोडले नाहींत. पाय कशासाठीं धरीत आहेस असें विचारतांच त्या विप्रानें आमंत्रण देण्यासाठीं आलो आहे म्हणून सांगितलें. दत्तांनी प्रसन्न होऊन त्यास निज स्वरूप दाखविलें आणि पंक्ति योग्य ब्राह्मण असल्यासच भोजन करीन म्हणून त्यास कळविलें. माध्यान्ह काळीं श्रीदत्तराज आले. त्या राक्षसाच्या सांगण्यावरून त्या विप्रआर्येनें सूर्य आणि अग्नी ह्यांस पंक्ति योग्य ब्राह्मण म्हणून श्रीदत्तां-

बरोबर भोजन करण्यासाठीं भक्ति व प्रार्थनापूर्वक येण्यास विनविलें. ते ब्राह्मण वेषानें आले. तीन्हीं देव तृप्त झाले. विष्णुदत्त शर्मांचे पितर सद्गति पावले. दत्तांनीं ब्राह्मणांस सांगितलें कीं, तो राक्षस त्यांचा भक्त होता. दुर्दैवानें त्याची दुर्गति झाली असून त्यानें हें उच्छिष्ट भक्षण केल्यास त्याला सद्गति मिळेल. नंतर त्यांनीं विष्णुदत्त शर्मांस आशीर्वाद दिला.

माझी भक्ति दुर्लभ जाण । ती तुला मिळाली दैवेंकरून ।
तूं इहपर भोग भोगून । सायुज्य निर्वाण घेशील ।।
असें म्हणून श्रीदत्त । विद्या परोपकारार्थ देत ।
कामगती विमान दे सविता । भाग्यसंपदा दे अग्नी ।।
करितां मीमांसोक्त कर्म । विप्रा मिळालें अलभ्य शर्म ।
शास्त्राचें जाणील वर्म । सर्व धर्मफळ घेतो ।।

**कथा पांचवी :** हरिशर्मा नांवाचा विप्र गोदातटीं राहत असे. त्यास एक मुलगा होता. हा अल्पवयी असतानांच हरिशर्म्यास व त्याच्या पत्नीस मृत्यू आला. पुढें त्याचें लग्न झालें. परंतु त्यांस अनेक व्याधींनीं ग्रासलें होतें. जन्मापासून त्यास गुल्मरोग होता. तो एकोणीस वीस वर्षांचा होईपर्यंत,त्यास क्षयरोग, जलोंदर, अतिसार, भगेंद्र वगैरे रोगांनी पछाडलें. त्याची तरुण पत्नी त्यास विष्णुदत्त शर्मांकडे घेऊन आली. विष्णुदत्तशर्मांनीं कर्मविपाक शास्त्रे करोनि दत्तांचें नांव घेऊन त्याच्या हृदयास स्पर्श करून मंत्र म्हटले व त्याच्या पत्नीकरवीं त्या त्या रोगांवर प्रायश्चित केलें त्यायोगें तो ब्राह्मणपुत्र व्याधी-मुक्त होऊन त्यास आयुरारोग्य प्राप्त झालें.

प्रायश्चित्तें रोगनाश । मग आरोग्य दे रस ।
तसा शास्त्रे होतां अविद्यानाश । प्रबोध ब्रह्मरस देतसे ।।
जरी फळाची लालुची । शास्त्री दाविली साची ।
ती मना वळवावयाची । युक्ती शास्त्राची जाणावी ।।

**कथा सहावी :** सह्याद्रीचे उत्तरेस एका गांवीं एक विप्र राहत असे. त्यांची भार्या सुस्वरूप होती. तो विप्र दुसऱ्या गांवीं राहत असलेल्या आपल्या मित्राच्या आमंत्रणावरून त्याच्याकडे एक महिना राहण्यासाठीं निघाला. त्याच्या पत्नीनें त्याला प्रवासांत खाण्यासाठीं शिदोरी बांधून दिली. नंतर ती नदीवर स्नानास आली. वाटेंत एका अश्वत्थावर एक झोटिंग बसला होता. हा कामार्त असून ब्रह्मचारी दशेंत पंचत्व पावला होता. भूतांना भूतवर्तमान ज्ञान असतें. त्या बाईचा नवरा घरीं नाहीं असें जाणून त्यानें तिच्या पतीचें रूप घेऊन तो तिच्या घरीं आला. ज्याच्याकडे जाणार होतों तोच वाटेंत भेटल्यामुळें त्याच्याच सांगण्यावरून आपण परतलों. असें त्यानें तिला सांगितलें. तिच्या मनांत कांहीं संदेह आला नाहीं. तो तिच्याशी अनु-

दिनी रमत असे. रात्रभर संग केला तरी त्याची तृप्ति होत नसे. त्या बाईला दिवसें दिवस क्षीणता वाटूं लागली व आपले दुःख कोणाकडे व्यक्त करावे हें तिला समजेना. अशारीतीनें एक महिना लोटला. तिचा खरा पती घरीं परतला. आपल्याच सारखा दुसरा एक माणूस आपल्या घरांत पाहून त्याला संशय आला. त्या खऱ्या नवऱ्याचें आणि भूताचें आपणच खरे व दुसरा तोतया म्हणून भांडण जुपलें. सारें गांव जमलें. दोघेही इतके सारखे दिसत होते कीं त्यामुळें खरा कोण हें ते सांगूं शकले नाहींत. त्या विप्राचे सासूसासरे आले; ते त्या सर्वांना विष्णु दत्त शर्मांकडे घेऊन आले. इतर ग्रामस्थही बरोबर होते. विष्णु दत्तानें खरा कोण आणि झोटिंग कोण म्हणून तावडतोब ओळखलें. परंतु एकदमच सांगितलें तर तें लोकांना कदाचित् पटणार नाहीं म्हणून त्यांनीं संशय निरसनासाठीं कांहीं उपाययोजना करून त्यांची परीक्षा घेतली. दोघांनीं आपलें नांव, गांव, रूप, शील वगैरे बरोबर सांगितलें. नंतर विष्णूदत्तानीं लोकांनीं दोघांना बरोबर ओळखण्यासाठीं ब्राह्मणाच्या कपाळावर श्वेत मुद्रा केली आणि भूताच्या भाळीं मंत्रांकित लाल मुद्रा रेखिली. भूत मंत्रित मुद्रा बदलूं शकत नाहीं.

विष्णुदत्तानें त्यांना घरांत भांडी, वस्त्रें, धन किती आहे वस्तीच्या बाह्य आणि गुप्त खुणा कोणत्या हें विचारलें. भूतानें सर्व माहिती बरोबर दिली. विप्राला सर्व कांहीं सांगतां येईना आणि स्त्रीविषयीं बोलतांना तो लाजूं लागला. जमलेल्या लोकांना त्या झोटिंगांचा संशय येण्यास सुरवात झाली. नंतर त्यानें त्यांस पंचक्रोशी क्षेत्रास प्रदक्षिणा करून येण्यास सांगितलें. दोघे बरोबर निघाले पण पिशाच्च घटकेंत परतलें. सर्व खुणा त्यानें सांगितल्या. हे घटकेंत कसें शक्य आहे म्हणून लोकांचा संशय बळावला. नंतर पर्वतावर सिद्ध किती आहेत हें त्या भूतानें बरोबर सांगितलें पण त्या ब्राह्मणास एकही सिद्ध दिसला नाहीं. मग विष्णुपत्तानें एक लोखंडाची झारी मागविली व त्यांना तिच्या मुखानें आंत जाऊन तोटींतून बाहेर यावयास सांगितलें. इथें तें पिशाच फसलें. तें आंत शिरतांच विष्णुदत्तानें मंत्रानें झारीची दोन्हीं तोडें आच्छादिलीं. भूत आंत अडकून पडलें. त्या झोटिंगाला पर्वतावर गाडून टाकलें आणि त्या अबला ब्राह्मणीची सुटका केली. सर्वांना आनंद झाला आणि विष्णुदत्ताचा जयजयकार केला.

शास्त्र कर्में करून । अज्ञानाचें करिती निरसन ।<br>
तेणें संशय जाऊन । आत्मज्ञान जेवी होतें ॥<br>
तंत्रशास्त्रें करून । होतां भ्रमनिरसन ।<br>
सत्य कळतें हें तसेंचि जाण । ब्रह्मज्ञान होतसे ॥

**गाथा सातवी :** प्रतिष्ठानीं एक विप्र होता त्याला एक पुत्र झाला. हा पूर्वीचा योगभ्रष्ट होता. जगाचें भय मानून लोकांची उपाधि टाळण्यासाठीं तो जडमूढ होऊन

विष्टामूत्रीं लोळत वेड्यासारखा वागत असे. त्याच्या मातापित्यानीं अनेक उपचार केले. पण व्यर्थ. त्याचें वेड गेलें नाहीं. अखेर तो ब्राह्मण त्या मुलाला घेऊन विष्णुदत्तांकडे आला. विष्णुदत्तांनीं तो वेडा नसून ब्रह्मनिष्ठ आहे हें ताबडतोब जाणलें. त्या मुलास आपल्याकडे ठेवून विष्णुदत्तानें त्या विप्रास परत जाण्यास सांगितलें. त्यांनीं त्याच्या माथ्यावर आपला हात ठेवून त्याला ही भीती कशासाठीं घेतली आहेस म्हणून विचारलें. जो कधीं हंसला नाहीं त्या मुलानें हंसतच आपणांस बरोबर जाणल्याचें विष्णुदत्तांना सांगितलें. विष्णुदत्तांनीं नंतर त्याला उपदेश केला. हळूंहळूं त्याची भीति कमी होत गेली. विष्णुदत्तांच्या येथील पवित्र अन्न मिळतांच त्याचा भ्रम निघून गेला आणि तो पूर्ण सुधारला. हें पाहून त्या ब्राह्मणांस अतिशय आनंद झाला आणि विष्णुदत्तांची आज्ञा घेऊन तो आपल्या मुलासह घरीं गेला.

शास्त्राचें एक तात्पर्य । अज्ञानाचें पदोपदीं भय ।
संसार असतां ब्रह्ममय । वाटे मायामय तयासी ॥
स्वरूपांत भुलोनी । कर्तृत्व भोक्तृत्व वाहूनी ।
व्यर्थ जाते शिणूनी । हें अज्ञानी मूढपणें ॥

असा हा शास्त्र महिमा आहे. शास्त्रें आपल्या उद्धारासाठीं पोषकच ठरतात. त्यांतलें सार मात्र आपण जाणलें पाहिजे.

शास्त्रें लहान थोर । सर्व असती बोधपर ।
असें गुरूचें उत्तर । ऐकोनी इंद्र नमन करी ॥

श्री दत्तांनीं आपल्या शिष्याला असाच उपदेश केला आहे.

श्रीदत्त म्हणे अर्जुना । ठेवी शास्त्रसारांशीं मन ।
शास्त्रापासुनी परोक्षज्ञाना । घेऊनि विज्ञाना पावसी ॥
जीं कर्मांचीं फळें बोलती । आणि सदा सिद्ध असती ॥
तिकडे न द्यावी चित्तवृत्ती । नश्वर होती अंतीं ज्या ॥
सर्व शास्त्रें पाहून । स्वार्थ घ्यावा शोधून ।
हंस जेवीं पाणी टाकून । दुग्ध पिवून जाई तेवीं.

—श्रीदत्त महात्म्यावरून



उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें ‘लायसॉफ तेल’ वापरा.

रामायणाचें अलौकित्व—

# तीन हृदयस्पर्शी प्रसंग

**************************

लेखक : **एक रामभक्त**

**रामकथा परमपावन आहे. तिच्या पठनानें, मननानें, चिंतनानें मन उन्नत होतें. सर्व कोषांचा भेद करून पुरुषार्थ प्रगट होतो. वृत्ति स्थिरावते. सर्व प्रकारच्या संकटांशीं झुंजण्याचें सामर्थ्य अंगीं निर्माण होतें, अशी ती फलदायी आहे.**

**पुण्यपावन रामकथा**

कारण मर्यादापुरुषोत्तम रामचंद, त्रिभुवनपावनी जानकी आणि उत्तम भ्राता लक्ष्मण या त्रयीनें कोणावरही येऊं नयेत, असलीं दुखें झेललीं होतीं. त्यांचा अंतही अतिशय शोकपर्यवसायी आहे. रामायणांत सुरवातीपासूनच आपणांस अनेक दुःखदायक घटना पाहावयास मिळतात. तरीपण या तिन्हीं विभूतींनीं आपल्या मनावर कायमचा ठसा उमटविला आहे. उत्तम पुत्र, उत्तम पति, एकपत्नि, एकवचनी आणि एकबाणी असा उत्तम पुरुष आपणांस श्रीरामप्रभूंत पहावयास सांपडतो. सीतामाईनें पत्नी आणि सती भावाचा आदर्श लोकांपुढें ठेवला. त्यागमूर्ति लक्ष्मणानें सेवाव्रत किती कठीण आहे हें जगाला पटवून दिलें.

अनेक काव्यें निर्माण झालीं, पुढेंही होतील; पण श्रीरामायणाचें अलौकिकत्व अभंग, अक्षय राहील.

× × ×

**( १ ) सीतेचें दिव्य :**

ऋषि वाल्मीकि जिथें उतरले होते, त्यास्थळीं श्रीरामांनीं पाठविलेला एक दूत ऋषींच्या समोर उभा राहिला. आदरानें नमस्कार करून तो म्हणाला.

'भगवन, राजा रामचंद्रांची विनंति अशी आहे कीं, आपल्याबरोबर असलेल्या मातुश्री जानकींनीं यज्ञसभेंत येऊन पुन्हां एकदां आपल्या निरपराधित्वाची साक्ष द्यावी. कारण, रामचंद्रांना त्यांचा विरह आतां असह्य झाला आहे !'

वाल्मीकि गंभीरपणें म्हणाले, 'तसेंच होईल दूता !'

यज्ञसभेंत अपार दाटी झाली होती. ऋषि, तापस, राजसेवक, वानर, राक्षस, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न हे सर्व जानकीच्या दर्शनासाठीं अत्यंत आतूर झाले होते. अगस्त्य, भरद्वाज, मार्कंडेय, च्यवन, भृगु, विश्वामित्र आदि ऋषि वसिष्ठांसह यज्ञसभेंत उपस्थित होते.

कांहीं वेळानें ऋषि वाल्मीकींनीं गंभीरपणें यज्ञसभेंत प्रवेश केला. त्यांच्यामागें होती कारुण्याची प्रतिमा जानकी ! जणूं एखादी सोनसळीच व्यथारूप नागिणींनीं दंश

केल्यामुळें ती अतिशय कृश झाली होती. तिनें आपलें सर्वांग भगव्या वस्त्रानें झांकून घेतलें होतें.

श्रीराम चंद्रांच्या शेजारीं बसून तिनें सर्व प्रकारच्या वैभवाचा उपभोग घ्यावा, त्या जानकीला अशा वेषांत पाहून सर्व यज्ञसभेनें दुःखाचे निश्वास टाकले. वानर आणि राक्षस गर्जू लागले. 'मातुश्री जानकी धन्य, धन्य तुझें साहस !'

सभा शांत झाल्यावर महर्षि वाल्मीकी गंभीर स्वरांत म्हणाले,

'श्रीरामचंद्रा, मी प्रचेतसाचा आठवा पुत्र जन्मांत कधींही असत्य भाषण केल्याचें मला स्मरत नाहीं. मी जर आतां असत्य बोलेन, तर माझी सहस्त्र वर्षांची तपश्चर्या निष्फळ होवो ! मी प्रतिज्ञेवर सांगतों कीं, तूं जनापवादाच्या भयानें जिचा त्याग केलास ती ही प्राजक्ताच्या पुष्पाप्रमाणें सुकुमार सीता सर्वथा निर्दोष आहे !'

सर्व सभेंत गंभीर शांतता पसरली. सभासदांच्या नेत्रांतून भूमीवर आंसवें गळूं लागलीं, त्यांचाच काय तो टपटप ध्वनि होत राहिला.

वारंवार कंठ साफ करीत श्रीरामचंद्र कसेबसे बोलले,

'भगवन्, आपण केलेल्या प्रतिज्ञेवर माझा निरतिशय विश्वास आहे. तो आजच आहे असें नव्हे तर जनकांच्या घरून माझ्या लहानग्या जानकीला माळ घालून मी अयोध्येंत घेऊन आलों, त्या क्षणापासून मला हें माहीत आहे ! मी आज या सभेसमक्ष माझ्या मनींचें गुह्य प्रकट करतों ! जानकीइतकें प्रियत्तम मला दुसरें कोणीही नाहीं !'

'पण जनापवाद ! त्याच्यापुढें मला हात टेकावे लागले!'

'भगवन्, जनापवादासाठीं पुन्हां एकदां जानकीनें दिव्य करावें !'

जानकीनें श्रीरामांचे हे शब्द ऐकले, त्याक्षणीं तिला वाटलें कीं, आपल्या त्या प्रियतमाच्या चरणीं धांवत धांवत जाऊन मिठी घालावी! पण ती कशीबशी अंग सांवरून उभी राहिली इतकेंच.

नंतर सर्वांस ऐकूं जाईल अशा स्वरांत सौम्यपणे ती म्हणाली,

"माते धरित्री ! प्रभु श्रीरामचंद्राशिवाय इतर कोणालाही जर मी मनांत स्थान दिलें नसेल तर तूं दुभंग होऊन मला आपल्या उदरीं ठाव द्यावास !

आणि पहातां पहातां धरित्री दुभंग झाली. जानकीनें त्या आपल्या मातेच्या कुशींत शेवटचा आश्रय घेतला. पुन्हां धरित्री होती तशी झाली. अभंग, अक्षय !

सीता नाहींशी झाली हें पाहतांत यज्ञसभा शोकभारानें गजबजून गेली. श्रीराप्रभु तर शुद्ध हारपून धरणीवरच कोसळले. पण थोड्या वेळानें उठून ते उग्र स्वरांत बोलूं लागले.

"अरे, माझी प्रियतमा तर मी राक्षसराज रावणाच्या बंदिवासांतून मुक्त करून आणली होती. तिला माझ्यापासून हिरावून घेण्याचें सामर्थ्य कोणांतच नाहीं !"

नंतर सीता हारपली त्या स्थानाकडे पाहून ते म्हणाले,

'माते धरित्री, बऱ्या बोलानें माझी प्रियतमा मला परत दे. ती माझीच आहे. तिनें माझा गर्भ उदरीं वाहिला आहे. तिच्या वांचून मी जगूं शकत नाहीं ! एक तर

तिला परत दे, किंवा मला तरी तुझ्या उदरांत स्थान दे ! हें न केलेंस तर मी माझ्या बाणांनीं तुझा उच्छेद करून टाकीन !'

क्रुद्ध झालेल्या शोकमग्न रामांना शांत करतां करतां ऋषिमुनींना अनेकविध यत्न करावे लागले.

× × ×

**( २ ) लक्ष्मणाचा देहत्याग :**

यथाकाल राजमाता कौसल्या, सुमित्रा आणि कैकेयी स्वर्गवासी झाल्या. श्रीरामचंद्रांनीं मोठ्या समारंभानें त्यांची उत्तराक्रिया केली.

एके दिवशीं उग्रमुद्रेचा एक तपस्वी श्रीरामांच्या भेटीस आला. श्रीरामांनीं त्यांस आसनावर बसवून त्याचा सत्कार केला. त्यानें श्रीरामास सांगितलें.

'तुम्हां आम्हांमधील संवाद दुसऱ्या कोणीही ऐकूं नये. जर ऐकला तर त्याला देहान्ताचें शासन व्हावें !'

श्रीरामांनीं या त्याच्या म्हणण्यास अनुमति दिली. त्यांनी लक्ष्मणास द्वारावर ठेवलें आणि कोणालाही आंत येऊं देऊं नकोस अशी सूचना देऊन ते त्या तपस्व्याशीं बोलत बसले.

तो तपस्वी म्हणाला, "श्रीरामा, भरतखंडांतील राक्षसांचा नाश झाला आहे. आपलें अवतारकार्य एवढेंच होतें. तेव्हां आतां स्वस्थळीं परतावें हें इष्ट नव्हे काय ?"

तोंच बाहेर दुर्वास ऋषि येऊन लक्ष्मणास म्हणूं लागले,

"या क्षणीं मला श्रीरामाची भेट हवी आहे !"

लक्ष्मण कांकूं करीत आहे, असें पाहून ऋषि दुर्वासांनीं क्रोधभरानें लक्ष्मणास म्हटलें, "जर तूं मला आंत जाऊं न देशील तर मी श्रीरामांसह सर्वांस शाप देऊन भस्म करीन !"

सर्व राज्याचा नाश होण्यापेक्षां आपल्या एकट्याचा नाश झालेला बरा, अशा विचारानें लक्ष्मणानें आंत जाऊन श्रीरामांना दुर्वासांची इच्छा सांगितली. तत्क्षणीं श्रीरामांशीं संवाद करीत असलेला ऊग्र तपस्वी उठून चालता झाला. श्रीरामांचें मुख कोमेजलें. त्यांनीं दुर्वासांचा सत्कार करून त्यांना शांत केलें आणि निरोप दिला.

पण तापसाशीं केलेल्या संकेताचें स्मरण होतांच श्रीरामांच्या मनांत अपार शोक दाटला. त्याक्षणीं धीरोदत्त लक्ष्मण त्यांच्यासमोर उभा ठाकला. तो धीरगंभीरवाणीनें म्हणाला,

"प्रभो, शोकाचें काय कारण ? आपली प्रतिज्ञा सत्य करण्यासाठीं आपण प्रत्यक्ष जनक नंदिनीचाही त्याग केला. तिथें माझा कोण पाड ! आपल्या हातून लाभलेलें मरण हा जीवनाचा सर्वोत्कट शेवट आहे !"

प्रत्यक्ष भ्रात्याच्या वधाच्या कल्पनेनें श्रीराम अगदीं गडबडून गेले... पण ऋषि वसिष्ठांनीं त्यांना सांगितलें,

"श्रीरामा, लक्ष्मणासारख्या भ्रात्याचा त्याग करणें, हें त्याला मृत्युदंड देण्यासारखें आहे !"

वसिष्ठांचें हें भाषण ऐकतांच श्रीरामांनीं त्यागलेला लक्ष्मण त्यांना शेवटचा नमस्कार करून शरयूतीरावर गेला. तेथें दर्भासनावर बसून आणि कुंभक करून त्यानें प्राणत्याग केला !

एक उत्कट सेवामय जीवन अशा रीतीनें समाप्त झालें !!!

× × × ×

## ( ३ ) प्रभूंचें महानिर्वाण

वानर, राक्षस आणि भरतादि बंधुजन यांच्यामध्यें गंभीर श्रीरामचंद्र उभे होते. बिभीषण आणि हनुमंत खिन्न मुद्रेनें श्रीरामांच्या आज्ञेची वाट पहात होते.

कृपाळू मुद्रेनें श्रीराम प्रभु त्या दोघांना म्हणाले,

'बिभीषणा, चंद्रसूर्य आहेत तोंवर तूं लंकेचें राज्य करावेंस ! हनुमंता, तुला काय सांगूं? जोपर्यंत पृथ्वी तलावर रामकथा प्रचलित राहील, तोपर्यंत तुला मृत्यु येणार नाहीं !

शेवटीं श्रीरामचंद्र महानिर्वाणासाठीं शरयूतीराकडे निघाले !

अग्रभागीं वसिष्ठ अग्निहोत्र घेऊन चालले होते. त्यांच्यामागें मौनमुद्रेनें गंभीर श्रीराम चालत होते. संपूर्ण जीवनाचा चित्रपट त्यांच्या नेत्रांसमोरून सरकत होता. पित्याचा स्नेह, माता कौसल्येचें अपूर्व वात्सल्य, वनवास, लक्ष्मणाचें छायेसारखें बरोबर असणें, युद्ध, राज्याभिषेक आणि सर्वांत अधिक पीडा देणारी स्मृति जननंदिनीची !

महानिर्वाणाच्या गंभीर प्रसंगीं जनकनंदिनी सांगाती नव्हती !

केवढें दुःख !

पण तें सर्व दुःख गिळून टाकून श्रीराम महानिर्वाणासाठीं निघाले होते. कुणाविषयीं द्वेष राहिला नव्हता. कुणाविषयीं अनुकंपा नव्हती. कुणाविषयीं क्रोध नव्हता. निर्वैर स्थिति झाली होती. श्रीराम आतां सुखदुःखांच्या पलीकडे पोंचले होते. हर्षशोक मावळले होते.

मात्र एकच स्मृति - विद्युल्लतेसारखी — त्यांना अस्वस्थ करीत होती, ती म्हंणजे जनकनंदिनीची !

चालतां चालतां श्रीरामांना उगचिच वाटत होतें कीं, आपणांबरोबर कोमलतनु वैदेही चालली आहे !

त्यांच्या मागें वानर, राक्षस, पौरजन, असा असंख्य समुदाय येत होता. सर्वच मौन स्वीकारून चालले होते. केवळ ऋषि वसिष्ठांच्या मुखांतून वेदमंत्रांचा घोष ऐकूं येत होता.

अयोध्येपासून दीड-योजनांवर शरयू पश्चिम वाहिनी झाली होती. तेथें सर्व समूह पोंचला. श्रीरामचंद्र क्षणभर ध्यानस्थ उभे राहिले. मग एकदां मागें वळून त्यांनीं आपणांमागें जानकी नाहीं हें पाहून घेतलें आणि नंतर अगदीं सहजच त्यांनीं शरयू नदींत प्रवेश केला !

श्रीरामांच्या पाठोपाठ सर्व समूहानें पाहतां पाहतां आपलीं शरीरें शरयू नदीच्या प्रवाहांत सोडिलीं !

एक भव्योदात्त जीवन शरयू नदीच्या जलप्रवाहांत एकरूप होऊन गेलें !!!

# परमेश्वर सर्वव्यापी आहे

—विनोबा भावे

## मानवांतील परमेश्वर

अगदीं पहिल्या प्रथम परमेश्वराची मूर्ति म्हणजे आई आपणांजवळ आहे. श्रुति म्हणते, "**मातृदेवो भव.**" जन्मतांच मुलाला आईशिवाय दुसरें कोण दिसतें ? वत्सलतेच्या रूपानें ती परमेश्वराचीच मूर्ति तेथें उभी असते. ह्या मातेचीच व्याप्ति आपण वाढवूं व "**वंदे मातरम्**" म्हणून राष्ट्रमातेची व पुढें सर्व भूमातेची, पृथ्वीची पूजा करूं. परंतु आरंभीं उंचांत उंच अशी परमेश्वराची पहिली प्रतिमा जी मुलासमोर उभी राहिली ती मातेची. आईच्या पूजेनें मोक्ष मिळणें अशक्य नाहीं. आईची पूजा म्हणजे वत्सलतेनें उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. आई निमित्तमात्र आहे. परमेश्वर तिच्या ठिकाणीं आपली वत्सलता ठेवून तिला नाचवितो. तिला बिचारीला कळतहि नाहीं की कां एवढी माया आंतून वाटते. म्हातारपणीं आपल्या उपयोगी पडेल असा हिशेब करून का ती त्या मुलाची सेवा करीत असते ? छे छे, तिनें त्या मुलाला जन्म दिला. तिला वेदना झाल्या. त्या वेदना तिला त्या मुलाचें वेड लावतात. त्या वेदना तिला वत्सल करतात. तिला प्रेम केल्याशिवाय राहवतच नाहीं. ती लाचार आहे. ती माउली म्हणजे निस्सीम सेवेची मूर्ति. उत्कृष्टांतील उत्कृष्ट परमेश्वराची पूजा म्हणजे ही मातृपूजा आहे. ईश्वराला आई या नांवानेंच हांक मारावयाची. आई या शब्दाहून आणखी उच्च शब्द आहे कोठें ? आई हें पहिलें ठळक अक्षर. तेथें ईश्वर पहावयास शीक. मग पिता, गुरु, यांच्याहि ठिकाणीं पहा. गुरु शिक्षण देतो, पशूचा आपणांस मनुष्य करतो. किती त्याचे उपकार ! प्रथम माता, मग पिता, मग गुरु, मग कृपाळू संत. अत्यंत ठळक रूपानें उभा असलेला हा परमेश्वर आधीं पाहावयाचा. येथें परमेश्वर नाहीं दिसला तर मग दिसावयाचा तरी कोठें ?

## आई, बाप, गुरु व संत

आई, बाप, गुरु व संत यांच्या ठिकाणीं परमात्मा पहा. तसेंच लहान मुलांच्या ठिकाणीं जर परमात्मा पाहतां आला तर केवढी बहार होईल ! ध्रुव, प्रल्हाद, नचिकेत, सनक, सनंदन, सनत्कुमार, सारीं लहान लहान मुलें. परंतु त्यांना कोठें ठेवूं कोठें न ठेवूं असें पुराणकारांना, व्यासादिकांना झालें आहे. शुकदेव, शंकराचार्य, बालपणींच विरक्त, ज्ञानदेवहि तसेच. सारीं हीं पोरें. परंतु त्यांच्या ठिकाणीं परमेश्वर जितक्या शुद्ध रूपानें अवतीर्ण झाला तितक्या शुद्ध रूपानें अन्यत्र प्रकट झाला नाहीं. ख्रिस्ताला मुलांचा फार लळा असे. एकदां त्याच्या शिष्यांनीं त्याला विचारलें, "तुम्ही नेहमीं

देवाच्या राज्याविषयीं बोलत असतां, या देवाच्या राज्यांत प्रवेश तरी कोणाला मिळेल?" जवळ एक मुलगा होता. खिस्तानें त्याला टेबलावर उभें करून म्हटलें, "या मुलासारखे जे असतील त्याचा प्रवेश तेथें होईल." खिस्तानें म्हटलें तें सत्य आहे. रामदासस्वामी एकदां मुलांबरोबर खेळत होते, मुलांबरोबर खेळत आहेत हें पाहून कांहीं पोक्त मंडळींस आश्चर्य वाटलें. एकानें त्यांना विचारलें, "हें काय आज आपण करीत आहांत?" समर्थ म्हणाले,

**"वयें पोर ते थोर होऊन गेले**
**वयें थोर ते चोर होऊन ठेले."**

वय वाढतें व शिंगें फुटतात. मग ईश्वराचें स्मरणहि होत नाहीं. लहान मुलांच्या मनावर लेप नसतात. त्यांची बुद्धि निर्मळ असते. मुलाला शिकवितात, "खोटें बोलूं नये." तो विचारतो, 'खोटें बोलणें म्हणजे काय?' मग त्याला सिद्धान्त सांगतात, 'जसें असेल तसें सांगावें.' त्या मुलाला पंचाईत पडते. जसें असेल तसें सांगावयाचें या प्रकाराहून कांहीं निराळा प्रकार आहे कीं काय? जसें नसेल तसें कसें सांगावयाचें! चौकोनाला चौकोन म्हण, गोल म्हणूं नको; असेंच सांगण्यासारखें हें आहे. त्या मुलाला आश्चर्य वाटतें. मुलें म्हणजे विशुद्ध परमेश्वराच्या मूर्ति आहेत. मोठीं माणसें खोटें शिक्षण त्यांना देतात. सारांश, आई, बाप, गुरु, संत व मुलें यांच्या ठिकाणीं आम्हांला जर परमेश्वर पाहतां आला नाहीं तर मग कोणत्या रूपाच्या ठिकाणीं दिसणार? परमेश्वराचीं याहून उत्कृष्ट रूपें अन्य नाहींत. हीं परमेश्वराचीं साधीं सौम्य रूपें आधीं शिकावयाचीं. या ठिकाणीं परमेश्वर ठळक अक्षरांनीं लिहिलेला आहे.

## सृष्टींतील परमेश्वर

मानवांतील सौम्यतम आणि पावन मूर्तींत ईश्वराला आधीं पहावयास शिकावयाचें त्याप्रमाणेंच या सृष्टींतहि जीं विशाल आणि मनोहर रूपें आहेत तेथेंहि त्याला आधीं पहावयास शिकावयाचें.

ती उषा! सूर्योदयाच्या पूर्वीची ती दिव्य प्रभा! त्या उषादेवतेचीं गाणीं गातांना ऋषि नाचूं लागत. "हे उषे, तूं परमेश्वराचा संदेश घेऊन येणारी दिव्य दूतिका आहेस. तूं दंवबिंदूंनीं न्हाली आहेस. तूं अमृतत्वाची पताका आहेस." अशीं भव्य हृदयंगम वर्णनें ऋषींनीं केलीं आहेत. तो वैदिक ऋषि म्हणतो, "परमेश्वराचा संदेश घेऊन येणारी जी तूं, त्या तुला पाहून जर परमेश्वराचें रूप मला न पटेल, न समजेल, तर परमेश्वर मला कोण समजावूं शकेल?' इतक्या सुंदर रूपानें ती उषा नटून तेथें उभी आहे, परंतु आमची दृष्टि जाते कोठें तेथें?

तसेंच तो सूर्य पहा. त्याचें दर्शन म्हणजे परमात्म्याचें दर्शन. तो नाना प्रकारचीं चित्रें आकाशांत रंगवीत असतो. चित्रकार महिनेच्या महिने कुंचले मारून सूर्योदयाचीं चित्रें रंगवितात. सकाळीं उठून जरा पहा ती परमेश्वराची कला. त्या दिव्य कलेला,

त्या अनंत सौंदर्याला, उपमा तरी देतां येईल का ? पण पाहतो कोण ? तिकडे तो सुंदर भगवान् उभा आहे आणि हा आणखी पांघरूण अंगावर घेऊन झोंपतो ! तो सूर्य म्हणतो, 'आळशा, तूं निजूं पाहशील, परंतु मी तुला उठविणार आहे.' असें म्हणून आपले उबदार किरण गजांतून शिरकवून तो त्या आळशाला उठवतो.

**'सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च'**

स्थावरजंगमाचा सूर्य हा आत्मा आहे. चराचराचा तो आधार आहे. ऋषींनीं त्याला 'मित्र' असें नांव दिलें आहे.

**"मित्रो जनान् यातयति ब्रुवाणो**
**मित्रो दाधार पृथिवीमुत द्याम्"**

"हा मित्र लोकांना हांक मारतो, त्यांना काम करावयास लावतो. त्यानें स्वर्ग-पृथ्वीचें धारण केलें आहे." खरोखरच तो सूर्य जीवनाचा आधार आहे. त्याच्या ठिकाणीं परमात्मा पहा.

आणि ती पावन गंगा ! मीं काशींत असतांना गंगेच्या कांठावर जाऊन बसावयाचा. रात्रीच्या एकान्त वेळीं मी जात असें. किती सुंदर व प्रसन्न तो प्रवाह. तिचा तो भव्य गंभीर प्रवाह व तिच्या पोटांत सांठवलेले ते आकाशांतील अनंत तारे. मी मुका होऊन जात असें. शंकराच्या जटजूटातून, म्हणजेच त्या हिमालयांतून, वाहत येणारी ती गंगा, जिच्या तीरावर राज्यें तृणवत् समजून फेंकून देऊन राजे तपश्चर्येसाठीं येऊन बसत, अशी ती गंगा पाहून मला शांत शांत वाटे. त्या शांतीचें मी कसें वर्णन करूं ? बोलण्याची तेथें सीमा होईल. मेल्यावर आपल्या अस्थि तरी गंगेंत पडाव्या असें हिंदु मनुष्यास कां वाटतें तें समजून येई. तुम्ही हंसा. तुम्ही हंसलांत म्हणून कांहीं बिघडत नाहीं; परंतु मला या भावना फार पावन व संग्रह करण्यासारख्या वाटतात. मरतांना दोन थेंब गंगेचें तोंडांत घालतात. ते दोन थेंब म्हणजे परमेश्वरच मुखांत अवतीर्ण होतो. ती गंगा म्हणजे परमात्मा. परमेश्वराची ती करुणा वाहून राहिली आहे. तुमची सारी अंतर्बाह्य घाण ही माउली धुवून राहिली आहे. गंगेच्या ठिकाणीं परमेश्वर प्रकट झालेला न दिसेल तर तो कोठें दिसणार ? सूर्य, नद्या, तो घो घो करणारा. उचंबळणारा विशाल सागर, या साऱ्या परमेश्वराच्याच मूर्ति.

**वारे म्हणजे भगवंताचे दूत**

आणि ते वारे ! कोठून येतात, कोठें जातात, कांहीं कळत नाहीं. वारे हे भगवंताचे दूत आहेत. हिंदुस्थानांतील कांहीं वारे स्थिर हिमालयावरून येतात तर कांहीं गंभीर सागराकडून येतात. हे पवित्र वारे आपल्या छातीस स्पर्श करतात. ते आपणांस जागृत करतात. आपल्या कानांत गुणगुणतात. परंतु या वाऱ्यांचा संदेश कोण ऐकतो ? जेलरनें आपलें चार ओळींचें आलेलें पत्र न दिलें तर आपण खट्टू होतों. अरे कपाळकरंट्या, काय आहे त्या चिटोऱ्यांत ? हे परमेश्वराचे प्रेमळ संदेश घटकोघटकीं वाऱ्याबरोबर येत आहेत, ते ऐक.

आणि आपलीं कामकाज करणारीं गुरें! ती गाय. किती वत्सल, मायाळू व प्रेमळ! वासरांसाठीं दोनदोन तीनतीन मैलांवरून रानावनांतून धांवत येते. वेदांतील ऋषींना डोंगरांतून पर्वतांतून स्वच्छ पाण्याच्या धो धो धांवत येणाऱ्या नद्या पाहून वत्सासाठीं भरलेल्या स्तनांनीं हंबरत येणाऱ्या वत्सल गाईची आठवण होते. तो ऋषि नदीला म्हणतो, "हे देवी, दुधासारखें पवित्र पावन मधुर असें पाणी आणणारी तूं धेनूप्रमाणें आहेस. गाईला वनांत राहवत नाहीं, तशा तुम्ही हि डोंगरांत राहूं शकत नाहीं. तुम्ही उड्या मारीत तहानेल्या बाळांस भेटावयास येतां."

**"वाश्रा इव धेनवः स्यंदमानाः"**

वत्सल गाईच्या रूपानें भगवान् दारांत उभा आहे.

आणि तो घोडा! किती उमदा, किती प्रामाणिक, किती स्वामिनिष्ठ! अरब लोकांचें घोड्यावर किती प्रेम! ती त्या अरबाची गोष्ट तुम्हांला आहे ना माहीत? तो अडचणींत सांपडलेला अरब सौदागरास घोडा विकण्यास तयार होतो. हातांत मोहरांची थैली घेऊन तो तबेल्यांत जातो. परंतु घोड्याच्या त्या गंभीर प्रेमळ डोळ्यांकडे त्याची नजर जाते; मग ती थैली तो फेंकतो व म्हणतो, "जीव गेला तरी हा घोडा मीं विकणार नाहीं. माझें काय व्हायचें तें होईल. नाहीं जेवायला मिळालें तर नाहीं. परमात्मा पाहून घेईल'. पाठीवर थाप मारतांच कसा प्रेमानें फुरफुरतो. कशी त्याची ती आयाळ! खरोखरच घोड्यांत अमोल गुण आहेत. त्या सायकलींत काय आहे? घोड्याचा खरारा करा, तो तुमच्यासाठीं मरेल. तो तुमचा मित्र होईल. माझा एक मित्र घोड्यावर बसावयास शिकत होता. घोडा त्याला पाडी. तो मजकडे येऊन म्हणाला, 'घोडा पाठीवरच बसूं देत नाहीं.' मी त्याला म्हटलें, 'तुम्हीं घोड्यावर फक्त बसावयास जातां, परंतु त्याची सेवा करतां का? सेवा दुसऱ्यांनीं करायची आणि तुम्ही पाठीवर बसायचें. हें कसें जमेल? तुम्हीं स्वतः त्याला दाणापाणी द्या, त्याचा खरारा करा आणि मग बसा.' तो मित्र तसें करूं लागला. कांहीं दिवसांनीं तो मजकडे येऊन म्हणाला, 'आतां घोडा पाडीत नाहीं.' घोडा हा परमेश्वर आहे. तो भक्ताला कां पाडील? त्याची भक्ति पाहून घोडा नमला. हा भक्त आहे का तिऱ्हाईत आहे हें घोडा बघतो. भगवान् श्रीकृष्ण स्वतः खरारा करावयाचे व पीतांबरांतून चंदी चारावयाचे. टेकडी आली, नाला आला, चिखल आला कीं सायकल अडली. परंतु उड्या मारीत जातो घोडा. सुंदर प्रेमळ घोडा म्हणजे परमेश्वराचीच मूर्ति.

## सिंहाची गर्जना

आणि तो सिंह! मी बडोद्यास होतों. तेथें पहांटे त्याच्या गर्जनेचा तो गंभीर ध्वनि कानीं यावयाचा. तो आवाज इतका गंभीर व उत्कृष्ट असे कीं हृदय हलत असे. देवळाच्या गाभाऱ्यांत जसा आवाज घुमतो तसा तो हृदय-गाभाऱ्यांतील खोल आवाज असे. आणि सिंहाची ती धीरोदात्त व दिलदार मुद्रा! त्याची ती बादशाही ऐट, बादशाही वैभव! ती भव्य सुंदर आयाळ! जणूं चवऱ्याच त्या नवराजावर ढाळल्या

जात आहेत ! बडोद्यास बगीच्यांत सिंह होता. तेथें तो मोकळा नसे. फेऱ्या घालीत असे पिंजऱ्यांत. त्याच्या डोळ्यांत क्रौर्याचा लेशहि नसे. त्या मुद्रेंत व दृष्टींत कारुण्य भरलेलें दिसे. त्याला जगाची पर्वा जणूं नसे. आपल्याच ध्यानांत तो दंग दिसे. सिंह म्हणजे परमेश्वराची पावन विभूति आहे असें खरोखर वाटतें. आंद्रोक्लीस व सिंह ही गोष्ट मीं लहानपणीं वाचली. किती सुंदर आहे ती गोष्ट ? तो भुकलेला सिंह आंद्रोक्लिसाचे पूर्वीचे उपकार स्मरून त्याचा दोस्त बनतो व त्याचे पाय चाटूं लागतो. हें काय आहे ? आंदोक्लिसानें सिंहांतलि परमेश्वर पाहिला होता. शंकराच्या जवळ सिंह सदैव असतो. सिंह ही भगवंताची दिव्य विभूति आहे.

**दुर्जनांतहि परमेश्वराचें दर्शन**

सारांश, अशा प्रकारें या सृष्टींत नाना रूपांनीं, पवित्र नद्यांच्या रूपानें, विशाल पर्वतांच्या रूपानें, गंभीर सागराच्या रूपानें, वत्सल गाईच्या रूपानें, उमद्या घोड्याच्या रूपानें, दिलदार सिंहाच्या रूपानें, मधुर कोकिळेच्या रूपानें, सुंदर मोराच्या रूपानें, स्वच्छ व एकान्तप्रिय सर्पाच्या रूपानें, पंख फडफडवणाऱ्या कावळ्याच्या रूपानें, धडपडणाऱ्या ज्वाळांच्या रूपानें, प्रशान्त तारकांच्या रूपानें, सर्वत्र परमात्मा भरून राहिला आहे. डोळ्यांना तें पाहण्याची संवय लावावयाची. प्रथम ठळक व सरळ अक्षरें, मग बारीक व जोडाक्षरें शिकलीं पाहिजेत. जोडाक्षरें शिकेपर्यंत वाचनांत प्रगति होणार नाहीं. जोडाक्षरें पदोपदीं येतील. दुर्जनांच्या ठिकाणचा परमेश्वरहि पाहावयास शिकलें पाहिजे. राम पटतो; परंतु रावणहि पटला पाहिजे. प्रल्हाद पटतो, हिरण्यकश्यपुहि पटला पाहिजे. वेदांत म्हटलें आहे—

**" नमोनमः स्तेनानां पतये नमोनमः**
**नमः पुंजिष्ठेभ्यो नमो निषादेभ्यः "**
**" ब्रह्म दाशा ब्रह्म दासा**
**ब्रह्मैवेमे कितवाः**

" त्या दरवडेखोरांच्या नायकाला नमस्कार; त्या क्रूरांना, त्या हिंसकांना नमस्कार, हे ठक, हे दुष्ट, हे चोर, सारे ब्रह्मच आहेत. सर्वांना नमस्कार. " ★ ★ ★

**जैसें डोळयां अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ॥**
**मग वास पाहिजे तेथें प्रगट । महानिधी ॥** ज्ञानेश्वर.

हीं कदाचित् कविकल्पना असेल—पण डोळे काळजीपूर्वक तपासून अचुक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालांत तर दृष्टि स्वच्छ रहाते हें सत्य आहे.

याकरितां **निर्दोष चष्मे** बनविणार

# शेंडे आणि कंपनी

**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४.** यांचा सल्ला घेऊन निर्धास्त रहा.

बाहेरगांवीं फ्रेम्स, लेन्सिस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें चष्मे बनवून ऑर्डरप्रमाणें पाठवूं.

# आमचे आचार व विचार

**आचार व विचार पवित्र व शुद्ध असावे. हे दोन्ही शब्द परस्परावलंबी आहेत. मानवी जीवनांत शुद्ध आचारांचें त्याचप्रमाणें शुद्ध विचारांचें महत्त्व फार मोठें आहे.**

आचारी म्हणजे सद्गुणांचें, चांगल्या गोष्टींचें आचरण करणारा आणि विचारी म्हणजे विचार करणारा. या दोघांमध्यें श्रेष्ठ कोण ? त्यांमध्यें उच्च नीचपणा लावतां येणार नाहीं. दोघांचेंही महत्त्व सारखेंच आहे. दोघेही एकमेकांस पोषक आहेत. त्यांच्यांत विरोध मुळींच नाहीं. आचार हे शुद्धतेला पोषक आहेत. जीवन पवित्र राखण्याचें आचार हें साधन आहे. शुद्ध विचारामुळें आपल्या अंतःकरणांतील दोषांचें परिमार्जन होतें.

## जन्मतः आपण निर्दोष असतों

आचार आम्हांला चांगल्या गोष्टी शिकवितात. आम्हीं दोष नाहींसे करून टाकावे यासाठीं सदाचरण करावयाचें असतें. मनुष्यांत दोष हे स्वभावतः नसतात. आपण जन्माला येतों तेव्हां दोष बरोबर घेऊन येत नाहीं. खोटें बोलणें, दुसऱ्याचा मत्सर करणें वगैरे गोष्टी आपण मागाहून शिकतों. मुलांचें काय ? त्यांच्यावर जे प्रेम करतात ते त्यांना जवळचे व आपलेसे वाटतात. त्यांना भेदभाव आपला व परका कांहीं माहीत नसतें. जन्मतः कुविचारांची शिदोरी बरोबर घेऊन कोणीही येत नाहीं.

जो आपल्या परिचयाचा आहे, त्याच्याविरुद्ध एखादी वाईट गोष्ट करणें हें अशुद्ध आचरण होय. जी वाईट गोष्ट आपण स्वतःच्या बाबतींत करणार नाहीं, ती दुसऱ्यांच्या बाबतींत तरी आपण कां करावी ? हा सद्विचार आहे. तो आपण विचारपूर्वक अमलांत आणला पाहिजे. व्यवहारांत शुद्धता, निर्मळता व पवित्रता पाहिजे. त्यांतून विवेकाचा प्रकाश पडत असतो.

वास्तविक परिस्थिति काय आहे हें जाणून घेऊन वागणें याचें नांव विवेक. आपण साबण लावून शरीर धुवून धुवून स्वच्छ केलें परंतु अंतरंग विवेकानें शुद्ध नाहीं केलें तर त्याचा काय बरें उपयोग ?

## विवेक कल्याणकारी असतो

आपल्या मनांत नाना प्रकारचे संशय उत्पन्न होत असतात. त्यांचें आपणांस निरसन करतां आलें पाहिजे. आणि तें करण्याचें साधन म्हणजे विचार होय. विवेकशक्ति ही केवळ वादविवाद करण्यासाठीं नाहीं व अहंकार वाढविण्यासाठींहि नाहीं– विवेकानें अहंकार नाहींसा झाला पाहिजे.

विचार आणि आचार हे एकमेकांपासून भिन्न नसून एकमेकांस पोषक आहेत.

येथें संत एकनाथांच्या जीवनांतील एका घटनेची आठवण होते. एकनाथांच्या वडिलांचें श्राद्ध होतें. त्या दिवशीं ब्राह्मण भोजन घालण्यांत यावयाचें असल्यामुळें नानाप्रकारचीं पक्वान्नें घरांत शिजत होतीं व तयार केली जात होतीं. दुपारची वेळ होती. त्यावेळीं कांहीं हरिजन आपलें कामधाम संपवून त्या वाटेनें जात होते. पक्वान्नांचा सुगंध हवेंत दरवळला होता. त्या सुगंधानें मोहीत होऊन एक हरिजन आपल्या सोबत्यांस म्हणाला, ‘ पक्वान्नांचा किती मधूर सुगंध सुटला आहे हा ! ’

दुसरा म्हणतो, ‘अरे आमच्यासारख्यांनीं केवळ त्या सुगंधावर राजी होऊन मिटक्या मारीत मार्ग सुधारावा ! प्रत्यक्ष भोजन आपणांस पहायलाही मिळायचें नाहीं. तें ब्राह्मण लोकांचें भाग्य ! समजलास ? ’

## एकनाथांचा समंजसपणा

एकनाथ महाराजांच्या कानांत ते शब्द ओझरते पडले. फार वाईट वाटलें. भगवंताचे परमभक्त एकनाथ, त्यांच्यानें स्वस्थ कसें रहावेल. त्यानीं त्या सर्व हरिजनांस हांका मारून बोलाविलें व तयार झालेलीं पंचपक्वान्नें त्यांना वाढायला लावून तीं त्यांच्याकडून पोटभर खावविलीं.

गांवांतील ब्राह्मणवर्गाच्या कानावर ही गोष्ट हां हां म्हणतां गेली. ते चिडले. ज्या पक्वान्नावर केवळ आमचा हक्क ती हरिजनांस बोलावून त्यांच्याकडून खावविणें, हा काय शहाणपणा झाला ? केवढा अविचार हा ! बस्स ! कोणीही ब्राह्मणानें एकनाथाच्या घरीं भोजनास जावयाचें नाहीं. ठराव सर्वांनुमते टाळ्यांच्या कडकडाटांत पास !

एकनाथानीं त्या ब्राह्मणांची समजूत घालण्याचा प्रयत्न कसून केला. ते म्हणाले, “ विप्रराज ! हरिजनांनीं ज्या अन्नाचा गंध घेतला तें तुमच्यासारख्या पवित्र ब्राह्मणांकडून खावयाचें म्हणजे काय ? यासाठीं तें अन्न त्यांना देऊन टाकून तुमच्यासाठीं दुसरा पवित्र स्वयंपाक तयार करविण्यात येत आहे. तेव्हां आपण मनांत कांहीं एक किंतू न बाळगता भोजनास यावें व संतोषाचे ढेकर द्यावे. ”

त्याकाळचे ब्राह्मण ते ! ते कसले वस्ताद ! त्यानीं आपला हट्ट सोडला नाहीं. एवढेंच करून ते थांबले नाहींत. कोणी एखादा अजाण, भुकेलेला व परस्थ ब्राह्मण येथें येऊन एकनाथाघरीं भोजन करील म्हणून कांहीं ब्राह्मणांनीं उपाशीं पोटीं दरवाजावर पहारा करण्याची कामगिरी स्वेच्छेनें शिरावर घेतली ! केवढी ही त्यांची बहादुरी !

## भगवंताला काळजी

भगवंताला भक्ताची काळजी ! ब्राह्मणांनीं एकनाथाशीं असहकार पुकारला; परंतु तिकडे घरांत भगवत् कृपेनें एकनाथांचे पितर प्रत्यक्ष हजर राहून भोजन यथास्थित करून तृप्त झाले. भोजन संपल्यानंतर त्यानीं आशीर्वादपूर्वक ‘ हर हर महादेव ’ची

एकच आरोळी मारली. दरवाजावरील भूदेवांच्या कानीं ती पडली व ते आश्चर्यानें गारठून गेले ! हा खराखुरा आचारधर्म होय.

प्रत्येक मनुष्याच्या जीवनांत आचाराची व आचाराचें विवेकपूर्वक पावित्र्य राखण्याची अत्यंत जरूरी आहे. आपल्या आचारांत व विचारांत माणुसकीचा बिलकूल अभाव असतां कामा नये. एकनाथ महाराजांनीं विचारपूर्वक जी माणुसकी प्रगट केली ती दैवीच होय. देव अशांचा सहाय्यकर्ता असतो.

आचाराचा अर्थ फार खोल आहे. आम्हीं मोठ्या मजेंत गोड गोड भोजन करावें, पोटभर खावें प्यावें व शेजारच्या घरांत माणसें अन्नासाठीं तडफडत असावीं ! त्यांच्या क्षुधेची पडछाया आपल्यावर पडल्याशिवाय कशी राहील ! मग तुमच्या भोजनाचें पावित्र्य कुठें बरें राहिलें ? आपण जें कांहीं कमावतों तें न्यायनीतीनें व प्रामाणिकपणें कमावलेलें असावें. दुसऱ्यांचे शिव्या शाप आपण नाहक घेतां कामा नयेत. भोजन बनविणारी माणसेही सद्भावपूर्वक बनविणारी हवीत तेंच भोजन पवित्र होय. व अशा भोजनामुळें आपल्या अंतःकरणांत पवित्र विचार वावरत असतात.




उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा.

**MATUNGA CLEANING WORKS**

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

**माटुंगा क्लीनिंग वर्क्स**

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ (मालक : एस्. व्ही. प्रधान

# तूंच श्रीहरी रे



साई तुझ्या दरबारीं कोण राव रंक रे।
साई तुझ्या भक्तांमध्यें कोण सान थोर रे ॥
जो येई शरण तुला, त्यासी तूं उद्धरी रे।
तूंच दीन दुबळ्यांचा, एक श्री हरी रे ॥
जवळ वा दूर असती, हांकेला तूं हांक देसी।
भक्तांच्या कल्याणासाठीं, रात्रंदिन तूं झटसी ॥
श्रद्धा सबुरीची गांठ, बळकट बांधीसी।
ज्ञानसागराचा आम्हां, दीप तूं दावीसी ॥
अशी माऊली ग आम्हां, सर्वांची तूं साई रे।
फकीर शरण येई, तूं द्वारकामाई रे ॥

कवि—फकीर बाबा, वसई

---

## – श्रीरामाचे श्लोक –

मनासारिखें हिंडुनी शोधताहें
मनासारिखें सुख कोठें न राहे।
जगीं शोधुनीं शोधतां सांपडेना
मनीं अंतरीं हा असे देवराणा ॥ध्रु०॥

कसा काळ गेला असे हें कळेना
मना राम गावें असें उमजेना।
तुझ्या ध्यानिं राहो सदा एकरूप
मनीं चित्ति ध्यानीं असो रामरूप ॥१

किती काळ जाई सुखाचा दुःखाचा
मुखीं रामनाम असो ही सदिच्छा।
मनीं वासना तुंचि रे पुरवावी
सदा अंतरीं राममूर्ती रहावी ॥२

नको रे नको लाभ मातें धनाचा
नको रे अहंकार वाटे फुकाचा।
मनीं अंतरीं राम हा अंगिकारू
जनीं मार्ग दावी सदा रामतारू ॥३

मना हिंडतां हिंडतां काळ गेला
मना हिंडुनीं हिंडुनी शीण आला।
मनीं आळवितें तुला रे दयाळा
दया लोभ ठेवी दयाळा कृपाळा ॥४

मला वाटतें मी तुला आठवावें
मनीं आठवुनी तुला रे भजावें।
मना अल्प धारिष्ट जीवीं धरावें
सदा सर्वदा रामनामीं रमावें ॥५

मना पाप तें कर्म खोटें नको रे
मना सत्य तें कर्म चित्ती वसो रे।
मनीं राघवाचीच मूर्ति वसो रे
मनासारिखें ध्यान त्याचें घडो रे ॥६

मनापासुनि हा सदा राम गावा
सदा रामनामीं जिवाचा विसांवा !
मना धीर गंभीर राहीं सदा रे
मना तोच आधार जीवा असो रे ॥७

मनासारिखें हिंडुनी हिंडताहे
मनासारिखें शोधुनी पाहताहे।
मला हें कळेना कुठें देव आहे
परी अंतरीं देव सन्नीध राहे ॥८

—कवयित्री–सौ. उषा जोशी




# ऑगस्ट १९६१

**या** महिन्यांत शिर्डीस श्रीसाई दर्शनासाठीं बाहेर गांवचे भक्त कांहीं दिवशीं पुष्कळ व कांहीं दिवशी थोडे असें येऊन गेले, त्यांतील कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली. ती पुढील प्रमाणें:—

**कीर्तन :** श्री. ह. भ. प. एकनाथबुवा पंढरपूर, श्री. ह. भ. प. मणीरामबुवा नाशिक, श्री. ह. भ. प. भागवतबुवा पंढरपूर, श्री. मराठे. सं. गवई श्री. ह. भ. प. विणुबुवा ताहाराबादकर, मु. ताहाराबाद यांची श्री. संत नामदेव पुण्यतिथी, श्रीसंत सावतामाळी पुण्यतिथी या निमित्त कीर्तनें झालीं, तसेच १५ आगस्ट व दोन एकादशा अशीं कीर्तनें झालीं.

**प्रवचन :** श्री. ह. भ. प. एकनाथबुवा पंढरपूर. श्री. ह. भ. प. भागवतबुवा पंढरपूर ( ज्ञानेश्वरी ) ग्रंथाची प्रवचनें झालीं.

**गायन :** श्री. माधवबुवा सुकाळें–पुणें, श्री. जगन्नाथबुवा सुरतकर–साकोरी, कुमारी वासंती तांबेकर–सोलापूर, श्री. लक्ष्मणराव व्यास–कोपरगांव, श्री. गोपिकाबाई जोंधळे–अमरावती, श्री. लक्ष्मणराव देवासकर, श्री. गणपतराव देवासकर–मुंबई, श्री. डी. एल. नाडकर्णी–मुंबई, श्री. सावित्रीबाई लाखे–पुणें, श्री. सुरेंद्रराव–मुंबई, श्री. श्यामसुंदर भुजाडे–नागपूर.

**हार्मोनियम वादन :** श्री. शंकर मयेकर, गिरगांव–मुंबई.

**पखवाज वादन :** श्री. बाबुराव डवरी, पुणें.

श्रीसंत गंगागिर महाराज नामसप्ताह ता. १६।८।६१ ते ता. २३ पर्यंत सात दिवस शिर्डी येथें झाला. या निमित्त कीर्तन प्रवचन भजन वगैरे झालें. शेवटचे दिवशीं नामदार भारदे मिनिस्टर यांचें प्रवचन ( श्री ज्ञानेश्वरीवर ) झालें. भंडारा मोठ्या-प्रमाणात झाला. या निमित्त श्रीसाई संस्थानतर्फे १४ संतांना प्रत्येकीं एक रुपया व नारळ देऊन सत्कार करण्यांत आला.

श्रीसाई संस्थानतर्फे श्रीगुरु पादुका निंबवृक्षाखालील श्रीशंकर देवतेस श्रावण मासा निमित्त महिनाभर रुद्राभिषेक, दररोज सहस्त्र बिल्वदळ अर्चन चालू आहे.

**पंधरा ऑगस्ट** दिना निमित्त श्रीसाई संस्थानतर्फे मे. रिसिव्हरसाहेब यांचे हस्तें श्री मंदिरावरील कळसा नजिक ध्वजारोहण रात्रौ दिव्यांची रोषणाई, भजन कीर्तन नाट्यछटा संवाद शिर्डी शाळेंतील मुलांचें करमणुकीचे कार्यक्रम झाले.

**शिर्डी येथील हवापाणी**—पाऊस नाहीं, बाकी हवा उत्तम आहे.

---

# शिर्डी संस्थानला देणग्या

### श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानकडे भक्तांकडून आलेल्या देणग्यांची साभार पोंच पुढील प्रमाणें :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चिंताभाई आर. पटेल | — | नॉ. रोडेशिया | थ | शिलींग | ६०—०० |
| एम्. एन्. मेहता | — | युगांडा | — | पौंड | ५—०० |
| बी. जे. एन्. भाऊ | — | मुंबई | — | रुपये | २७२—८० न. पै. |
| व्ही. डी. सरंजामे | — | नागपूर | — | रुपये | २१००—०० |
| गोविंदभाई नानुभाई | — | शिल्टोरिया (सा. आफ्रिका) | — | पौंड | ५—०० |
| बी. टी. देसाई | — | कलकत्ता | — | शिलींग | १२०—०० |
| पी. व्ही. कानिटकर | — | युगांडा | — | रुपये | ५१—०० |
| एल. आर. पटेल | — | इंग्लंड | — | पौंड | ७—०० |
| ओ. जी. राजलु | — | बंगलोर | — | रुपये | १०१—०० |
| स्वामी चिदानंद | — | युराग्वे (सा. अमेरिका) | थ— | डॉलर्स | ५—०० |
| डॉ. जे. पी. खोबरागडे | — | लंडन | — | पौंड | ३—०० |
| एच. जे. मोहम्मद | — | मुंबई | — | रुपये | २५—०० |
| एम्. ए. लक्ष्मण | थ— | वाशिंग्टन | — | रुपये | ६१—०० |
| ओ. व्ही. कृष्णमूर्ति | — | मुंबई | — | रुपये | १०००—०० |
| सी. जी. राजन | — | समलकोट | — | रुपये | ५००—०० |
| श्री. जे. एम्. मेहता | — | मुंबई | — | रुपये | १७५—०० |
| श्री. आणि श्रीमती कुर्मा | — | समलकोट | — | रुपये | १३००—०० |

श्री. आणि श्रीमती कुर्मा व श्रीमती मेहता यांनीं बाबांस चांदीची फुलपात्रें, तबके, लोट्या, ताटें, वगैरे नैवेद्याचें सामानाकरीतां दिलें आहे. तें सामान संस्थाननें खरेदी केलें आहे.

श्री. पोतदार, मुंबई, रु. ५००' (चांदीच्या चौरंगाकरितां).

# श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत<br>रु. न.पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित (मराठी) | ७·०० |
| (२) | श्रीसाईसच्चरित (हिंदी) | ४·५० |
| (३) | श्रीसाईसच्चरित (इंग्रजी) | ४·०० |
| (४) | श्रीसाईसच्चरित (गुजराथी) | ३·७५ |
| (५) | श्रीसाईसच्चरित (कानडी) | ३·०० |
| (६) | श्रीसाईनाथ-स्तवनमंजरी | ०·१२ |
| (७) | दासगणूकृत (४ अध्याय) | ०·५० |
| (८) | सगुणोपासना | ०·२५ |
| (९) | प्रधानकृत साईबाबा शिर्डी (इंग्रजी) | १·०० |
| (१०) | श्रीसाईलीलामृत | २·०० |
| (११) | श्रीसाईसुमनांजलि | ०·०६ |
| (१२) | कीर्तनपंचक | १·५० |
| (१३) | शीलधी | ०·७५ |
| (१४) | साईबाबा अवतार व कार्य | २·०० |
| (१५) | श्रीसाईगीतांजली | ०·१२ |
| (१६) | रुद्राध्याय (११ वा) | ०·१२ |

(पोस्टेज निराळें)

वरील पुस्तकांकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

१ सरकारकून, श्रीसाईबाबा संस्थान, पोष्ट-शिरडी, जि. अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.